# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक : दि. १५/११/२०१४

तारीख :

विषय : मा. महासभा
दि. १५/११/२०१४ रोजी स.११:००वा
प्रकरण क्र. २८ ते ३८

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख : मूळप्रत

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

(3)

१४/१५

अभिलेखांचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १२/११/२०१४.

## मा. महासभा दि. १५/११/२०१४
## पुरक घोषणा

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १५/११/२०१४ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ३९ | सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक ०५/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---<br>अंध, अपंग, कर्णबधिर बालकांसाठी / महिलांसाठी वैद्यकिय उपचारास आर्थिक सहाय्य देणेबाबत. |
| ४० | सन्मा. सदस्या सौ. निलम हरिश्चंद्र ढवण यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---<br>मिरा भाईंदर शहरामध्ये होणारी अनधिकृत बांधकामे यावर कारवाई करण्यासंदर्भात. |
| ४१ | सन्मा. सदस्य श्री. शरद केशव पाटील यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---<br>मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेले स्वच्छ भारत अभियान राबविण्याकरिता निधी उपलब्ध करणेबाबत. |
| ४२ | सन्मा. सदस्य श्री. बर्नट डिमेलो यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---<br>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रम ठेकेदाराने लागू केलेली अन्यायकारक तिकीट दरवाढ रद्द करुन ती कमी करणेबाबत. |
| ४३ | सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार पांडे यांचा दिनांक ११/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---<br>आरक्षण क्र. १०२ बगीचा व मैदान या जागेमध्ये वास्तुविशारद मे. तेजस कन्सल्टंट यांचा इमारत बांधकामाचा प्रस्ताव व मनपामार्फत प्राप्त झालेली बांधकाम परवानगी रद्द करणे व संबंधित वास्तुविशारद यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे. |

(हरेश ल. पाटील)
महापालिका नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सचिव /पु.भो/७९/२०१४-१५ दि- ०५/१२/२०१४


# सौ. प्रभात प्रकाश पाटील

**नगरसेविका**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय,

स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),

ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

संपर्क कार्यालय : गुलमर्ग अपार्टमेन्ट, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५ . मोबाईल : 9892409323

निवास : पारिजात बंगलो, इंद्रलोक फेस -४, न्यु गोल्डन नेस्ट रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५. E-mail: prabhat.p.patil@gmail.com


जावक क्र. ______________ दिनांक : ०५/१२/१४

प्रकरण क्र. ३९ करिता

प्रति,
मान. सचिव,
मि. भा. म. न. पा.

"अनुसुची 'ड' प्रकरण २ नियम 'ज' अन्वये प्रस्ताव."

**विषय – अंध, अपंग, कर्णबधिर बालकांसाठी / महिलांसाठी वैदयकिय उपचारास आर्थिक सहाय्य देणे बाबत.**

महोदय,

समाजामध्ये म्हणजेच मि. भा. क्षेत्राच्या सन २०११/१२ च्या सर्वेक्षणानुसार अंदाजित २५०० अपंग व्यक्ती आहेत. शहरातील बालकांमध्ये कर्णबधिर असण्याचे प्रमाण वाढते आहे. त्यांच्या शस्त्रक्रियांसाठी येणारा खर्चही मोठा असतो. अशावेळी अनेक सेवाभावी संस्था त्यांना आर्थिक मदत करतात. बऱ्याचदा अशा बालकांचे पालक नगरसेवकांशी मदतीसाठी संपर्क करतात. पालिकेमार्फत / महिला बालकल्याण मार्फत काही मदत मिळते का विचारतात. आपल्या म.न.पा. मार्फत अंध / अपंग उपचाराकरीता आर्थिक मदत लेखाशिषा खाली रु. २० लाखाची तरतुद करण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत अंध, अपंग, मुकबधिर व्यक्तींना उपचारासाठी एकुण उपचाराच्या २५ टक्के रक्कम ही ज्या हॉस्पीटलामधुन उपचार घेतले आहेत त्या संबंधीत हॉस्पीटलला दिले जावेत. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठीच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे.

- ४० टक्के पेक्षा जास्त रक्कम अपंगत्व असल्याचा ठाणे सिव्हील हॉस्पीटलचा किंवा अलियावर जंग इन्स्टिटयुटचा दाखला.
- रहिवासी दाखला
- उपचाराकरीता डॉक्टरांकडील कागदपत्रे.
- उपचारा नंतरच्या बिलाची मुळप्रत.
- मान. नगरसेवकांचे शिफारसपत्र.

वरीलप्रमाणे अपंग, अंध, मुकबधिर व्यक्ती वरील अटी/शर्तीची पुर्तता करतील अशा व्यक्तींना वैदयकिय उपचाराच्या २५ टक्के रक्कम अर्थसहाय्य म्हणुन देण्याचा प्रस्ताव पारीत करण्यात यावा.

धन्यवाद.

आपली,

सौ. प्रभात प्रकाश पाटील

सचिव/पु.घो./१०/२०१४-१५ दि.१०/११/२०१४


# सौ. निलम हरिश्चंद्र ढवण

**नगरसेविका**

**गटनेता-शिवसेना**

मिरा भाईंदर महानगरपालिका

विशेष कार्यकारी अधिकारी-महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

निवास : बी/१०३, सरस्वती सदन नं.३, सरस्वती नगर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ठाणे.
कार्यालय : शॉप नं.३, साईगिरी सोसायटी, साईबाबा मंदिराजवळ, साईबाबा नगर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व).
• मोबाईल : ९८६९२६५६२२ / ८६५५८८०५२५


जावक क्र.________ प्रकरण क्र.४० करिता दिनांक : १०.११.१४

प्रति, सचिव
मा. आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

विषय :- १) 'ज' च्या अन्वये १५/११/२०१४ च्या महासभेमध्ये खालील विषय घेण्यासंदर्भात...

२) मिरा-भाईंदर शहरामध्ये होणारी अनधिकृत बांधकामे यावर कारवाई करण्यासंदर्भात...

महोदय,

वेळोवेळी अनधिकृत बांधकामाविषयी आवाज उठवूनही सध्या मोठ्या प्रमाणावर भाईंदर (पूर्व), मिरारोड, भाईंदर (प.) येथे अधिकाऱ्यांच्या वरद हस्ते मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे चालू आहेत. त्यासर्व झालेल्या बांधकामांवर त्वरीत कारवाई करावी ही विनंती.

धन्यवाद!

आपली विश्वासु.

Dhawan

(सौ. निलम ह. ढवण)
नगरसेविका / शहरसंघटक

प्राप्त दि. १०/११/२०१४

वेळ - 12:05

सचिव/पु-धो/१२/२०१४-१५
दि. १०/११/१४


# शरद केशव पाटील

**सभापती - स्थायी समिती**

गटनेता

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१.
दूरध्वनी : २८१९३०८१ / २८१९२८२८
मोबाईल : ९८२११२१३३००

निवासः श्रीकृष्ण निवास, दुसरा माळा, राधा कृष्ण मंदिर मार्ग, भाईंदर (पूर्व), ता.जि.ठाणे - ४०१ १०५


जावक क्र:

दिनांक: १०/११/२०१४

**दि.१५/११/२०१४ च्या महासभेमध्ये "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत..**

**प्रकरण क्र. ८१ करिता**

प्रति,
मा. नगरसचिव साहेब
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय** :- मा. पंतप्रधान यांनी घोषीत केलेले स्वच्छ भारत अभियान राबविण्याकरीता निधी उपलब्ध करणेबाबत..

**संदर्भ** :- शासनाचे रामक्रमांचे दि. २९/०९/२०१४ रोजीचे पत्र.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूचित 'ड' मधील प्रकरण ७,२ प्रमाणे (कलमं १०१) (पोटकलम १) च्या तरतुदीच्या अधिन राहून महानगरपालिकेस मा. स्थायी समितीने सरकारी वर्षात वेळोवेळी केलेल्या शिफारशीवरुन कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानातून दुसऱ्या अर्थसंकल्पीय अनुदानात (लेखाशिर्षात) बदली करण्यास मंजुरी देता येईल.

मा. पंतप्रधान यांनी घोषीत केलेल्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनाच्या अनुषंगाने सदर अभियान राज्यात पर्यायाने महापालिकेमध्ये प्रभावीपणे राबावयाचे आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाने कार्यनिती कशी असावी याबाबतच्या मार्गदर्शक सुचना महानगरपालिकेस दिलेल्या आहेत.

स्वच्छ भारत अभियान महानगरपालिका क्षेत्रात राबविण्याचे असल्याने या कामी पुरेसा निधी उपलब्ध असणे आवश्यक आहे या कामाकरीता सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये ज्या लेखाशिर्षाखाली अखर्चीत रक्कम शिल्लक आहे अश्या रकमा पुर्ननियोजनाव्दारे वर्ग करण्यात याव्यात.

यामुळे मा. पंतप्रधान यांनी घोषीत केलेले स्वच्छ भारत अभियान मनपा क्षेत्रामध्ये प्रभावीपणे राबविणे सोयीचे होईल.

वरील अभियानाकरीता पुर्ननियोजनाद्वारे रू.५० लाखाचा निधी सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील अखर्चित लेखाशिर्षातील रक्कम या कामाकरीता वर्ग करण्यात यावी व सुधारीत अंदाजपत्रकामध्ये स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करण्यात यावेत. तरी सदरचा विषय हा येत्या मा. महासभेमध्ये घेण्यात यावा ही विनंती.

सुचक -श्री. शरद पाटील

अनुमोदक - श्री. राकेश शहा

प्राप्त दि. १०/११/२०२१
वेळ = १२:३५ वा.

अचिव/पु.शो/२३/४/२०१४-१५ (७)
दि. १०/११/२०१४

प्रकरण क्र० ४२ करिता

दिनांक : १०।११।२०१४

**प्रति,**
**मा. नगरसचिव साहेब,**
मिरा-भाईदर महानगरपालिका.

**<u>अनुसुची - 'ड' प्रकरण नियम 'ज' अन्वये प्रस्ताव.</u>**

**विषय : मिरा-भाईदर महापालिकेच्या परिवहन उपक्रम ठेकेदाराने लागु केलेली अन्यायकारक तिकिट दरवाढ रद्द करून ती कमी करणेबाबत प्रस्ताव.**

मिरा-भाईदर महापाालिकेने पी.पी.पी. तत्वावर बस पुरवठा करण्याचा ठेका मे. केस्ट्रेल इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीस दि. ०९/१०/२०१० पासुन दिलेला आहे. सदर ठेकेदाराच्या कंपनीसोबत मिरा-भाईदर परिवहन उपक्रमाचा करारनामा झालेला असुन गेल्या अनेक वर्षापासुन करारनाम्याच्या कोणत्याही अटी शर्तीचे पालन सदर ठेकेदार करीत नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्या गंभीर बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१. करारनाम्याच्या अटी शर्तीनुसार परिवहन ठेकेदाराने महापालिकेस पी.पी.पी. तत्वावर बस सेवा चालवताना १ रू. प्रति कि.मी. प्रमाणे प्रति बस प्रति दिवस १८०/- रू. प्रमाणे जे.एस.एन.आर.यु.एम. अंतर्गत ५० बसेसची निममित रॉयल्टी स्वरूपात पैसे भरणे बंधनकारक असताना सदरच्या ठेकेदाराने महापालिकेची सन २०१० ते २०१४ पर्यंत लाखो रूपये रॉयल्टी थकवलेली आहे. त्याचा भरणा ठेकेदाराकडून महापालिकेने प्रथम दंड व व्याजासहित सदरची थकीत रक्कम वसुल करावी व त्यानंतरच काही अंशी तिकीट दरवाढ लागु करण्यास परवानगी दयावी. परंतु जोपर्यंत ठेकेदार मनपाची थकीत रॉयल्टी भरणा करीत नाही तोपर्यंत तिकीट दरवाढ प्रशासनाने स्थगीत ठेवावी.

२. ठेकेदाराने बस सेवा देताना प्रत्येक बसचे इन्सुरन्स, आर.टी.ओ.टॅक्स, फिटनेस तपासणी इ. कागदपत्र चालु स्थितीत ठेवणे बंधनकारक असतानासुद्धा ठेकेदार हा बसेसचे इन्सुरन्स, फिटनेस व आर.टी.ओ. टॅक्स तसेच शासनाचा प्रवासीकर अधिभार भरीत नाही त्यामुळे ठेकेदाराने वरील सर्व रक्कमेचा भरणा करून ती सर्व कागदपत्र

..१..

[illegible]

[illegible]

[illegible] | [illegible]

महापालिकेस चालु स्थितीत असल्याचे सादर करावे व तद्नंतरच तिकीट दरवाढीस मनपाने मान्यता दयावी तोपर्यंत दरवाढ रद्द करावी.

३. ठेकेदाराने परिवहन उपक्रमाच्या बसेसचे मेन्टेनन्स दररोज चांगल्या प्रकारे देखभाल करणे बंधनकारक असताना ब-याच बसेस यांत्रिक बिघाडामुळे तसेच अस्वच्छ सिट फाटलेल्या, काचा फुटलेल्या अशा स्थितीत बसेस सुरू आहेत त्या सर्व बसेसेचे मेन्टनन्स व वरील नमुद कामे सुस्थितीत असल्याचे मनपास लेखी कळवावे व मनपाच्या संबंधित उपायुक्ताने प्रत्यक्ष बसेसची तपासणी करून तसा सविस्तर अहवाल मा. आयुक्त व महापौर यांना सादर करावा व समाधानकारक काम न आढळल्यास सदरची तिकीट दरवाढ रद्द करावी.

४. ठेकेदाराकडे बसेसवर कार्यरत असलेले वाहन चालक यांच्याकडे वैध स्वरूपाचे बस चालविण्याचे लायसन्स ब-याच चालकाकडे नाही तसेच ब-याच वाहकाकडे वैध स्वरूपाचा कंडक्टर बॅच नाही तरी मनपाने या सर्व आवश्यक गोष्टी तपासाव्या अन्यथा एखादा दुर्देवी अपघात घडल्यास मनपा या सर्व घटनांना दोषी राहील याची प्रशासनाने गंभीर नोंद घ्यावी.

५. करारनाम्याच्या अटी शर्तीनुसार ठेकेदाराने त्याच्याकडे कार्यरत असलेल्या प्रत्येक कर्मच-याचा पी.एफ. व ई.एस.आय.सी. प्रत्येक महिन्यात शासनाच्या संबंधित खात्याकडे भरणा करावयाचा आहे परंतु सदर ठेकेदाराने कोणत्याही कर्मचा-याचा पी. एफ. अथवा ई.एस.आय.सी. भरलेला दिसुन येत नाही तरी मनपाने ठेकेदाराकडुन वरील सर्व थकीत रक्कम भरणा करण्यास ठेकेदारास व पी.एफ.ई.एस.आय.सी. विभागास लेखी स्वरूपात नोटीस दयावी व सदरची कर्मचा-यांची रक्कम शासनास दंड व व्याजासहित भरणा केल्याचे प्रमाणपत्र ठेकेदाराने मनपास सादर केल्यानंतरच प्रशासनाने परिवहन उपक्रमाची तिकीट भाडेवाढ लागु करणेस परवानगी दयावी तोपर्यंत सदरची बस भाडेवाढ त्वरित रद्द करावी.

..२..

६. केंद्र सरकारने मागील महिन्यात दोन टप्प्यात डिझेलचे दर कमी करून साधारणत: ६ रुपये पन्नास पैसे दरवाढ कमी केलेली आहे ही बाब लक्षात घेऊन सदर ठेकेदाराने लागु केलेली अन्यायकारक तिकिट दरवाढ रद्द करून ती कमी करावी.

वरील सर्व गंभीर बाबी लक्षात घेता व ठेकेदाराची मनमानी पाहता आजच्या या महासभेमध्ये मी सादर करीत असलेला 'ज' अन्वयेचा प्रस्ताव दाखल करून घ्यावा ही विनंती.

| | |
|---|---|
| **सुचक** | **अनुमोदक** |
| बर्नाड डिमेलो | (श्री. झुबेर इनामदार) |

([illegible]) [illegible]

[illegible]

[illegible] [illegible]

# हंसु कुमार पांडे
**नगरसेवक**
मिरा भाईंदर महानगरपालिका
**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**

मिरा भाईंदर महानगरपालिका,
मुख्य कार्यालय,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

कार्यालय : शॉप नं. ३, रुक्मीणी अपार्टमेंट, कस्तुरी पार्क, नवघर रोड, भाईंदर (पूर्व) - ४०१ १०५. मोबाईल : 9324136664

कार्यालय : शॉप नं.२, कृष्णासागर अपार्टमेन्ट, काशी विश्वनाथ मंदिर के सामने, आर.एन.पी. पार्क, नवघर रोड, भाईंदर (पूर्व)-४०१ १०५.


जावक क्र. ________ प्रकरण क्र. ४३ करिता

दिनांक : ११/११/२०१४

प्रति,
**मा. नगरसचिव सो.,**
**सचिव विभाग,**
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- "ज" अन्वये प्रस्ताव दि. १५/ ११ /२०१४ च्या मा. महासभेमध्ये घेणेबाबत...**

**संदर्भ :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुचित "ड" प्रकरण २.**

**महोदय,**

वरील विषयानुसार कळविण्यांत येते की, खालील विषयाचा **"ज" अन्वये प्रस्ताव** मा. महासभेमध्ये घेण्यात यावा.

मिरा-भाईंदर महानगरपालिक्का मंजूर विकास आराखड्यामधील सर्व्हे क्र. (जुना) १५४, (नवीन) २६ हा क्षेत्रातील काही भाग आरक्षण क्र. १०२ प्रमाणे बगीचा व मैदानाकरीता आरक्षीत आहे. सदर आरक्षणामध्ये महानगरपालिकेने मे. ओस्तवाल या विकासकास दिलेल्या बांधकाम परवानगी दिलेली आहे. त्यानुसार विकासकामार्फत या ठिकाणी इमारत बांधकाम सुरु आहे. बगीचा व मैदानाकरीता आरक्षीत केलेले भूखंडावर बेकायदेशीर इमारत बांधकाम सुरु आहे.

तरी वास्तुविशारद मे. तेजस कन्सलटंन्ट्स यांचा इमारत बांधकामाचा प्रस्ताव व महापालिकेमार्फत प्राप्त झालेली बांधकाम परवानगी रद्द करावी तसेच संबंधीत वास्तुविशारद व विकासक यांचेवर दंडात्मक कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे.

**अनुमोदक**
Pisal
**(मनिषा पिसाळ)**
**नगरसेविका**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**सूचक**
HKumar
**(हंसूकुमार पांडे)**
**नगरसेवक**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०३/११/२०१४.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०३, दिनांक ०३/११/२०१४**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. १५/११/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३, दि. ०३ /११/२०१४ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा सुचना क्रमांक ०३, दि. ०३/११/२०१४ सोबतची विषय पत्रिका
सभा शनिवार दि.१५/११/२०१४

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| २८ | दि. ११/०६/२०१४, दि. २३/०६/२०१४ (दि. ११/०६/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – |
| २९ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाया निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.<br>निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे<br>१) श्रीम. अनिता जयवंत पाटील<br>२) श्री. राजु यशवंत भोईर<br>३) श्री. मुन्नासिंग<br>४) श्री. रोहिदास शंकर पाटील<br>५) श्री. शरद केशव पाटील<br>६) श्रीम. मिरादेवी रामलाल यादव<br>७) श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी<br>८) श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम |
| ३० | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे. |
| ३१ | महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे. |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ३२ | महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान प्रदान केल्याबद्दल मंजुरी मिळणेबाबत. |
| ३३ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणेबाबत. |
| ३४ | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) उन्नत मार्ग (Vehicular subway/Foot over Bridge) बांधणे कामासाठी कर्ज उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देणे. |
| ३५ | चौथा महाराष्ट्र वित्त आयोगाची दि. ०८/०७/२०१४ रोजीची कोकण महसुल विभाग, कोकण विभाग, बेलापुर, नवी मुंबई येथे आयोजित केलेल्या बैठकीबाबत. |
| ३६ | महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग पत्र क्र. याचिका/मि.भा.म-१४१३/११२६/प्र.क्र.-११७/१३/नवि-२८ दि. २६/३/२०१४ अन्वये प्राप्त निर्देषानुसार महानगरपालिकेला आवश्यक असलेले सुरक्षा रक्षक हे सुरक्षा रक्षक मंडळाकडून घ्यावेत की, अभिकर्ता निश्चित करुन घ्यावेत याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत. |
| ३७ | महासभेची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग) |
| ३८ | ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांच्यावर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजुरी प्रकरणाचे अवलोकन करणे. |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ३ नोव्हेंबर २०१४

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १५/११/२०१४ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **२७ सौ. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. ०४/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. आयुक्त सो. तसेच सर्व विभागीय अधिकाऱ्यांना नगरसेवकांनी पाठविलेल्या तक्रारीबाबत तसेच कामाबाबतच्या पाठपुराव्या संदर्भात पत्रांची उत्तरे किती दिवसांत दिली जातात का? असल्यास किती दिवसात देणे अपेक्षित असते? |
| **२८ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २९/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) विभिन्न एजन्सीयो को पेमेन्ट नही करने पर अथवा किस कारण से ०.७५% yearly से अधिक किस किस एजन्सी को किस-किस साल मे कितना-कितना पेमेन्ट किया गया है, जानकारी दे। |
| अ) महानगरपालिका का कितना फंड किस-किस जगह पर कितना-कितना किस Interest रेट पर डिपोजिट है, उसकी जानकारी दी जाये। |
| **२९ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २९/०५/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ओपन लॅंड टॅक्स से संबंधित निम्नलिखित बिंदु स्पष्ट करे<br>इस सुचना का स्त्रोत / रिकॉर्ड का नाम दिजीए |
| अ) प्रत्येक बिल्डर पर लगाये गये टॅक्स को २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ के हिसाब से विभाजीत कर बताइये? |
| ब) कौन कौन से ऐसे बिल्डर हो सकते है, जो आप द्वारा दी गई जवाब मे ओपन लॅन्ड टॅक्स के लिये नही लिये गये है? |
| **३० सौ. निलम हरिश्चंद्र ढवण मा. सदस्या यांनी दि. २८/०७/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) बाजार फी वसुली करणाऱ्या ठेकेदारांना फेरीवाल्यांकडून बाजार फी म्हणून किती फी वसुल करण्याची परवानगी आहे? |
| अ) महापालिकेने ठरवून दिलेल्या दरापेक्षा ठेकेदाराने जास्ती फी वसुल केल्यास महापालिका प्रशासनाला कसे कळते? |
| ब) ज्या ठिकाणाहून किंवा बाजारातून ठेकेदार बाजार फी वसुल करत आहेत, तेथे महापालिकेने दराबाबत सुचना फलक लावला आहे का? नसल्यास कधी लावणार? |
| क) ना फेरीवाला क्षेत्रामधून ठेकेदार बाजार फी वसुल करत आहेत, मात्र महापालिकेने फक्त फेरीवाला क्षेत्र गृहीत धरुन परवानगी दिली आहे. यामुळे महापालिकेच्या महसुलाचे नुकसान होते किंवा नाही? |
| ड) ना फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुल करु नये या अटीवर ठेकेदाराला ठेका देण्यात आला आहे. मग ना फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदारांवर आजपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे किंवा भविष्यात कोणती कारवाई करण्यात येईल? |
| **३१ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. २९/१०/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्ष झालेली आहे अश्या कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याचा मा. महासभेत ठराव पारीत झालेला आहे काय? |
| अ) या ठरावाची तारीख, तसेच ठराव मंजूर झाला असल्यास सदर ठरावाची काय अंमलबजावणी करण्यात आलेली आहे? |
| ब) आतापर्यंत सफाई कामगारांकरीता किती घरे बांधण्यात आली व कोणत्या ठिकाणी? |
| क) मनपा मध्ये २५ वर्ष सेवा झाली आहे असे किती सफाई कामगार आहेत? त्यांचे नाव व पत्ते द्यावेत? |
| ड) आतापर्यंत किती कामगारांना घरे देण्यात आली? |
| इ) मा. महासभेत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान राबविणेचे ठराव सहमत झाले आहे का? |
| ई) सुवर्णजयंती नगरोत्थान म्हणजे काय या अंतर्गत काय सुविधा देण्यात आलेल्या आहेत याची संपूर्ण माहिती द्यावी? |
| **३२ श्रीम. मिरादेवी रामलाल यादव मा. सदस्या यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) बी.एस.यू.पी. योजना अंमलबजावणी करण्याकरीता २.५ वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक करणेकामी फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. प्रस्ताव पाठविण्याची तारीख काय? |
| अ) सदर प्रस्तावाबाबत शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली? |

| |
|---|
| ब) वाढीव चटई क्षेत्राबाबत शासनाने पाठवलेली उत्तरांची माहिती देणे? |
| क) वाढीव क्षेत्र शासनाकडून मंजूरी मिळाल्यास बी.एस.यू.पी. योजना अंतर्गत चालू असलेल्या कामांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे का? |
| **३३ श्रीम. मिरादेवी रामलाल यादव मा. सदस्या यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) शांतता क्षेत्राचे लावलेल्या फलकाची साईज किती चौरस मीटर आहे? |
| अ) एकूण लावलेल्या प्रत्येकी साईजप्रमाणे किंमत किती? |
| ब) एकूण किती खर्च आलेला आहे? |
| क) शांतता क्षेत्र लावलेल्या फलकाच्या ठिकाणी योग्यतेने पालन होते का आणि सदरची जबाबदारी कोणाची? |
| ड) आतापर्यंत शांतता क्षेत्राचे उल्लंघन करणाऱ्या लोकांवर कारवाई करण्यात आली? नाव व त्यांची एकूण दंडात्मक कारवाई केली त्याची माहिती? |
| **३४ डॉ. नयना मनोज वसाणी मा. सदस्या यांनी दि. १३/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) राशनिंग कार्यालयाकरीता भाड्याने जागा उपलब्ध करुन देणे तसेच सदर ठिकाणी पाणी मीटर कार्यशाळेचेही बांधकाम करुन घेणे असा ठराव पारित झाला होता का? |
| अ) सदर ठरावाच्या अनुषंगाने राशनिंग कार्यलय उभारण्यात येऊन भाड्याने देण्यात आले आहे. तरी पाणी मीटर कार्यशाळेचे बांधकाम का झाले नाही? |
| ब) बांधकाम झाल्यास त्या ठिकाणी पाणी मीटर तपासणी कार्यालयाचे विधिवत काम का सुरु झाले नाही? |
| क) या विषयावर संबंधित अधिकाऱ्याने काय कारवाई केली त्याचा संपूर्ण तपशिल द्यावा? |
| **३५ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. १६/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडी प्लास्टीक पिशव्या जप्त करणेबाबत महाराष्ट्र शासनाने काढलेल्या जी.आर. कॉपी देणे. |
| अ) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्ती करणेबाबत देण्यात आलेल्या आदेश प्रती. |
| ब) महानगरपालिका क्षेत्रात आजपर्यंत ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या एकूण किती जप्त केल्या आहेत? |
| क) महापालिकेने ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्त केलेल्या दंडाची माहिती देणे. |
| **३६ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २५/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. महासभा दि. १६/०५/२०१३ मध्ये घेतलेला माझ्या प्रश्ना (रिलायन्स) संबंधीत जे काही आश्वासन मला देण्यात आले होते त्याबाबत आतापर्यंत काय कारवाई केली आहे? |
| अ) मा. महासभा दि. ०५/०६/२०१३ मध्ये घेतलेला माझा प्रश्न ओ.एल.टी. बाबत दिलेल्या आश्वासनबाबत आजपर्यंत काय कारवाई केली आहे? |
| ब) प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी नियमानुसार बनविण्यासाठी आतापर्यंत काय केले आहे. याबाबतची माहिती त्वरीत देण्यात यावी. प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये काय कायदा आहे? |
| **३७ मोहम्मद फरीद सिद्दीक कुरेशी मा. सदस्य यांनी दि. २७/०१/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर क्षेत्रातील मिरा गावठण या परिसरामध्ये भुयारी गटार योजना अद्यापपर्यंत का राबविण्यात आली नाही? तसेच राबविण्यात येणार आहे का? |

# मा. महासभा

# दि. ११/०६/२०१४

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. ११/०६/२०१४**

आज बुधवार दि. ११/०६/२०१४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १ दि. ०२/०६/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | शरद केशव पाटील | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ९) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| १०) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ११) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १४) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १५) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १६) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १७) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १८) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १९) | पाटील सुनिता कैलास | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| २०) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २१) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २२) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २३) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २४) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २५) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २६) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २७) | पाटील वंदना विकास | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| २८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २९) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३०) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३२) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३३) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३४) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३५) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३६) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३७) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३८) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३९) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४०) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४१) | मेन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४२) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४४) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४५) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४६) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४७) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४९) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ५०) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ५१) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५२) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५३) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५४) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५५) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५६) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५७) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५८) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५९) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ६०) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६१) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६२) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६३) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६४) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६६) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६७) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६८) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६९) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ७०) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७१) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७२) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७३) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७४) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७५) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७६) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७७) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७८) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७९) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८०) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८१) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८२) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८३) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८४) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८५) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८६) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८७) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८८) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| ३) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ४) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ६) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७) | सुंमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |

रजेचा अर्ज – निरंक

१) शाह सिमा कमलेश सदस्या

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीता उपस्थित सर्व सन्मा. सदस्य, सदस्या व अधिकारी वर्ग, पत्रकार बंधू ह्यांचे स्वागत करीत आहे. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी माझी विनंती आहे. सचिवांनी सभेस सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा बुधवार दि. ११/०६/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०१, दि. ०२/०६/२०१४ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. आजच्या सभेसाठी प्रशासनाकडून २ 'के' चे प्रस्ताव आलेले आहेत.

**असेन्ला मेंडोन्सा :-**

भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ नेते केंद्रीय ग्राम विकास मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री कै. गोपीनाथ मुंडे साहेब यांचा नवी दिल्लीमध्ये दि. ०३ जुन २०१४ रोजी भिषण वाहन अपघातात निधन झाले. संपूर्ण मिरा भाईंदर शहर या दुखःत सहभागी आहे. आज दि. ११/०६/२०१४ रोजीची महासभा पुढील सुचनेपर्यंत तहकूब करण्यात येते. मिरा भाईंदर महानगरपालिका व संपूर्ण सभागृह या सन्मा. युगपुरुषाला भावपूर्ण श्रध्दांजली वाहत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**अशरफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

सभागृहासाठी 'क' चे प्रस्ताव दिलेले आहेत ते पूढच्या सभेत स्वीकारा. मागासवर्गीय चळवळीचे नेतृत्व धारण करुन राजकारणात अगदी तळागाळापासून कामाला सुरुवात करुन राष्ट्रीय राजकरणात स्वतःचे नाव कमवलेल्या राज्यातल्या काही मोजक्या नेत्यांमध्ये भाजपचे जेष्ठ नेते, केंद्रीय ग्रामविकास मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री असलेले कै. गोपीनाथ मुंडे यांचे नवी दिल्लीत दि. ०३ जून २०१४ रोजी कार अपघातात निधन झाले. त्यांना भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली देत आहे.

**शरद पाटील :-**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मंत्री, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री लोकनेते श्री. गोपीनाथ मुंडे यांचे अकस्मित निधन दि. ३/०६/२०१४ रोजी झाल्याने मा. मुंडे साहेबांच्या रुपाने महाराष्ट्रातील मोठा आधारस्थंब गळून पडला आहे. सर्व जाती-जमातीच्या तरुणानां आकर्षित करणारा व राजकीय मतभेद विसरुन सर्वांना मदत आणि मार्गदर्शन करणारा व राज्यातील गुंडागीरी व दहशतवाद संपवणारा, जनसामान्यातील नेता दूर गेला आहे. मा. मुंडे साहेब यांच्या जाण्याने बहुजन चळवळीचे नुकसान झाले असून महाराष्ट्रातील महायुतीची साखळीची कडी निखळून पडलेली आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेची आणि शेतकऱ्यांची नाळ जोडणारा नेता हरपला आहे. महाराष्ट्राच्या राजकरणातील एका वादळाचा दुर्देवी अस्थ झाला. यामुळे भाजपाचा कार्यकर्त्यांना हा धक्का पचवणे कठीण जात आहे. अशा लोकनेत्याला आदरांजली वाहण्याकरीता आपण उभे रहावे. तसेच आज दि. ११/०६/२०१४ रोजीची सभा तहकुब करण्यात येत असून सदर तहकूब सभा दि. २३/०६/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात यावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**दिनेश जैन :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

मध्यमवर्गीयाचे नेतृत्व करणारे शिवसेनेचे उपनेते दिवंगत विलास अवचट विधान परिषदेचे माजी सदस्य ह्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले व शिवसेना पक्षातर्फे त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

**निलम ढवण :-**

आदरणीय कैलासवासी आणि कृषी मंत्री आदरणीय गोपीनाथ मुंडेसाहेब ह्यांचे अचानक अपघाती निधन झाले. ते भाजप पक्षाचेच नव्हे तर सर्वांचे आधारस्तंभ आपल्यामधून निघून गेले आहेत. मी ह्या लोकनेत्यास शिवसेनेच्या वतीने मनपूर्वक आदरांजली वाहते. त्याचबरोबर शिवसेनेचे सन्मा. नगरसेवक प्रवीणजी पाटील ह्यांचे वडील श्री. मोरेश्वर पाटील यांचे देखील वृध्दप काळाने निधन झाले आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो असे मी शिवसेनेच्या वतीने त्यांना आदरांजली वाहते. तसेच आपले ज्येष्ठ पत्रकार अनिल खेडेकर ह्यांच्या पत्नी सौ. मंगला खेडेकर ह्यांचे २० मे रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले त्यांच्यादेखील आत्म्यास शांती लाभो अशी मी शिवसेनेच्या वतीने त्यांना श्रध्दांजली वाहते.

**मा. महापौर :-**

ठरावानुसार सभा तहकूब करण्यात येत आहे. तरी तहकूब सभेची तारीख..............

**नरेंद्र मेहता :-**

आमचा तहकूब सभेचा ठराव असे दोन ठराव आपल्याकडे आलेले आहेत. तर माझी विनंती अशी राहील की क्लब करावी आणि मंजूर करावे. आमच्या ठरावात क्लब करुन मंजूर करावा अशी विनंती सचिव साहेब सभागृहात अधिकार आहे. तारीख नक्की करायचा आम्ही आमचा ठराव मांडलेला आहे.

**नगरसचिव :-**

पहिला ठराव सुचक श्रीम. असेन्ला मेन्डोसा अनुमोदन श्री. अशरफ शेख दूसरा ठराव श्री. सुचक शरद पाटील अनुमोदन श्री. दिनेश जैन अनूक्रमे दूसरा ठराव मतदानास टाकतो.

**असेन्ला मेन्डोसा :-**

साहेब, श्रध्दांजलीच्या ठरावात तुम्हाला वोटींग पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

ह्याच्या अगोदर बऱ्याच सभा अशा तहकूब झालेल्या आहेत. तुम्ही नविन प्रथा चालू करता का?

**नगरसचिव :-**

कायदा जो आहे तो दाखवतो. सुचक श्री. शरद पाटील अनुमोदन श्री. दिनेश जैन ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. असेन्ला मेन्डोसा अनुमोदन श्री. अशरफ शेख ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक शरद पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४१ विरोधात ३८ तटस्थ १ या सभेत 'क' चा विषय आला होता तो तहकूब सभेत घेण्यात यावा. ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**दुःखवटा ठराव क्र. :-**

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मंत्री, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री लोकनेते श्री. गोपीनाथ मुंडे यांचे अकस्मित निधन दि. ३/०६/२०१४ रोजी झाल्याने मा. मुंडे साहेबांच्या रुपाने महाराष्ट्रातील मोठा आधारस्थंब गळून पडला आहे. सर्व जाती-जमातीच्या तरुणानां आकर्षित करणारा व राजकीय मतभेद विसरुन सर्वांना मदत आणि मार्गदर्शन करणारा व राज्यातील गुंडागीरी व दहशतवाद संपवणारा, जनसामान्यातील नेता दूर गेला आहे. मा. मुंडे साहेब यांच्या जाण्याने बहुजन चळवळीचे नुकसान झाले असून महाराष्ट्रातील महायुतीची साखळीची कडी निखळून पडलेली आहे.

महाराष्ट्रातील सर्व जनतेची आणि शेतकऱ्यांची नाळ जोडणारा नेता हरपला आहे. महाराष्ट्राच्या राजकरणातील एका वादळाचा दुर्देवी अस्थ झाला. यामुळे भाजपाचा कार्यकर्त्यांना हा धक्का पचवणे कठीण जात आहे.

अशा लोकनेत्याला आदरांजली वाहण्याकरीता आपण उभे रहावे. तसेच आज दि. ११/०६/२०१४ रोजीची सभा तहकुब करण्यात येत असून सदर तहकूब सभा दि. २३/०६/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात यावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील          अनुमोदन :- श्री. दिनेश जैन**

**या ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. प्रशांत दळवी यांनी खालीलप्रमाणे दुःखवटा सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन्मा. नगरसेवक श्री. प्रविण मोरेश्वर पाटील यांचे वडिल कै. मोरेश्वर पाटील यांचे दि. ०२/०६/२०१४ रोजी अल्पशः आजाराने निधन झालेले आहे. श्री. प्रविण मोरेश्वर पाटील यांच्या कुटुंबियांच्या दुःखामध्ये ही सभा सहभागी आहे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | कोठारी सुमन रमेश | १ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | १) गोविंद हेलन जॉर्जी |
| २ | कांगणे यशवंत बगाजी | २ | अशोक तिवारी | |
| ३ | सिंग मदन उदितनारायण | ३ | अन्सेन्ला मेन्डोसा परेरा | |
| ४ | पाटील रोहिदास शंकर | ४ | पाटील वंदना विकास | |
| ५ | म्हात्रे कल्पना महेश | ५ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ६ | प्रेमनाथ गजानन पाटील | ६ | रॉड्रीक्स बाबरा डॉनल्ड | |
| ७ | शर्मा सुनिला सत्येंद्र | ७ | मेन्डोसा स्टिवन जॉन | |
| ८ | मेहता डिंपल विनोद | ८ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ९ | केळुसकर प्रशांत नारायण | ९ | शेख आसिफ गुलाब | |
| १० | रावल भगवती जयशंकर | १० | डिमेलो बर्नड आल्बर्ट | |
| ११ | शाह राकेश रतिशचंद्र | ११ | शेख लियाकत ग. | |
| १२ | शरद केशव पाटील | १२ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | खण्डेलवाल सुरेश | |
| १४ | जैन गिता भरत | १४ | नरेश तुकाराम पाटील | |
| १५ | जैन रमेश धरमचंद | १५ | म्हात्रे परशुराम पद्माकर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | डॉ. राजेंद्र जैन | १६ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| १७ | प्रतिभा प्रकाश तांगडे | १७ | भावसार शिल्पा कमलेश | |
| १८ | मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | १८ | वंदना रामदास चक्रे | |
| १९ | सुजाता रविकांत शिंदे | १९ | भोईर कमलेश यशवंत | |
| २० | नरेंद्र एल. मेहता | २० | दक्षता राजेंद्र ठाकूर | |
| २१ | कासोदरिया अश्विन श्यामजी | २१ | पिसाळ मनिषा नामदेव | |
| २२ | डॉ. नयना मनोज वसानी | २२ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | वेतोसकर राजेश शंकर | |
| २४ | दिपीका पंकज अरोरा | २४ | बगाजी शर्मिला विन्सन | |
| २५ | मीरादेवी रामलाल यादव | २५ | रकवी सुहास माधवराव | |
| २६ | अनिल बाबुराव भोसले | २६ | झिनत रऊफ कुरेशी | |
| २७ | निलम हरिश्चंद्र ढवण | २७ | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | |
| २८ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | २८ | पुजारी कांचना शेखर | |
| २९ | संध्या प्रफुल्ल पाटील | २९ | काझी रशीदा जमील | |
| ३० | तारा विनायक घरत | ३० | इनामदार जुबेर | |
| ३१ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | ३१ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| ३२ | शुभांगी महिन कोटियन | ३२ | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | |
| ३३ | जयमाला किशोर पाटील | ३३ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| ३४ | संदिप मोहन पाटील | ३४ | डिसा मर्लिन मर्विन | |
| ३५ | परमार अनिता भरत | ३५ | भट दिप्ती शेखर | |
| ३६ | पाटील प्रणाली संदिप | ३६ | विराणी रेखा अनिल | |
| ३७ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | ३७ | सामंत प्रमोद जयराम | |
| ३८ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३९ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ४० | ठाकूर अरविंद दत्ताराम | | | |
| ४१ | जाधव मोहन महादेव | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नरेंद्र मेहता :-**

घेण्यात आमची काय हरकत नाही पण दोन विषय आहेत म्हणून आम्ही कन्फ्यूज झालो.

**मा. महापौर :-**

दोन नाही मी एकच घेतलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण कोणता घेतला.

**मा. महापौर :-**

पाणी पूरवठ्याचा.

**(सभा संपण्याची वेळ ११.३०)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महासभा

दि. २३/०६/२०१४

(दि. ११/०६/२०१४ ची तहकुब

सभा) रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा महासभा दि. २३/०६/२०१४**

मा. महासभा बुधवार दि. ११/०६/२०१४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा ठरावाद्वारे बहुमताने तहकूब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. १ ते ०६ व पुरक घोषणा क्र. ७ ते १० या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा सोमवार दिनांक २३/०६/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | शरद केशव पाटील | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ८) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ९) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| १०) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ११) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १४) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १५) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १६) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १७) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १८) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १९) | पाटील सुनिता कैलास | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| २०) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २१) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २२) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २३) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २४) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २५) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २६) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २७) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २८) | पाटील वंदना विकास | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| २९) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३०) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३१) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३२) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३४) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३५) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३६) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३७) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३८) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३९) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४०) | मेंडोन्सा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४१) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४२) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४३) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४४) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४५) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४६) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४७) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४८) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ४९) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५०) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५१) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५२) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५३) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५४) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५५) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५६) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५७) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ५८) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५९) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६०) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६१) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६२) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६३) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६४) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६५) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६६) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६७) | भट्ट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६८) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६९) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७०) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७१) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७२) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७३) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७४) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७५) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७६) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ७७) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ७८) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ७९) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८०) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८१) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८२) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८३) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८४) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ८५) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ४) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ५) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ८) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ९) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |

१०) वंदना रामदास चक्रे सदस्या
११) अनिल बाबुराव भोसले सदस्य
१२) रविंद्र भिमदेव माळी सदस्य

<u>रजेचा अर्ज – निरंक</u>

**मा. महापौर :-**

दि. ११/०६/२०१४ रोजीची तहकूब सभा आज आयोजित करण्यांत आलेली आहे. सभेस उपस्थित सर्व सन्मा. सदस्य, अधिकारी व पत्रकार बंधूचे स्वागत करित आहे. सदरची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडाची अशी माझी विनंती आहे. सचिवांनी सभेस सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा बुधवार दि. ११/०६/२०१४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरहू सभा ठरावाद्वारे बहुमताने तहकूब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. १ ते ०६ व पुरक घोषणा क्र. ७ ते १० या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा सोमवार दिनांक २३/०६/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे. प्रश्नोत्तर तासाला सुरूवात होत आहे. ११-१५ झालेले आहेत. प्रश्न क्र. २३ डॉ. राजेंद्र जैन ह्यांचा प्रश्न आहे. प्रश्नोत्तराला सुरूवात करावी.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त महोदय, मा. महापौर मॅडम यह जो प्रश्न लिया है। इसमे पहले यह बताया गया था की २०१२ मे. रिपेयर की परमिशन दिया उसके बाद में फिर उसपे कुछ स्टे वैगेरा हुआ। बाद में बोला की स्टे हट गया। उसको तोडना चाहिए नोटीस दिया और बाद में बोला उसका रिव्हाइज बांधकाम करेंगे। पिछली महासभा में धनेगावे साहबने कहाँ था छोटासा काम है। और बाद मे रिव्हाइज बांधकाम भी बाद मे देखा तो नही हुआ, बाद में तोडा गया। मेरी मा. महापौर से और मा. आयुक्त से विनंती है की पूरी मिरा भाईंदर में इनलिगल कस्ट्रक्शन का जाल बिछा हुआ है, रिपेयर के परमिशन के नाम पर महसूल कम होता है। तो पहला सवाल यह है रिपेयर हो रही थी और रिपेयर परमिशन दिया गया और इसका बांधकाम हो गया तो उस समय किस अधिकारी की ड्युटी थी की यह बांधकाम ऐसे ना हो, उसका नोटीफिकेशन क्यू नही आया और अगर नही आया तो उसपे कारवाई क्यू नही होती? ऐसे सवाल पे हमेशा हमे मौनकारी मूँह देखना पडता है। पर मैं इस प्रकरण की माध्यम से यह अपिल करना चाहूँगा की अगर अधिकारी अपने कर्तव्य का पालन नही करेंगे तो पहले स्टेप पे गडबड होगी। जब भी बात करेंगे अधिकारी बोलते है प्रेशर था। यह प्रेशर किसका था, प्रेशर या, संरक्षण था। यह आपको देखने का है। लेकिन जिस अधिकारी को वॉर्ड मे बिट मार्शल बोलते है या वॉर्ड ऑफिसर बोलते है अगर वह समय पे सुचना नही देते या उसको संरक्षण देते है। उसके बाद में जब बन गया तो कोर्ट के अंदर स्टे मिला। कोर्ट में स्टे मिलने के बाद में पुरी प्रक्रिया चालू हुई कानून का सम्मान करते हुए एक साल देढ साल जो भी समय लगा वह लगा उसके बाद में कोर्ट डीपीएलडी प्रोसीजर लो वह पुरा किया गया। उसके बाद रिव्हाइज परमिशन डाला गया तीन बार उसको मना किया उसको रिव्हिजन नही कर सकते। तीन बार मना करने के बाद जब फॉलोअप किया गया तो बताया गया की उसको रिव्हीजन परमिशन दे दिया है। मुझे समझ में नही आता २-२ चार ही हो सकता है कभी २-२-४-५ किया कभी २-२-४-३ किया एक ही जगह के उपर एक चीज के उपर कभी हा कभी ना। रिव्हिजन परमिशन कैसे दिया गया। तीन बार कना करने के बाद तीन बार का लेटर है उसको ऑफिसियल परमिशन नही दे सकते। इसके बाद रिव्हिजन परमिशन दिया है लेकीन कोर्ट से स्टे उठ गया है। डी.पी.एल. पुरा हो गया है। वह तोड सकता है तो उसपे कारवाई क्यो नही होती। तो जवाब यह मिलता है की, उसने रिव्हिजन ऑप्लिकेशन के लिए रिव्हिजन ऑप्लिकेशन दिया हुआ है। इसके लिए उसको तोडक कारवाई से रोका हुआ है। क्या यह कानून संगत है। मैने इसका कानून पुछा मुझे बताया गया लेकीन लिखित मे मेरे पास ऐसा कुछ स्प्ष्ट नही मिला। इस तरह का मतलब यह हुआ की सुप्रिम कोर्ट भी डिसीजन दे देगा। बिल्डींग को तोडने का और वह बोलेगा मुझे इस पर विंग डालने का है तो जब वह डाले तब तक उसको रोका जाएगा क्या? यह मुझे न्यायसंगत लगता नही। इस बहाने ये ३-४ महिने कारवाई रोकी गई। महासभा में यह बताया गया की इसका विंग कर दिया गया तो उसे तोड दिया गया। मुझे इसका खुलासा चाहिए की क्या-क्या हुआ है। मैने ४-५ मुद्दे उठाया। यह सब कारवाई कैसे हुई। मा.आयुक्त साहब आप यह स्टडी कर देखेंगे।

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, मौजे भाईंदर, सिटीएस नं. ५७१ ह्या जागेमध्ये मोंटारो ह्यांनी जे बांधकाम केलेले आहे. त्या संदर्भात राजेंद्र जैन साहेबांचा प्रश्न आहे. ह्याबाबत लेखी उत्तर त्यांना दिलेले आहे. ह्या प्रकरणामध्ये २००९-१० मध्ये दुरूस्ती परवानगी दिलेली होती. दुरूस्ती परवानगी अटीशर्तीच्या अधीन राहून दिलेली होती. त्या अटीशर्तीचे वायलिसेस झाल्यामुळे ती परवानगी रद्द केली होती. त्या अगेंस्ट मोंटारो ह्यांनी जिल्हा न्यायालयात दाद मागितली होती. जिल्हा न्यायालयाने त्यामध्ये स्थगिती आदेश दिले होते. दरम्यानच्या बऱ्याच कालावधीत दावा कोर्टात चालल्यानंतर मे स्थगिती आदेश रद्द बातल ठरले. त्यानंतर

त्यांनी रेग्युलायझेशनचा प्रस्ताव सबमिट केला होता. तो प्रस्ताव काही कागदपत्रा अभावी अपूर्ण होता. म्हणून तो प्रस्ताव नाकारण्यांत आला होता. त्यानंतर त्यांनी आर्किटेक्टची आपली लिस्ट आहे त्या लिस्टनुसार डॉक्युमेंटचा डिटेल प्रस्ताव सबमिट केला होता. त्या प्रस्तावाची तांत्रिक छाननी मागच्या महासभेत झाली होती. तो प्रस्ताव रेग्युलायझेशनसाठी आहे असे मी आपल्याला उत्तर दिले होते. त्या महासभेच्या नंतर तो प्रस्ताव मंजुर करण्यांत आलेला आहे. आणि त्या मंजुरीनुसार वरचे सेकंड फ्लोअरचे जे ॲक्सेस बांधकाम होते ते बांधकाम मनपाच्या प्रभाग कार्यालयाकडून तोडण्यांत आलेले आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

धन्यवाद साहेब. मैने जो सवाल किए वह अभी तक अनुत्तरीत है। आपने बोला परमिशन दिया उसपे अतिरिक्त बांधकाम हुआ तो कोर्ट में कैसे गया। मेरा पहला सवाल यही था की मुझे यह बताया गया है की इन लिगल बांधकाम मे जबतक बिल्डींग बनती है तबतक इनलिगल कंस्ट्रक्शन टाऊन प्लानिंग के पास जाता है और बनने के बाद मे अतिक्रमण के पास जाता है। तो जब बन रहा था और इनलिगल बन गया। तो जिम्मेदारी किसकी थी। मैं जिम्मेदारी की बात कर रहा हूँ।

**सत्यवान धनेगावे :-**

मिरा भाईंदर मनपा मे प्रभाग अधिकारी सबका आते है। जिम्मेदारी की बात नही है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आप पहले नियम पता किजिए। मुझे यह बताया गया की बिल्डींग बनने तक अगर गलत काम होता है तो उसकी जिम्मेदारी टाऊन प्लानिंग की और बनने के बाद अतिक्रमण की। यह बराबर है या गलत है।

**सत्यवान धनेगावे :-**

इसमे पहले रिपेयर परमिशन दिया गया था। रिपेयर परमिशन के तहत उन्होने बांधकाम किया इसलिए वह मॅटर चल रहा था।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

रिपेयर परमिशन अंतर्गत दिया गया बांधकाम गलत तरीकेसे वाढीव काम किया गया तो उसकी जिम्मेदारी किसकी थी?

**सत्यवान धनेगावे :-**

उसको नोटीस दिया था।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

नोटीस देने के बाद भी बन गया।

**सत्यवान धनेगावे :-**

उसका रिपोर्ट परमिशन रद्द किया था। सब प्रोसेस रेकॉर्ड पे है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

नोटीस बनने के बाद दिया या बनते समय दिया।

**सत्यवान धनेगावे :-**

नोटीस बनते टाईम ही दिया जाता है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जिसने आपको नोटीफाय किया वह पेपर दिखाईए।

**सत्यवान धनेगावे :-**

प्रभाग कार्यालय और मेरे ऑफिस में जो भी रेकॉर्ड है वह आपको कभी भी मिलेगा।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

इस आन्सर में नही है। आपने उसको तीन बार उसको रिव्हाइज करने से इन्कार किया। तो चोथी बार उसको कैसे परमिशन दिया।

**सत्यवान धनेगावे :-**

जब भी तीन बार इन्कार किया वह रेकॉर्ड पे है, कागज नही दिया, आर्किटेक्ट से प्लान नही डाला एक बार सिर्फ ॲप्लिकेशन किया था, ओनरशिप सब पेपर है वह नही दिया। तिसरी बार..................

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मेरी जानकारी में आपने ही बताया की उसे पॉसीबल नही है, इसिलिए नही दिया है।

**सत्यावान धनेगावे :-**

ऐसा स्टेटमेंट मैने नही दिया। जब तक डिमोलेशन नही तब तक रेग्युलायझेशन है। यह कायदेका प्रावधान है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

जब आपने तोडने का आदेश एक बार दे दिया उसके बाद मे उसने रेग्युलायझेशन प्लान डाला तो यह कौनसा कानून है। अगर रेग्युलायझेशन का ॲप्लिकेशन डाली जाएगी तब तक उसको तोड नही सकते।

**सत्यवान धनेगावे :-**

ऐसा नही है। कोई भी कंस्ट्रक्शन इनलिगल होता। जब तक डिमॉलिशन नही होता तब तक रेग्युलायझेशन का ऑप्शन ओपन रहता है।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

ऑप्शन ओपन रहता है लेकिन तोडने का ऑप्शन चालू है की नही है।

**सत्यवान धनेगावे :-**

जो बांधकाम रेग्युलाईज हुआ उसके अलावा एक्सेस कंस्ट्रक्शन था वह कार्पोरेशनने तोड दिया।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

बिच में आपने कहाँ था अभी रेग्युलायझेशन हो रहा है इसलिए इसको नही तोडेंगे। ॲप्लिकेशन पेंडीग है। ॲप्लिकेशन पेंडींग तक जो तोडा जा सकता था वह नही तोडा यह आपने सही किया, गलत किया।

**सत्यवान धनेगावे :-**

जब तक रेग्युलायझेशन के बारे मे डिसीजन नही होता तब तक तोड नही सकते।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

डिसीजन हो चुका है आप खुद ही कोर्ट में गए है तोडने का है, कोर्ट से स्टे हट गया है डिसीजन हो चुका है।

**सत्यवान धनेगावे :-**

उसके बाद हमारा डिसीजन हुआ।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आपका डिसीजन पहले हो चुका है। आपने तोडने का नोटीस दिया है। कोर्ट से स्टे हट चुका है। मा. आयुक्त साहेब मै अपने पॉईंट आपके सामने रखे है आशा है आप समझेंगे।

**सत्यवान धनेगावे :-**

रेग्युलायझेशन का ॲप्लिकेशन हमारे पास पेंडींग था। उसके उपर डीसिजन नही होता तब तक हम कुछ नही कर सकते। रेग्युलायझेशन का डिसीजन होने के बाद..........

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मै आयुक्त महोदय ये यही बात पक्की करने की बोल रहा हूँ की आपने तोडने का नोटीस दिया कोर्ट से स्टे उठ गया डी.पी.एल हो गया आप तोंड सकते हो लेकिन रेग्युलायझेशन के ॲड मे आपने टाईम निकाला और आप कुछ नही कर पाए तो आपको तोडना पडा।

**सत्यवान धनेगावे :-**

टाईम निकालने की बात नही है। उसका ऑनरशीप है उसका प्लॉट एरिया है। उसका एफ.एस.आय. एन.टायटल है उसका जो हक है उसको देना है।

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. २४.

**गिता जैन :-**

सर यह अन ऑथरॉईज था इनलिगल का जो चल रहा है। मै आयुक्त साहब के पास गई थी उन्होने ऑर्डर दिया था। लेकिन उसके बाद भी जो इनलिगल कंस्ट्रक्शन कम्पलिट हुआ। आज भी वो वही है। यह बन रहा था तब से आपके नोटीस में लाया जा रहा है। की यह इनलिगल है और उसके बाद भी कोई ॲक्शन नही होती। वह बहोत दु:खद है। और उसके बाद भी तोडने के ऑर्डर के बावजूद आज भी वह इमारत वैसे की वैसी खडी है। अधिकारी का कहना है वह लेडी हमे गाली देती है। हमे धमकी देती है। तो मै यह समझी की भाईंदर में इनलिगल कंस्ट्रक्शन करना हो तो यह रित अपनाई जाए।

**मा. आयुक्त :-**

उसको नोटीस दिया गया है। वह भी तोडने की कारवाई होगी। और तोडने की कारवाई करते समय जो भी लिगल प्रोसीजर है। जो भी संधी देना जरूरी है। वह देना भी जरूरी होता है। आपने बोल दिया और तोड दिया ऐसा नही हो सकता। उसकी इन्क्वायरी होगी। इन्क्वायरी होने के बाद अगर तोडना जरूरी है तो तोडा जाएगा। और उसके लिए जो ड्यू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करना है वह किया जाएगा। जो पहला क्वेशन पुछा गया था। आपका क्वेशन अलग बारे में है। उसके लिए अलगसे सवाल उठाना ज्यादा अच्छा रहेगा।

**शरद पाटील :-**

मा. आयुक्त साहेब विषय वेगळा असू द्या. पण ह्या शहरामध्ये अनधिकृत बांधकाम होतात. आपल्या अधिकाऱ्यांना माहित असते ते झाल्यानंतर ती पूर्णपणे होतात. मुंबईमध्ये कॅम्पाकोलामध्ये चालले आहे तसा विषय मिरा भाईंदरमध्ये होते. बिल्डर बांधून जातात. लोक तिथे राहायला येतात. आणि नंतर आपण तिथे कारवाई करायला जातो. हे चुकीचे आहे. तुम्ही बिल्डर असताना करा. लोकांना त्याचा नाहक भुर्दंड होतो. आपण त्या बिल्डींग समोर नोटिस लावत नाही की ही बिल्डींग इनलिगल आहे. ह्याच्यात फ्लॅट घेऊ नका. तशी तुम्ही तरतूद करा. त्यांच्यासमोर बोर्ड लावा की ही बिल्डींग इनलिगल आहे. त्याच्यात फ्लॅट घेऊ नका. घेतल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

**मा. आयुक्त :-**

ठीक आहे. त्याप्रमाणे देखील करण्यांत येईल. आपण काय केलेले आहे. ज्या बिल्डींग आपल्याला अनधिकृत निदर्शनास आल्या. त्या आपण सिल केल्या. तिथे कोणी घेऊ नये. ह्याशिवाय संबंधित सबरजिस्टरला कळवले की ह्याचे रजिस्ट्रेशन आल्यानंतर आपण ते नाकारा. आपण जे म्हणता जनजागृती

मिरा भाईंदर शहरामध्ये आपले जे होर्डिंग्ज आहेत. त्याच्यावर देखील लावण्यांत येईल आणि सर्व्हे पण करण्याच्या बाहेर ज्या अनधिकृत इमारती आहेत त्याचे देखील पॅम्पलेट लावण्यांत येईल.

**गिता जैन :-**

सर मै आपको याद दिलाऊ की जब वह बन रहा था। तब भी मैने कहा था की यह बन रहा है आप रोख लिजिए।

**मा. महापौर :-**

ठीक है।

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते. ६० फुट रोडवर गणपती मंदिराच्या समोर माधव संस्कार केंद्र आहे. जोशी निकेतनच्या बाजुलापण तेथे इनलिगल इमारतीचे काम चालू आहे. त्याच्यावर कारवाई करावी अशी माझी अपेक्षा आहे.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**नगरसचिव :-**

प्रश्न क. २५ डॉ. रमेश धरमचंद जैन ह्यांचा प्रश्न आहे.

**रमेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, मा.आयुक्त साहेब धन्यवाद. मेरा प्रश्न था, मनपाचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टिने मोकळ्या जागेवर कराचे परिणामकारक वसूली होण्याच्या दृष्टिकोनातून कोणतेही जमिन मालक विकासकाकडून मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय सुधारित बांधकाम मंजुरी, जोत्याचा दाखला, भोगवटा दाखला देण्यांत येऊ नये. असे निर्देश देणारे आदेश मा. आयुक्त सो, ह्यांनी ह्यांचेकडील आदेश क्र.मनपा/१४३/२००८-२००९ दि.२२/१२/२००८ व आदेश क्र.मनपा/आयुक्त/२९४/२००९-१० दि. २३/१२/२००९ ने नगररचना विभागास दिले होते हे खरे आहे का? मॅडम यह प्रश्न मैंने पुछा था। उसका जवाब दिया। सोबत यादी जोड्न देत आहे. मैं प्रश्न क्या पुछ रहा हूँ और यादर दे रहे है। मैने प्रश्न पुछा था पूर्व आयुक्त जाधव साहबने और शिवमूर्ती नाईक साहबने ओपन लॅन्ड कर वसुली के लिए आपको कुछ पत्र लिखा है क्या? उन्होने लिखा सोबत यादी जोडून देत आहे. उसका उत्तर हॉ या ना में होना चाहिए। उसके बाद मैने कर विभाग से बार बार कोशिश की इसका जवाब नही दिया। उसके लिए दो महिने निकाले। उसके बाद अतिक्रमण विभाग को पत्र दिया तो अतिक्रमण विभागने बोला की हमने कर विभाग को पत्र दिया है। संपूर्ण लिस्ट दी है, उसके हिसाबसे करआकारणी लिया जाए। आज तक कुछ जवाब नही मिला। जो लिस्ट मिली है वह अधुरी लिस्ट है। उसमे कुछ नही है। उसके बाद मैने सचिव महोदय को पत्र डाला की मेरा प्रश्न आ रहा है आप कर विभाग को पत्र लिखके वापस उसका जबाद दिया जाए। देढ साल हो गया है, उस पत्र का जवाब नही मिला। किन किन बिल्डरने कौन से विकासकर्ता ने कौनसा टॅक्स बकाया है। अगर दिया है तो कौनसी रिसिप्ट नंबर दी थी कौनसे साल मे कितना दिया है, उसका रेकॉर्ड मेरे को नही दिया। आपने मेरे को पत्र का क्या जवाब दिया था। टॅक्स डिपार्टमेंटवाले मेरेसे बात करे।

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. डॉ.रमेश जैन साहेबांनी प्रश्न विचारला आहे. पहिला प्रश्न मनपाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिकोनातून मोकळ्या जागेच्या कराची परिणामकारक वसूली होण्याच्या दृष्टिकोनातून कोणत्याही जमिन मालक, विकासकाकडून मोकळ्या जागेवरील कराचा भरणा केल्याशिवाय सुधारित बांधकाम मंजुरी देण्याचा दाखला, भोगवटा दाखला देण्यांत येऊ नये असे निर्देश देणारे आदेश मा. आयुक्त सो ह्यांच्याकडील आदेश क्र. मनपा/आयुक्त/२९४/२००९-१० दि.२३/१२/२००९ ने दिले होते काय? हे आदेश दिले होते हे खरे आहे, ह्याबाबत २००८ पासून किती बांधकाम परवानग्या दिलेल्या आहेत त्याबाबतचा सर्व तपशिल कर विभागाला दिलेला आहे. ती यादी आपणांस सुध्दा उपलब्ध करून दिलेली आहे. दुसरा प्रश्न आहे. असल्यास १/४/२००८ ते ३१/३/२०१३ पर्यंत नगररचना विभागाकडून दिलेला सुधारित बांधकाम परवानगी दाखला जोत्याचा दाखला प्रत्येक वर्षवार मिळावा ही माहिती दिलेली आहे.

**रमेश जैन :-**

धनेगावे साहब मुझे कर विभाग के दिपक सावंत साहब से बात करना है। आपसे बात करने का कोई मतलब नही है।

**सत्यवान धनेगावे :-**

मा. आयुक्त सो, ह्यांचे आदेश असताना मोकळ्या जागेवरील कराची पावती वसुली न केल्याने मनपाचे कोट्यावधी रूपयाचे आलेल्या नुकसानीस जबाबदार कोण आहे. व्हेकेन्ट अँड टॅक्सच्या बाबतीत सांगू इच्छितो. बांधकाम परवानगी दिल्यानंतर बांधकाम परवानगी दिलेली तारीख, भोगवटा दाखला आणि प्रथम कर आकारणी ह्या कालावधीसाठी ह्या टॅक्सची आकारणी असते. त्यामुळे ह्या मोकळ्या जागेच्या कर आकारणीमध्ये महापालिकेचे नुकसान आजपर्यंत झलेले नाही. फक्त टॅक्सची वसूली कॅरी ऑन होत असते आणि प्रलंबित राहिल्याने ती करण्यांत येणार आहे. त्यामुळे मनपाचे सद्यस्थितीत नुकसान झालेले नाही. व्हॅकेट लॅन्डच्या संदर्भात ................

**रमेश जैन :-**

व्हेकेन्ट लॅन्ड का २००८ से आपने चालू किया है। उस समय कितने बिल्डर और विकासको का बाकी था। कई बिल्डर तो भाग गये आप लोगोने टाईमपे उनको नोटीस नही दिया। अब उनका वसूल कौन करेगा।

**सत्यवान धनगावे :-**

प्रॉपर्टी टॅक्स और रेग्युलर टॅक्स वसुली जैसा कॉर्पोरेशन करता है। यह कॉर्पोरेशन के लिए २००८ से नया टॅक्स है। तो नए टॅक्स क सिस्टम ऑपरेट करने के लिए साहजिकच एक दो साल शुरू का जो पिरेड है एस्टाब्लिशमेंट के लिए जाता है। किसी का नुकसान नही हुआ और सबका डिमांड नोट दिया गया है।

**रमेश जैन :-**

आपने २००८ का २०१२ मे वसूल किया क्या? उसपे ब्याज लिया क्या आपने? जब एक छोटासा व्यक्ती पाणी बिल नही भरता तो उसका नल कनेक्शन काट देते हो। नोटीस लगा देते हो। उसका बोझा बिस्तर बाहर फेक देते हो। तो इनके लिए क्या किया?

**मा. आयुक्त :-**

२००८-०९ मे तत्कालीन मा.महासभा में एक निर्णय लिया था की महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी ज्या ठिकाणी आपण बांधकाम परवानगी देतो त्या ठिकाणी आपण मोकळ्या जमिनीच्या कराची आकारणी करावी. त्यानुसार सुरूवातीला २००८-०९ मध्ये जेव्हा अंमलबजावणीला सुरूवात झाली तो विषय नविन होता. रिकव्हरी थोडी कमी होती. ते मान्य करायला काही हरकत नाही. पण जसजशी रिकव्हरीची सिस्टम सेट झाली. त्यानुसार रिकव्हरी वाढायला लागली. जेव्हा मागच्या वर्षी मा.महासभेमध्ये हा मुद्दा उपस्थित झाला होता. त्यावेळेस मी सांगितले होते की, मी प्रत्येक गोष्टीचा आढावा घेईन. त्यानुसार मी मालमत्ता विभागाचा आणि ओपन लॅन्ड टॅक्स ह्याची वसुली ह्याची आकारणी आणि एकंदरीत रूपरेषा निश्चीत करून दिलेली आहे. त्यानुसार आता निर्णय घेतलेला आहे. जोपर्यंत ओपन लॅन्ड टॅक्सची वसूली होणार नाही तोपर्यंत त्या मालमत्तेची कराची आकारणी करणार नाही. जेणेकरून विकासक आणि बिल्डर जो असेल त्याला ते भरावे लागेल. हे मी सांगतो. १/४/२००८ नंतर कमेसमेंट सर्टिफिकेट दिलेल्या किंवा ओ.सी. न दिलेल्या प्रकरणामध्ये दुसरा मुद्दा एखादा रिव्हाईज परमिशनला आला तर रिव्हाईज परमिशनला देखील जोपर्यंत ओपन लॅन्ड टॅक्स भरणार नाही. तोपर्यंत त्याला परवानगी देणार नाही. किंवा एखादा टी.डी.आर. लोडींगच्या परवानगीसाठी आला तर त्यालासुध्दा हीच कार्यपध्दती अवलंबविण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. ह्यामध्ये ह्याशिवाय अंतर्गत फेरबदल असतील किंवा त्याला ओ.सी. द्यायची असेल ह्याही वेळेस आपण त्यांना जोपर्यंत व्हेकेन्ट लॅन्ड टॅक्स भरणार नाही. तोपर्यंत कुठलीही परवानगी देणार नाही, असा निर्णय घेतलेला आहे. ह्या प्रकरणाचा सगळा आढावा नगररचना विभाग आणि मालमत्ता करामध्ये हा समन्वय साधण्यांत आलेला आहे. ओपन लॅन्ड टॅक्सची दरवर्षी रिकव्हरी नोटीस जाईल ती सुध्दा तरतूद करण्यांत आलेली आहे. आपल्याकडे संगणकामध्ये फक्त मालमत्ता कराच्याच डिमांड नोटीस निघत होत्या. पण त्या संगणक प्रणालीमध्ये फेरबदल करून करासोबतच ओपन लॅन्ड टॅक्सच्या नोटीस निघतील अशी आपण व्यवस्था केलेली आहे. आणि ह्याचा परिणाम असा झाला की आपण दरवर्षी वसूली करतो. त्यामध्ये वाढ झालेली आहे. गतवर्षी फक्त आठ कोटी झाले होते. ह्यावर्षी नविन कार्यप्रणालीमुळे ११ कोटी २१ लाख झालेले आहेत. ह्या जून महिन्यामध्ये साधारणतः चार कोटी वसूल झालेले आहे. थोडक्यात आपली रिकव्हरी डिफर झालेली आहे. पण ती रिकव्हरी झाली नाही आणि नुकसारन झाल अशातला प्रकार नाही. दुसरा प्रश्न असा होता एखादा विकासक इथून निघून गेला तर तो रिकव्हरी कोणाकडून करावी. पण निघून जरी गेला तरी त्याचे आमच्या मनपामध्ये कोठेतरी प्रोजेक्ट चालू आहेत अशा केसेस फार कमी आहेत. त्यांच्याकडून देखील ह्या व्हॅकेन्ट लॅन्ड टॅक्सची वसुली केल्याशिवाय त्यांच्या कोणत्याही प्रकल्पाला, प्रस्तावाला आपण मंजुरी देणार नाही. अशी भूमिका प्रशासनाने घेतलेली आहे. रिकव्हरी आज जरी झाली नाही किंवा सुरूवातीला स्लो होती आता त्याला गती दिली आहे. ह्या गतीमुळे निश्चीतपणे आपल्याला आपले ध्येय गाठता येईल आणि मनपाचे नुकसान होणार नाही. ह्याची दक्षता घेण्यांत येईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, डॉ. रमेश जैन ह्यांच्या प्रश्नावर बोलतो. काही ठिकाणी आपण ओ.सी. न घेता त्यांना सरसकट टॅक्स आकारणी करतो. मग ओ.सी. घेण्याची काही पध्दत नाही का? ओ.सी. न घेणे म्हणजे इनलिगल झाले त्याला आपण शास्ती लावतो.

**मा. आयुक्त :-**

ह्याच्यामध्ये मा. महासभेने निर्णय घेतलेला होता. त्या निर्णयाच्या अनुषंगाने तत्कालीन आयुक्तांनी जे आदेश काढले होते त्यानुसार आता इकडे ओ.सी. घेतली नाही म्हणून आपल्या मनपाचे नुकसान होते. म्हणून आपण असा ठराव केला होता की आपण शास्ती लावावी आणि शास्ती लावून वसूली करावी. म्हणून शास्ती लावून वसूली करतो. आणि ज्या क्षणी त्याला ओ.सी. मिळेल आणि ओ.सी. मिळाल्यानंतर शास्ती ज्या तारखेला मिळाली असेल त्याची शास्ती आपण रद्द करतो. त्याच्यामुळे आपण जर विचार केला की ओ.सी. घेतली नाही म्हणून आपण आकारणीसुध्दा करू नये. तर ते योग्य होणार नाही आणि महासभेने जो ठराव केलेला आहे. त्या ठरावाच्या विसंगत भूमिका घेतली होती.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपल्याकडे आर्किटेक्ट काय करतात. ॲजपर प्लान ह्यांच्या लेटरहेडवर लिहून देतात की, हे प्लॅननुसार बरोबर आहे. ओ.सी. न घेता काही ठिकाणी यु.एस.सी.चा फ्लॅट न देता यु.एस.सी. फ्लॅट आपण देताना महानगरपालिकेचे पत्र आले पाहिजे की २०० स्केवअर मिटरची जागा मला यु.एस.सी. डिपार्टमेंटला मिळाली आहे असे पत्र यायला पाहिजे. ह्या पत्रानुसार नगररचनाने हे पत्र टॅक्स डिपार्टमेंटला वर्ग करायला पाहिजे की, ह्यांची यु.एस.सी. चे जेवढे क्षेत्र आहे तेवढे मिळाले आहे. मिरा भाईंदरमध्ये असे बरेच विकासक आहेत जे यु.एस.सी. फ्लॅट न देता फक्त वास्तूविशारदच्या लेटरपॅडवर ॲजपर प्लान याप्रमाणे फक्त लिहून दिल्याने त्यांना शास्ती न आकारता कर आकारणी करण्यांत आलेली आहे. मग ते नगररचनेचे काम नाही का की त्यांनी यु.एस.सी. फ्लॅट दिले आहेत की नाही दिले. त्याची शहानिशा करून त्यांनी टॅक्स विभागाला पत्र दिले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ह्यामध्ये आपली सुचना चांगली आहे की, मालमत्ता विभागाने कर आकारणी करण्यापूर्वी नगररचना विभागाचा अभिप्राय घ्यावा. तिथून आपले नविन धोरण बदलत गेले आहे. त्याची दखल घेण्यांत आलेली आहे. आता आपण जी काही मालमता कराची आकारणी करू. नगररचना विभागाचा अभिप्राय आल्याशिवाय ती आकारणी होणार नाही हे सुध्दा स्पष्ट करू इच्छितो.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्या विषयाचे मी पत्र दिले.

**मा. आयुक्त :-**

उत्तर मिळेल ना.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, मा.आयुक्त महोदय आपने बोला कोई नुकसान नही हुआ है। सबसे पहले आप ऑडिट डिपार्टमेंट की रिपोर्ट देख लो। आपकी कर आकारणी पुस्तीका तयार नही है। आपका जो रिपोर्ट है उसमे ही आप देख रहे है। जबतक कर आकारणी पुस्तीका नही बनेगी यह जो ११ करोड, २० करोड, ३० करोड, ४० करोड, ५० करोड यह पैसा कब तक जा सकता है। याने की हम पूरे नुकसान पे है। जबतक कर आकारणी पुस्तीका बनेगी ही यह आपका बी.एम.सी. ॲक्ट बोलता है। मैं मानता हूँ आपके आने के बाद और आपके आने के पहले जो प्रथा चालू की है। इसके लिए बहोत रिकव्हरी हो रही है। हमने स्थायी समिती में सूचना दी की दो महिने के अंदर पुस्तीका वह पूरी होगी, तभी आपको मालूम होगा ६६ करोड, ६८ करोड है। बहोत ज्यादा अमाऊन्ट इसमे है। दुसरी बात धनेगावे साहेब बोले नुकसान नही हुआ है। आपका प्रस्ताव क्या है। आपने रिकव्हरी करने का नोटीस दिया तो नोटीस देने के दिन का इंटरेस्ट दे सकते है। २०१० का नोटीस दिया और २००८ से ड्यू था। २ टक्के इंटरेस्ट ले नही सकता तो डेफीनेटली हम लॉस्ट में ही है। आपसे अपेक्षा है आप अधिकारीयों की गलती सामने लाए। आपने जो नोटीस दिया २०११ मे १२ नोटीस दे रहे है तो आप इंटरेस्ट वसूल नही कर सकते. बिकॉज इट वॉज यूअर मिस्टेक दॅड युअर नॉट सर्व्ह द नोटीस तो लॉस्ट तो हुआ ही है। अभी जो काम चल रहा है वह बराबर चल रहा है। लेकीन अभी भी यह बात एक साल हो गया है। यह भी कर आकारणी पुस्तीका भरनी चाहिए और कर आकाणी पुस्तीका संविधान के हिसाबसे बननी चाहिए तो अभी तक बनी नही। इतने लोग देनेवाले है पूरे भाईंदर का एरिया कमर्शियल, ओपन लॅन्ड टॅक्स जबतक इन चार्ज कव्हर नही होगा तब तक आपको मालूम कैसे पडेगा किससे टॅक्स लेनेका है किससे नही लेने का है। आपसे आग्रह है की कर आकारणी पुस्तीका बिनस सारा वादविवाद व्यर्थ है। आप स्ट्रिक ऑर्डर किजीए कैसे भी करके कर आकारणी पुस्तीका तयार किजीए। तभी हमको मालूम पडेगा कितना नुकसान हुआ है।

**मा. आयुक्त :-**

कॉम्प्युटर सॉफ्टवेअर जो तयार किया है उसमे आपने जो मुद्दा लिया कर आकारणी पुस्तीका का वह भी उसमे फेरबदल किया है। पहले मॅन्युअली काम करते थे। हर चीज का हार्ड कॉपी रखना पडता था। अभी कॉम्प्युटर राईज कर रहे है। तो कॉम्प्युटर का प्रिन्ट लेके उसका बाइन्ड करेंगे और उसको सर्टिफाय करवा लेंगे तो आपके मुद्दे का निराकरण हो जाएगा।

**नगरसचिव :-**

आजच्या महासभेकरीता सन्मा. डॉ. नयना मनोज वसानी ह्यांची लक्षवेधी आलेली आहे. सदरची लक्षवेधी मी मा. महापौरांना सुपुर्द करतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम बोलायला दिल्याबद्दल आपले आभार. कायद्यात कुठे बदल होऊ नये. प्रेमनाथ पाटील साहेबांनी जो विषय आता मांडला. प्रेमनाथ पाटील साहेब विसरले असतील म्हणून त्यांना आठवण करून देतो. ह्या मिरा भाईंदर मध्ये ऑक्युपेशन सर्टिफिकेट घेण्यासाठी ६-६ ते १२-१२ महिने ओ.सी. भेटत नाहीत त्याला वेगवेगळी कारणे असतील. आपला मुळ हेतू होता की जे अनधिकृत इमारती आहे. त्यांना शास्ती लावावी. ज्यांनी ओ.सी. घेतले नाही त्यासाठी कायद्यात वेगळी तरतूद आहे. ओ.सी. घेतली नाही. म्हणून आपण काय कारवाई करायला पाहिजे. पण शास्ती त्यांना लावता येणार नाही. म्हणून माझ्या माहितीप्रमाणे

भगवती शर्मानी तो विषय महासभेत आणला होता. एखादी बिल्डींग अधिकृत असतील तर त्याचा भुर्दंड लोकांना पडू नये. कारण बिल्डरने ओ.सी. घेतले नाही. एखादी लिगल बिल्डींग असेल त्याला शास्ती लावू नये असा निर्णय झालेला आहे. त्याच्यात बदल करू नये म्हणून माहिती देतो. आपण आर्किटेक्टचे सर्टिफिकेट घेतो. बिल्डींग लिगल आहे म्हणून शास्ती लावण्यांत येऊ नये. ह्या लोकांनी ओ.सी. घेतली नाही म्हणून ह्या लोकांकडून अनामत रक्कम ॲडव्हान्स भरून घेतो. ओ.सी. घेतल्यावर ते रिफंडेबल करतो. ती अमाऊन्ट लाखो रूपयामध्ये आहे. म्हणजे आपण तरतूद केलेली आहे. त्याव्यतिरीक्त आपल्याला वेगळी काय कारवाई करायला पाहिजे. ओ.सी. घेतली नाही म्हणून वेगळी तरतूद आहे. त्याप्रमाणे साहेब आपण कारवाई करावी. आता राहिला प्रश्न ओप लॅन्ड टॅक्समध्ये परवानगी दिल्यानंतर ओपन लॅन्ड टॅक्स लावायला सुरू करतो. जिथपर्यंत त्याला कर आकारणी होत नाही. तिथपर्यंत ओपन लॅन्ड टॅक्स चालू असला पाहिजे. त्यामधून आपण सोपा मार्ग काढला होता की, ज्यावेळी आपण कर आकारणी करतात जी काही आपली ॲरियर्स असेल ते बिलामध्ये समावेश झाला पाहिजे. आणि मग ते नागरीकांना बिल्डरकडून घ्यावे की काय तो त्यांचा विषय ह्यासाठी चर्चा पण झाली. परंतू इम्प्लीमेंट काही होत नाही. बिल्डर निघून जातात. लोकप्रतिनिधी येतात, बोलतात ह्याची कर आकारणी करा. बिल्डरनी हा कसा भरला मग आपण कर आकारणी करत नसतो. सावंत साहेबांनी अनेक इमारतीला मागची थकबाकी असताना नविन कर आकारणी केलेली आहे. एक बाजूला आपण निल बिल देतो आणि दुसऱ्या बाजूने बोलणार आमचे बाकी आहे. हे दोन्ही चालू शकत नाही. उदा. ह्या शहरामध्ये डी.बी. रिॲलिटी, बालाजी असे मोठमोठे कॉम्प्लेक्स आहेत. त्यांचे पण लाखे रूपये बाकी आहेत ना. मला वाटत नाही. मोठ्या कॉम्प्लेक्सला ५० लाख, ६० लाख बोलले तर ती रक्कम छोटी होणार आहे. आज विषयपण आणला आहे. मलप्रवाह कर काही भागातून कमी कराव. शेवटी उत्पन्नाची बाजू वाढली पाहिजे. खर्च कमी करून चालणार नाही. आपण कोणावर एक्स्ट्रा भुर्दंड टाकत नाही. कोणत्या प्रकारची कारवाई ह्या महानगरपालिकेमार्फत केली नाही की आमचे ५० लाख, ४० लाख बाकी आहेत. परंतू ज्याचे ५०० रूपये बाकी आहेत. त्यांच्यावर कारवाई झाली. ज्याचे २००० बाकी अशा लोकांवर देखील कारवाई झाली. परंतू ज्यांचे ५ लाख, ५० लाख, २५ लाख बाकी आहेत त्यांच्यावर कारवाई झाली नाही. बिल्डर येतो तो आपला हिशोब संगनमत करतो. नविन कर आकाणी करून घेतो. मागची पाटी पुसली, अशाप्रकारे हे कामकाज चालू आहे. आजही त्यांना विचारले तर त्यांच्याकडे ॲक्युरेट लिस्ट नाही. २००८ पासून अनेक कॉम्प्लेक्स चालू आहेत. काहीचे पझेशन झाले आहेत. काहीचे नाही झाले. पण कर आकारणी अजून झालेली नाही. उदा. दोन बिल्डींगला आपण कर आकारणी केली. १० बिल्डींगचे कॉम्प्लेक्स ८ आहे. पण त्याचे काही सिस्टमच नाही. मग १० चे पाठवायचे की ८ चे पाठवायचे अशी काही प्रक्रिया आपल्याकडे नाही. मला वाटते आपला मोठा रेव्हेन्यु व्हेस्ट होत चालला आहे. त्याच्यावर कोणाचे लक्ष नाही. आपल्याला विनंती राहील इनलिगल इमारतीवर शास्ती लावा, ओ.सी. घेतली नाही त्याच्यावर शास्ती लावता कामा नये.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम प्रश्न एकदम सही है। जिन बिल्डरों ने विभिन्न कारणोसे ओ.सी. नही ली, जिसपे इनलिगल कंस्ट्रक्शन नही है। बहोतसे ऐसे कॉम्प्लेक्स है जिसके अंदर में उन्होंने बिल्डींग बनाई बाद में कुछ बिल्डींग बनाई, कुछ की ओ.सी. ली, कुछ की पेन्डीग थी वह बाद में उस बिल्डरने लेली। बहोतसे प्रकरण ऐसे भी है उन बिल्डरो ने दुसरी जगह काम चालू किया यहाँ पे पजेशन दे दिया। पजेशन देने के बाद के अंदर के अंदर में वहाँ पे सोसायटी बहोत जगह के अंदर बनी। उसके बाद बिल्डर ओ.सी. की प्रक्रिया को फिलअप करता नही। वह काफी टाईम रहता है। यहाँ नॉन ऑक्युपेशन चार्ज लगना शुरू हो जाता है। जिस समय के अंदर में ओ.सी. के प्रक्रिया के लिए आता है। बहोतसे नगरसेवक ऐसे है जो उसके पिछे लगते है। क्योंकी वॉर्ड के लोग उनके पिछे लगते है की हमारी ओ.सी. नही आयी। वो उसको फूल फिलअप करते है किसकी एन.ओ.सी. फायर इन एन.ओ.सी. वहाँ पे जाके एक मुद्दा अटक जाता है की उन बिल्डींगो में नॉन ऑक्युपेन्सी चार्ज लगा है। अब वो वहाँ के रहनेवाले बेचारे कैसे भरेंगे। बहोत सी ओ.सी. उनकी कारण से भी आप के पास अटकी है। बिल्डर किधर जाके अलग नाम से कंस्ट्रक्शन करने लग गया। बिल्डर वहाँ पे पाठपुरावा करता नही है। निर्दोश जो रहिवासी है जो कॉम्प्लेक्स वाले, सोसायटीवाले है। वह उसका परिणाम भूगत रहे है। रेव्हेन्यु भी कम नही होनी चाहिए। लेकीन अनावश्यक टॅक्स किसी रहिवासी के उपर नही लगनी चाहिए। अगर ऐसे प्रकरण आपके आसपास किधर आते है और बिल्डर कही काम चालू करते है मैं यह नही बोल रहा हूँ की उनका रेव्हेन्यु माफ करीए।

**प्रभात पाटील :-**

माझा एक मुद्दा आहे शिक्षण, आरोग्य, पाणी, रस्ते, गटार, दिवाबत्ती हे महानगरपालिकेचे सर्वात मोठे ध्येय आहे. सर्वानाच माहित आहे की, गेल्या आठवड्यात शाळा सुरू झाल्या. आपल्या पालिकेच्या मराठी माध्यमाच्या शाळा देखील सुरू झाल्या. दोन विषय आहेत की, मी गेली २२-२३ वर्ष इथे आहे सांगायला अतिशय वाईट वाटते की, आपण शाळा चालू होताना कधीही मुलांच्या हातात गणवेश दिलेले नाही. ह्यावर्षी सुध्दा दिले नाही. ते का होत नाही. मला माहित नाही. पण ह्यावर्षी देखील मुलांना गणवेश मिळाले नाहीत. जी शासनाकडून पुस्तक येतात ती देखील त्यांच्या हातात मिळाली नाहीत. आपण पुस्तक देत नाहीत. परंतु शासनाकडची पुस्तक त्यांच्या हातात पडली आहे की नाही हा मोठा मुद्दा आहे. दुसरी गोष्ट अशी आहे आपण दोन प्रस्ताव आपल्या बजेटमध्ये आणि एक ऐतिहासिक विषय म्हणून आपण दोन विषय बजेटच्या आधी पारीत

केले होते. एक आपण स्वतः आठवीचे वर्ग चालू करतो. त्यासाठी आपण संपूर्ण मिरा भाईंदर शहरामधल्या सातवीतून पास झालेल्या विद्यार्थ्यांचे दाखले रोखून ठेवले आहेत. ते विद्यार्थी नविन शाळेत जाऊ शकत नाही आणि आपण देखील शाळा ओपन केल्या नाहीत. आपण कोणाच्या भावनांशी खेळतो. जे विद्यार्थी त्यांचे भविष्य आणि भवितव्य घडवण्यासाठी आपण शाळा चालवतो. लाखो रूपये खर्च करतो. शाळा चालू होऊन आठवडा झाला. आपण त्याच्यात काय प्रयत्न केले. मला माहित नाही. त्यांच्या भविष्याला आपण खिळ घालतो. हा मुद्दा लक्षात ठेवावा. दुसरा मुद्दा म्हणजे आपण सेमी इंग्रजीचा निर्णय घेतला होता त्याचे काय चालू आहे. मॅडम, सगळ्यात मोठा विषय आहे. ह्या देशाचे नागरीक घडवण्याचा आणि जो नागरीक त्या शाळेवर आपल्या प्रशासनाचे पूर्ण दुर्लक्ष आहे. आपले प्रशासन अधिकारी शाळा सुरू व्हायच्या तोंडावर इथून निघून जातात आणि नविन अधिकारी येतो. ज्याला इकडे प्रस्थापित व्हायला बराच काळ जावा लागतो. हा मुद्दा देखील लक्षात घेतला पाहिजे की ज्या दिवशी शाळा चालू होणार आपल्याला नविन शिक्षण अधिकारी मिळाले. मध्यंतरी पिक्चर आला होता शिक्षणाचे काय? मी तर एवढच बोलेन की मिरा भाईंदर शाळेच्या शिक्षणाचा बट्ट्याबोळच आहे. ह्या विद्यार्थ्यांची जर जडण-घडण झाली नाही तर त्यांचे पाप आपल्या माथ्यावर येईल. हे मला इथे नमूद करावेसे वाटते. आता आपले अधिकारी उत्तर देतील. हि प्रोसीजर चालू आहे. वरातीमागून घोडे काय कामाचे. अशा वेळेला मा. आयुक्त साहेब हे अधिकार आपल्या हातात का घेत नाही? संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शिक्षण मंडळ बरखास्त झाले त्या शिक्षण मंडळाचे काय झाले. त्याचे अधिकार कोणाला दिले. हा विषय महासभेमध्ये आला का? ह्याचा पूर्ण दोष प्रशासनाने आपल्या माथी घ्यावा. आठवीच्या वर्गाचे आणि मुलांच्या युनिफॉर्मचे काय होणार त्याचे उत्तर द्यावे.

**डॉ. आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या प्रभाताताई पाटीलने जो विषय मांडला आहे तो अत्यंत महत्वाचा विषय आहे. शाळेमधूनच देशाचे चांगले नागरीक तयार होत असतात. परंतू मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये नगरपरिषदेपासून बघतो. नगरपरिषदेच्या वेळी देखील लक्ष नव्हते. आणि आता महानगरपालिका स्थापन झाल्यावर देखील पालिकेचे दुर्लक्ष झालेले आहे. शिक्षण खात्याचा बोजवारा उडाला म्हणण्यापेक्षा बट्ट्याबोळ झाला आहे अशा भाषेत देखील खंत व्यक्त केली तरी ती अतिशयोक्ती होणार नाही. १ ली मे ७ वी पर्यंत विद्यार्थी शिकत आहेत. आम्ही हा विषय तीन वर्षापासून धरलेला आहे. परंतू प्रशासन का उदासिन आहे ते समजायला येत नाही. शहरामध्ये जे गोरगरीब विद्यार्थी आहेत त्या गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आशा स्थान आपल्या महानगरपालिकेच्या शाळा आहेत. खाजगी शाळेत जे शिक्षक असते त्या दर्जाचे शिक्षण आपल्या महानगरपालिकेच्या शाळेत मिळत नाही. शाळा चालू होऊन एक आठवडा झाला. मुलांना अजून गणवेश मिळाले नाहीत. ज्या सुविधा द्यायला पाहिजेत त्या मिळाल्या नाहीत. ह्याच्या अगोदर शिक्षण अधिकारी मोहिते होते त्यांची बदली झाली. नविन शिक्षण अधिकारी देशमुख आलेले आहेत. आपल्याला महानगरपालिकेचे शिक्षणामध्ये अमुलाग्र बदल करायचे आहेत. मनपाचे शिक्षण सुधारायचे आहे. ७ वी चे विद्यार्थी पास झाले त्यांना खाजगी शाळेमध्ये प्रवेश मिळालेला नाही. आपली भूमिका अशी आहे की, ज्या सराऊन्डीगमध्ये ज्या खाजगी शाळा आहेत त्याठिकाणी आपल्या ७ वी च्या विद्यार्थ्यांना ८ वीच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला पाहिजे. परंतू खाजगी शाळेने मा. आयुक्तांना, प्रशासन अधिकाऱ्यांना स्पष्ट भाषेमध्ये लेखी पत्र दिलेले आहे की आमच्याकडेच विद्यार्थी जास्त असल्यामुळे आम्ही पालिकेच्या विद्यार्थ्यांना सामावून घेऊ शकत नाही. आपण त्याची स्वतः व्यवस्था करावी. शासनाचे निर्देश आहेत स्पष्ट आदेश आहेत. जी.आर. निघाले आहेत की मनपामध्ये जर प्राथमिक शाळा चालू झाल्या असतील आणि माध्यमिक शाळा चालू करायच्या असतील तर शासनाची कोणत्याही प्रकारची प्रकारची परवानगीची आवश्यकता नाही. तरी देखील आपण का उदासीन आहोत कळत नाही. आपले ११०० ते १२०० कोटीची बजेट आहे. आणि शिक्षण विभागाकडे आपल्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आपल्याकडे निधी उपलब्ध नाही. महासभेने ठराव केलेला आहे. आम्ही मागच्या महासभेत ठराव केलेला आहे. आम्ही मागच्या महासभेत १०० कोटींची तरतूद करायला सांगितले आहे. तरी तरतूद झाली नाही. मराठी माध्यमचे २८२ विद्यार्थी आहेत. त्यांना अजूनही प्रवेश मिळाला नाही. ऊर्दुचे २२१ विद्यार्थी आहेत. हिन्दी मिडीयमचे ३०० विद्यार्थी आहेत, गुजराती मिडीमयचे १०००-१२०० विद्यार्थी आठवीच्या शिक्षणापासून वंचित आहेत. आपल्या प्रशासन अधिकाऱ्यांनी सातवीच्या मुख्याध्यापकांना सांगितले आहे की, त्यांना एल.सी. देऊन टाका आणि मोकळे करा. म्हणजे त्या विद्यार्थ्यांनी बालमजूरीवर जायचे का? प्रशासनावर गुन्हा दाखल होण्याची तुम्ही वाट बघता का? शासनाचा नियम आहे की, आपण आपल्या स्तरावर आपली कॅपेसिटी आहे. आपल्याकडे फंड आहे. पण आपण शाळा सुरू करत नाही. मा. आयुक्त साहेब आपल्याकडे का उदासिनता आहे कळत नाही. प्रशासनाने खुलासा करावा की आतापर्यंत काय केल.

**मा. महापौर :-**

आसिफ शेख साहेब बसून घ्या. प्रशासन त्याचा खुलासा देईल.

**लियाकत शेख :-**

मॅडम हा ज्वलंत विषय आहे. त्यामुळे ह्याचा खुलासा झाला पाहिजे.

**डॉ. आसिफ शेख :-**

ठाणे महानगरपालिका आयुक्तांनी तसेच नवी मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी शिक्षण मंडळ बरखास्त करून नविन शिक्षण समिती स्थापन केलेली आहे. आणि त्याची जबाबदारी उपायुक्त दर्जाच्या

अधिकाऱ्यांना दिली आहे. त्याप्रमाणे आपण काय पुढचे करणार की नाही. ९ वी ते १२ वी पर्यंत पूर्ण करायचे आहे. त्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभे करायचे आहे. त्याच्यावर प्रशासन लक्षच देत नाहीत. आपल्याकडे अतिरिक्त आयुक्त आहेत सगळे आहे पण कामच होत नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. आसिफ शेख साहेब बोलतात सेमी इंग्रजी आणि आठवीचे वर्ग दोन विषय आहेत त्यांच्यावर सभागृहाला मी माहिती देऊ इच्छितो की सेमीच्या दृष्टिने पूर्ण तयारी करून कार्यवाही चालू केलेली आहे. १९० शिक्षकांचे ट्रेनींग घेतले त्याप्रमाणे सेमी इंग्रजी सगळीकडे कार्यरत झालेले आहे. दुसरा मुद्दा आठवीच्या वर्गाबाबत त्याचा पण पूर्ण आढावा घेऊन तसेच शाळांचा आढावा घेऊन त्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे. त्यासाठी शासनाच्या परवानगीची आवश्यकता आहे. राज्यस्तरावर ह्याची मिटींग झाली. तेव्हा संचालकांनी सांगितले की मनपा क्षेत्रामध्ये कुठल्याही प्रकारे आठवीचे वर्ग सुरू करताना आमच्याकडे प्रस्ताव पाठवा. त्याप्रमाणे प्रस्ताव शासनाकडे दाखल केलेला आहे. त्याची परवानगी मिळाल्यानंतर निश्चीत चालू करणार.

**डॉ. आसिफ शेख :-**

आपण चुकीची माहिती सभागृहाला देत आहात. शासनाचा जी.आर. आहे त्याच्यात शासनाचे स्पष्ट जी.आर. आहेत त्याच्यात शासनाच्या परवानगीची आवश्यकता नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मी चुकीचे अजीबात बोलत नाही. पूर्ण जाणीवपूर्वक बोलतो माहिती घेऊन बोलतो. शिक्षण अधिकारी राज्यस्तरावर मिटींगला गेले होते. त्यांना स्पष्ट सुचना दिल्या होत्या. त्यांनी आम्हांला रिपोर्ट केला. मा.आयुक्तां सोबत चर्चा झाली. शक्यतो त्यांनी नाही म्हटले तरी आपला प्रस्ताव जाऊ द्या. त्यांची मानसिकता आहे की, राज्यस्तरावर मनपा क्षेत्रामध्ये ८ वी चे वर्ग चालू करण्यांत येऊ नये. आपल्या मनपा क्षेत्रामध्ये त्याची गरज पाहता आम्ही आमचा प्रस्ताव पाठवला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम प्रश्न असा आहे तुमचा प्रस्ताव जाईल. पण आता जी ७ वी ची मुलं पास झाली आहेत त्यांना ८ वी त प्रवेश कुठे द्यायचा.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

आपल्याला गव्हरमेन्टची परवानगी येत नाही आपण चालू करू शकत नाही.

**डॉ. आसिफ शेख :-**

मा. आयुक्त साहेब आपण दिशाभूल करता ह्या विषयावर दिपक सावंत ह्यांनी माझ्या समोर शिक्षण उप-संचालकांना फोन लावला. त्यांनी सांगितले की आमच्या परवानगीची अजिबात आवश्यकता नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा. सदस्य जेव्हा मा. आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त बोलतात तेव्हा दिपक सावंत ह्यांनी काय बोलले त्याला महत्व राहत नाही. जे रेकॉर्डवर आम्ही बोलतो त्यानंतर बाकीच्या गोष्टी खाजगीत चालल्या आहेत. त्याला काही व्हॅल्यु नाही. शासनाकडे प्रस्ताव पाठवला आहे. शासनाचा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर शाळा चालू करण्यांत येईल.

**डॉ. आसिफ शेख :-**

शासनाच्या परवानगीची आवश्यकता नाही. आमच्याकडे जी.आर. आहे. तुम्हाला कोणत्या शिक्षण अधिकाऱ्यांने सांगितले आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मोहिते नावाचे शिक्षण अधिकारी.

**डॉ. आसिफ शेख :-**

नविन शिक्षण अधिकारी आले आहेत त्यांच्या बरोबर आमची चर्चा झाली. त्यांनी पण सांगितले अजिबात गरज नाही.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

साहेब राज्य शासनाच्या वतीने इथे सर्व सन्मा. सदस्यांना घर तिथे प्रत्येक व्यक्ती साक्षर होण्यासाठी अभियान चालू केले. आणि शाळाबद्दल विविध माहिती दिली गेली ती दिशाभूल होती का? जर शासनाने अजूनही परमिशन किंवा शाळासंदर्भात सिरियस नसेल. तर ही फक्त प्रशिक्षण देण्याची दिशाभूल होती का? त्याबाबतीत सिरियस का नाहीत.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मॅडम ८ वी चे वर्ग चालू करण्याच्या दृष्टिने प्रयत्न चालू आहेत. तोपर्यंत आपल्याला मुलांच्या काही अडचणी असतील तर ह्या ठिकाणी बसून खाजगी शाळेत समावेश करू.

**प्रभात पाटील :-**

ती जी ८ वी ची मुलं म्हणता आसिफ शेख म्हणतात खाजगी शाळा प्रवेश देत नाहीत. आतापर्यंत अस झाल नाही. आपली मुल खाजगी शाळेत गेले आहेत, त्यांच्या ह्या मताशी मी सहमत नाही. परंतू आपल्याकडे ७

वी तून पास मुलांचे दाखले आपण रोखले आहेत. कारण आपल्या शाळा होतात म्हणून. मला एवढेच म्हणायचे आहे की शाळा सुरू होऊन आठवडा झाला आणि आपण कुठेच तयारीला लागलो नाही. आपण अजून प्राथमिक चर्चेत आहोत की त्यांची परमिशन येईल आणि आपण चालू करू.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

आपण शाळा चालू करण्याच्या दृष्टिने प्रयत्नशिल आहोत. परवानगी येत नाही तोपर्यंत आपण त्या मुलांना प्रवेश देण्यासाठी मदत करणार आहोत. दाखले रोखले नाहीत.

**प्रभात पाटील :-**

दाखले दिले नाहीत. तुम्ही कन्फर्म करा. अनिता पाटील तुम्ही ह्या विषयावर बोला. तुमच्या भागातले दाखले रोखले आहेत.

**निलम ढवण :-**

जून महिन्यात शाळा चालू होतात. त्याच्यापूर्वी ह्याची दखल घेतली गेली पाहिजे होती. बाकी काही गोष्टी सिरियस फॉलोअप होतो. त्या गोष्टी करून घेतल्या जातात. मुलांच्या शिक्षणांसाठी एवढे सिरियस का नाहीत.

**प्रभात पाटील :-**

मॅडम मी त्या क्षेत्रात खालच्या लेवलवर काम केले आहे. अनधिकृत शाळा देखील बंद केल्यानंतर त्या मुलांचे नुकसान होऊ देत नाही. त्यांना शासन दरबारी मदत केली जाते. त्यांना शाळेत पाठवलं जात. साहेब आपण आठवीचे वर्ग चालू करा. आपल्या विद्यार्थ्यांना काही होणार नाही. परंतू त्यांचे वय वाया जाऊ देऊ नका.

**सुहास रकवी :-**

शितोळे साहेबांना एक विनंती आहे त्यांनी नविन आलेल्या शिक्षण अधिकाऱ्यांची आठवण करून द्या. त्यांनी आसिफ शेखना आमच्यासमोर माहिती दिली होती. दिपक सावंत सुध्दा फोनवर बोलत होते. तेव्हा तुम्ही सुध्दा होते. एखाद्या संबंधित अधिकाऱ्याकडे जायचे त्यांनी दिलेली माहिती खरी समजायची की खोटी समजायची. ते तुम्ही सांगा. साहेब त्यांनी अगदी हा प्रश्न जीवंत आणि ज्वलंत आहे तर त्यांच्यावर निर्णय घ्या हे ते पोटतिडकीने बोलत होते. तेव्हाच सावंत साहेबांनी फोन लावून दिला आणि तुम्ही म्हणता हि दिशाभूल आहे. तुम्ही त्या शिक्षण अधिकाऱ्याला सांगा की ह्या विषयावर त्यांना काय माहिती आहे. जी.आर. निघाला आहे का? त्या जी.आर. प्रमाणे आपण शाळा सुरू करू शकतो का? त्या संबंधित ते आपल्याला माहिती देतील.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मा. आयुक्तांच्या दालनात झालेली चर्चा आहे तीच आपल्याला सांगितली.

**सुहास रकवी :-**

तुमच्या दालनात चर्चा झाली. तत्पुर्वी आसिफ शेख, प्रभात ताई मी स्वतः होतो. आणखी नगरसेवक होते. मग त्यावेळेला माहिती देतात ती खरी की आताची माहिती खरी.

**डॉ. आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर किंवा सर्व लोक प्रतिनिधी म्हणा. कमीत कमी २-३ वर्षापासून ह्या विषयाच्या मागे आहेत. अतिरिक्त आयुक्तांची जबाबदारी एवढी निश्चीत नसते. मा.आयुक्तांनी खुलासा करावा. मा. आयुक्तांनी सर्व अधिकार आपल्या अधिकाऱ्यांना दिलेले असतात. मा.आयुक्तांना आम्ही भेटलो चर्चा झालेली आहे. काल पालक आणि विद्यार्थी भेटले. मा.आयुक्तांनी स्पष्ट सांगितले आहे की, आचारसंहिता संपल्यावर मी ताबडतोब मानधनावर शिक्षकांची भरती करण्यांसाठी जाहिरात काढतो. परंतू अद्याप जाहिरात काढली नाही, का काढली नाही. १२०० विद्यार्थ्यांसाठी काय करणार? ते शिक्षणापासून वंचित राहिले तर त्याची जबाबदारी कोणाची आहे. प्रशासन म्हणून तुमची आहे ना. तुम्ही जबाबदारी घेतली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

ह्यामध्ये आपण दोन गोष्टी म्हटल्या आहेत. आठवा वर्ग सुरू करावा. आठवा वर्ग सुरू करताना आपली पटसंख्या किती आहे. नियम असा आहे की ५०० मीटरच्या परिसरामध्ये जर पर्यायी व्यवस्था असेल तर तिथे शाळा सुरू करण्यांत येऊ नये. मिरा भाईंदर शहरामध्ये सर्वांना माहित आहे ५०० मिटरच्या परिसरामध्ये आठवा वर्ग असलेल्या त्या खाजगी असो अनुदानित असो विना अनुदानित असो ज्या शाळा आहे त्या या नियमाला अपवाद करून नंतर आठवा वर्ग सुरू करण्यासाठी शासनाच्या परवानगीची आवश्यकता आहे. त्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. ह्या प्रस्तावाला मी स्वतः पाठपुरावा करत आहे. हा पाठपुरावा पूर्ण झाल्यानंतर पुढची कारवाई करण्यांत येईल. आपला हा मुद्दा की परवानगीची आवश्यकता नाही. तर परवानगीची आवश्यकता का आहे. मी आपल्याला सांगितले मला वाटते त्याने आपले समाधान होईल. दुसरा मुद्दा आपण म्हटले शिक्षकाची भरती शासनाचे अलीकडचे आदेश आहेत की, आपल्या ठाणे जिल्ह्यामध्ये काही अतिरिक्त शिक्षक झाले आहेत आणि नविन भरती करताना ती भरती सुरू करण्यापूर्वी अतिरिक्त शिक्षकाचे वर्गीकरण झाले. आणि त्यामध्ये आपल्याला आवश्यक जी संख्या आहे ती पूर्ण झाली तर भरती करण्याची आवश्यकता नाही. आपल्या ठाणे जिल्ह्यामध्ये जवळपास तीन हजार अतिरिक्त शिक्षक आहेत, अशी आमची माहिती आहे. ती तीन हजार शिक्षक कोणत्या मनपा क्षेत्रामध्ये द्यावे किंवा कोणत्या तालुक्यामध्ये द्यावे. पंचायती क्षेत्रामध्ये द्यावे, त्याचे सुध्दा काम

चालू आहे. ते पूर्ण झाल्याशिवाय आपल्याला भरती करता येत नाही. ती झाल्यानंतरच ॲडव्हटाईज काढता येईल. आपण मिटींग घेतली. मिटींगमध्ये मी ऑलरेडी सांगितले होते पण ह्या ज्या गोष्टी आहेत त्याची पूर्तता झाल्याखेरीज पुढे पाऊल टाकता येत नाही. हे सुध्दा आपण मान्य करा.

**डॉ. आसिफ शेख :-**

मानधनावर आपण भरती करू शकतो. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम अन्वये मा.आयुक्तांना अधिकार आहेत की सहा महिन्याच्या पिरेडप्रमाणे आपण मानधनावर भरती करू शकतो. त्याप्रमाणे भरती करा. आणि १२०० विद्यार्थ्यांचे कल्याण करा. ते प्रवेशापासून वंचित आहेत. त्यांनी बालमजूरीवर जायचे का? खुलासा करा. विषय संपला.

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीता सन्मा. सदस्या श्रीम. नयना वसानी ह्यांची लक्षवेधी आलेली आहे ती मी स्विकारत आहे.

**सुरेश म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम ह्याचा खुलासा करा. मा. आयुक्तांना पाठीशी घालता.

**लियाकत शेख :-**

ह्याचा खुलासा झाला पाहिजे.

**सुरेश म्हात्रे :-**

आम्ही लोकांसाठी भांडतो.

**जुबेर इनामदार :-**

मी ह्या विषयावर उपायुक्तांना संपर्क केला होता. सातवीचे दाखले देण्यांत आलेले नाहीत. शाळांनी अशी भूमिका कुठल्या आधारावर घेतली. कुठल्या अधिकाऱ्यांनी त्यांना सुचना केल्या की त्यांनी दाखले देऊ नये. शाळा चालू होऊन १५ दिवस होऊन गेले असताना त्यांना कुठल्या शाळेमध्ये प्रवेश मिळेल. हा विषय शहराच्या भविष्याला निगडीत आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मुलांच्या प्रवेशाला काही अडचण आली तर त्यांना मदत करून निश्चीत प्रवेश मिळवून देऊ.

**जुबेर इनामदार :-**

हे तुम्ही पुढचे बोलता. ही जी भूमिका घेण्यांत आली ती कोणाच्या आदेशावर घेण्यांत आली.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मी आता शिक्षण अधिकाऱ्यांशी चर्चा केली असे काही सांगितले नाही दाखले देण्यांत यावे असे सांगून टाकले आहे.

**प्रभात पाटील :-**

प्राथमिक शिक्षण सातवीत संपते. तेव्हा सातवीचा रिझल्ट आणि दाखला बरोबर दिला जातो. मग कोणाच्या तरी सांगण्यावरून थांबवल असेल. आपली पुढे प्रोसीजरच नाही. मग दाखले का थांबले.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

आपल्याकडे आठवीचे प्रस्तावित चालले होते. म्हणून त्यांनी प्रयत्न केला.

**प्रभात पाटील :-**

मला तेच सांगायचे आहे आपण त्यांचे दाखले थांबवले त्यांच्या कल्याण्यासाठीच थांबवलेत पण त्याची तयारीपण व्हायला पाहिजे होती.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

तयारी आहे ना. शासनाकडे प्रस्ताव दिलेला आहे. शासनाकडे तीन महिन्यापासून चालू होते.

**मा. महापौर :-**

मॅडम मी स्वतः त्यांच्याशी बोलले. त्यावेळी ते बोलले की, ह्या वेळेला कदाचित परवानगी भेटणार आहे. त्यासाठीच थांबले असतील. मार्चमध्ये गणवेश आणि पुढचे शिक्षण ह्यासाठी मिटींग घेतली.

**प्रभात पाटील :-**

मला तेच म्हणायचे आहे की, होणार आहे म्हणून दाखले थांबवले मी नाही म्हणत नाही. साहेब ते होणार आहे तर आपली देखील तेवढी तयारी पाहिजे होती. आणि जरी आज नाही आहे आपण थोडीशी इनेसिटीव्ह घ्या. थोडी रिस्क घ्या. वर्ग चालू करा. कोणीही परवानगी नाकारणार नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. शासनसुध्दा विचार करते. अनधिकृत शाळेतल्या मुलांना मोकळे सोडले जात नाही. त्यांचा अभ्यासक्रमपण चालू झाला आहे.

**लियाकत शेख :-**

मा.महापौर मॅडम गेल्या वर्षी १ ली ते ७ वी विद्यार्थी ऑक्टोबर नोव्हेंबरमध्ये साहित्य पुरविण्यांत आले होते. ह्यावर्षी डिसेंबरपर्यत मिळेल अशी आम्ही अपेक्षा बाळगू का? अजून पर्यंत टेंडरींग झाले नाही. वर्क ऑर्डर झालेली नाही. वर्क ऑर्डर झाल्यानंतर २-३ महिने तयार करायला लागतात. मग मुलांना ते साहित्य कधी भेटेल त्याचा खुलासा कोण करणार आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

गेल्यावर्षी निश्चित विलंब झालेला होता. पण ह्यावर्षी एवढा विलंब होणार नाही. शाळा सुरू व्हायच्या अगोदर द्यायची आमची भूमिका होती. लोकसभेची आचारसंहिता आडवी येऊ नये म्हणून त्यापूर्वीच प्रोसेस चालू केली. परंतू काही गोष्टीमध्ये टेंडर कमी आलेले आहेत. ते आपण रि-टेंडर करतो. बाकीच्या गोष्टीचा पाठपूरावा चालू आहे. टेंडरीगचे रिपोर्ट आले की त्यांना आम्ही वर्क ऑर्डर देतो. जुलैमध्ये त्यांना साहित्य देऊ.

**निलम ढवण :-**

गेल्यावर्षी एप्रिल महिन्यात महासभा झाली होती. त्यावेळी देखील हा विषय असाच निघाला होता. मागच्या वर्षी पण हीच अवस्था झाली होती.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

मागच्या वर्षी विलंब झाला होता. ह्या वर्षी एवढा होणार नाही. पुस्तक, वह्या वाटप झालेले आहे.

**लियाकत शेख :-**

मा. आयुक्त साहेब आताच आपण सांगितले की, ५०० मिटर एरियामध्ये असलेल्या शाळांना नंतर वेगळे नियम लागू होतात. आपल्याला वेगळी परवानगी घ्यायला लागेल. ५०० मिटरमध्ये बऱ्याच शाळा आहेत. परंतू त्या आपल्याला ॲडमिशन देण्यासाठी कारण मराठी मिडियमचे विद्यार्थी आहेत आणि आता ९० ते ९५ टक्के इंग्रजी मिडियमच्या शाळा आहेत. त्या विद्यार्थ्यांना ८ ते १० दिवस विलंब झालेला आहे. आता त्याच्यासाठी दाखले देणार, पत्र देणार, शिक्षण मंडळ सभापती, आयुक्त, उपायुक्त जे कोणी पत्र देतील त्यांची दाद लावत नाही. तर अशा विद्यार्थ्यांच्या भविष्याचे काय? आपली ठोस भूमिका काय असणार. कृपया सभागृहाला माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :-**

आपण जो मुद्दा सांगितला की बाकीच्या इंग्लिश मिडीयमच्या शाळा आहेत आणि आपल्या मराठी मिडीयमच्या शाळा आहेत. आपण सगळा आढावा असा घेतला की भाषानिहाय ही इंग्रजी, हिंदी, मराठी, ऊर्दु चारही शाळेचा आपण आढावा घेतला. आढावा घेतल्यानंतर आपल्याला असे दिसले त्यामध्ये काही ठिकाणी दोन्ही शाळा सुरू करणे आवश्यक आहे. म्हणून ५०० मिटरची अट शिथिल करा किंवा ते शिथिल करणे शक्य नसेल तर आहे त्या शाळेमध्ये आमचे विद्यार्थी सामावून घेतले जातील. त्याला परवानगी द्या. असा आपला प्रस्ताव आहे. हे करीत असताना काही विद्यार्थी वंचित राहिले असतील किंवा राहण्याची शक्यता निर्माण झाली असेल. त्यासाठी विशेष प्रयत्न करून एकही विद्यार्थी प्रवेशाविना राहणार नाही ह्याची दक्षता घेण्यांत येईल.

**लियाकत शेख :-**

मा. आयुक्त साहेब ह्यांच्यात आपल्याला आर.टी.आई. खाली अधिकार दिले आहेत की आम्ही कुठल्याही शाळेत जाऊन ॲडमिशन घेऊ शकतो. म्हणजे आपल्या मनपाला म्हणा किंवा स्थानिक संस्थेला म्हणा.

**मा. आयुक्त :-**

ह्याच आधारावर मी म्हटलेले आहे की, जितके आपले काम होते त्याच्या नियमाचा आधार घेऊन कोणालाही वंचित ठेवले जाणार नाही ह्याची मी आपल्याला ग्वाही देतो.

**लियाकत शेख :-**

त्याच्यात एक टेक्नीकल मुद्दा आहे. त्याच्यात एक क्लॉज लिहिली आहे. अटीशर्ती देताना त्यांच्यात लिहिले आहे ज्या अल्पसंख्यांक शाळा आहेत त्यांना त्या तरतूदी लागू नाहीत. इथे ८० टक्के शाळा त्याच पध्दतीच्या आहेत. २० टक्के शाळेत त्याचे पुर्नःवसन कसे करणार. त्याचे अवलोकन करून त्याचा अभ्यास करावा.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय आपण परवानगीसाठी प्रस्ताव पाठवलेला आहे. जी.आर. आम्ही वाचला नाही. चर्चेमध्ये दिपक सावंत साहेबांचे नांव येते. एक चांगल्या वातावरणात ती चर्चा झाली असेल माहिती घेतली असेल. विषय असा आहे. परवानगी मागितलेली प्रस्ताव पाठवला आहे. जी.आर.मध्ये प्रस्ताव पाठवा, असा उल्लेख असेल. आर्थिक परिस्थिती कमकूवत असते म्हणून ते मनपाच्या शाळेत मुलांना पाठवतात. मनपाच्या शाळेमध्ये प्रथा आहे. एका वर्गामध्ये ५ वी चा विद्यार्थी, ६ वी चा विद्यार्थी एका वर्गामध्ये २-३ वर्ग चालवतो. ह्या परिस्थितीत तसे चालवणार. ७ वी व ८ वी चा चालवणार त्या दृष्टिकोनातून मा.आयुक्त महोदय विचार करावा आणि ते होत असेल तर ह्या वर्षापासून ते चालू करावे. दाखले दिले गेलेले नाहीत. शाळेचे प्रवेश झाले. शाळा चालू होऊन १५ दिवस झाले. आपल्याला जे करता येईल ते केले पाहिजे.

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त महोदय आपणांस एक नम्र विनंती आहे की, आपल्या मिरा भाईंदरच्या ज्या खाजगी शाळा आहेत. त्यांच्यावर आपल्या शिक्षण मंडळाचा जरापण दबदबा नाही. मागे महासभेत एक नियम आलेला की एकही मुलगा शिक्षणापासून वंचित राहीला नाही पाहिजे. जी मुल गरिब असतील किंवा अनाथ असतील अशा मुलासाठी आपल्या शिक्षण मंडळाकडून लेटर लिहून दिले त्या शाळेसाठी लिहून दिले की, ह्याच्या फीजमध्ये कमी करा किंवा ह्यांच्याकडून डोनेशन घेऊ नका. तर ते शाळेवाले आपल्या शिक्षण मंडळाची इज्जत करत नाही. ते लेटर आपल्यासमोर कचरा पेटीत टाकून देतात. आणि सांगतात अशी लेटर

आम्ही खूप बघीतले. पालकांना सांगतात तुम्ही अशी रेफरेन्स लेटर आणले तर आम्ही तुम्हाला उभे करणार नाही. आणि प्रायव्हेट शाळेत त्या बाईला अक्षरशा रडायला लावतात. एवढी वर्ष तिने फीज भरली. ज्यांची ३-३ मुले एका शाळेत शिकतात तर आपण त्यांना रिक्वेस्ट करतो की १ किंवा २ मुलांची ५०-५० टक्के किंवा ७५ टक्के किंवा २५ टक्के जे काही तुम्ही मदत करू शकत असाल ती तुम्ही करा. ते त्यांचे ऐकत नाही. आपले तिकडे का वजूद राहत नाही. मला ह्याची खंत वाटते.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. लक्षवेधी सुरूवात करा.

**नयना वसानी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. माझा लक्षवेधीचा विषय शाळांशी संबंधीत आहे. दिनांक १०/०६/२०१४ रोजी दैनिक पुण्य नगरीमध्ये आपल्या मिरा भाईंदर शिक्षण विभागाने मनपा क्षेत्रातील आपली शाहू विद्यालय मराठी माध्यम, पेणकरपाडा आणि किंग जॉर्ज स्कूल इंग्रजी माध्यम कनकिया पोलिस स्टेशन समोर ह्या दोन शाळा अनधिकृत असल्याचे मनपा शिक्षण विभागाने म्हटले आहे. माझा हा प्रश्न आहे की, ह्या दोन शाळा आपण १० जून २०१४ ला ह्या शाळा अनधिकृत केल्या. १० ते १२ तारखेला सगळ्या शाळा सुरू होतात. त्यांच्या ॲडमिशनची प्रक्रिया पूर्ण झालेली असते तेव्हा ही यादी आपल्याला लवकर जाहिर का करता येत नाही. म्हणजे ह्यांच्यासाठी ७ तारखेला वर्तमानपत्राने प्रशासनला एक प्रश्न विचारला आहे की, अद्यापही प्रशासनाने अनधिकृत शाळेची माहिती जाहिर केली नाही. हे ७ तारखेला दैनिक पुण्य नगरीमध्ये प्रसिध्द झाल्यानंतर आपली मनपा जागी झाली आहे. आणि १० तारखेला यादी जाहिर केली आहे. तर ही यादी आपल्याला लवकर का जाहिर करता येत नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सन्मा.नगरसेविका म्हणतात त्याप्रमाणे वृत्तपत्रात आलेल्या बातमी नंतरच प्रशासनाने अनधिकृत शाळेची यादी पब्लिश केलेली आहे. मान्य आहे. त्याप्रमाणे संबंधित शाळांना नोटीस दिलेली आहे. कुठल्या प्रकारे प्रवेश देऊ नये म्हणून त्यांना लेखी कळवले आहे. शाळांना परवानगी दिलेलीच नव्हती. त्यामुळे त्या अनधिकृत आहे हे निश्चीत. ह्या ठिकाणी पालकांनी जर ऐकले नाही त्यांच्यावर आर.टी.आई. अन्वये कारवाई करणार आहोत.

**नयना वसानी :-**

साहेब त्या शाळा १० तारखेला अनधिकृत जाहिर केल्या आहेत आणि शाळांचा प्रवेश जो आहे तो शाळांचा निकाल लागल्यावर लगेच एप्रिल किंवा मे पर्यंत होतो. तर त्या मुलांचे आपण काय करणार? एका शाळेमध्ये कमीत कमी दोन हजार विद्यार्थी आहेत. आपण दैनिक पुण्य नगरी ह्याच्यामध्ये अनधिकृत शाळेची यादी जाहिर केलेली आहे. आता छत्रपती शाहू विद्यालय पेणकरपाडा हे अशा विस्तारामध्ये आहे. तिकडे सगळेच पालक वर्तमानपत्र वाचत नाही. तर त्या शाळेच्या बाहेर असे काही नोटीस लावले आहे की, की ही शाळा अनधिकृत जाहिर केली आहे इथे ॲडमिशन घेऊ नये. सगळ्याच पालकांना ते कळत नाही.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

त्यांना नोटीस दिलेली आहे.

**नयना वसानी :-**

साहेब शाळांना नोटीस दिलेली आहे. शाळा सांगणार आहे का? आमची शाळा अनधिकृत आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

त्या दोन शाळा बाबतीतच मी बोलतो.

**नयना वसानी :-**

मनपातर्फे बाहेर कुठली नोटीस लावली का? ही शाळा अनधिकृत आहे. तिथे पालकांनी प्रवेश घेऊ नये.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

सुचना स्वागतार्थ आहे तिकडे बोर्ड लावण्यांत येईल.

**नयना वसानी :-**

ह्या दोन शाळा ज्यास अनधिकृत जाहिर केल्या त्या एक दिवसात अस्तित्वात आल्या नाहीत. ह्या शाळेमध्ये ७ वी पर्यंतच्या इयत्ता चालू आहेत. त्या सात वर्षात आपण त्यांच्याकडून पाण्याचे बिल, मालमत्ता कर वसूल केले ती सात वर्ष प्रशासन झोपले होते का?

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ह्या दोन शाळांची माहिती मिळाली बरोबर आहे. विलंब झाला..त्याच्या व्यतिरिक्त शिक्षण अधिकाऱ्यांना सुचना दिल्या ह्यांच्या व्यतिरीक्त कुठे अनधिकृत शाळा आहेत का खात्री करा.

**नयना वसानी :-**

१८/०६/२००९ रोजीच्या मा. महासभेमध्ये २३ शाळा अनधिकृत जाहिर केल्या होत्या. ११ शाळेची मान्यतेसाठी प्रस्ताव होते. त्यांना मान्यता दिली. त्याच्यातल्या १२ राहिल्या. त्यातील ह्या दोनच अनधिकृत जाहिर केल्या. ज्या १० शाळा होत्या त्या मान्यताप्राप्त आहेत का? त्याची यादी आपल्याकडे आहे का? त्यांना आपण मान्यता दिली नाही तर ०५ वर्षात त्या १० शाळेवर काय कारवाई केली.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

त्या अनुषंगाने चौकशी करण्याचे शिक्षण अधिकाऱ्यांना सांगण्यांत आले आहे.

**नयना वसानी :-**

साहेब चौकशी करून चालत नाही. आपले अधिकारी फक्त शाळांना नोटीसा देतात. आपण त्यांच्यावर गुन्हा दाखल करतो का? एफ.आय.आर. दाखल करतो का? त्याची मला कॉपी द्या.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

अनधिकृत शाळा असतील तर त्याच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यांत येतील.

**नयना वसानी :-**

मी भाईंदर पोलिस स्टेशनला गेले असताना मला असं सांगण्यांत आले की, आमच्याकडे मनपाचे पत्र येते की ही शाळा अनधिकृत आहे. परंतू जोपर्यंत अधिकारी स्वतः येऊन जोपर्यंत इकडे एफ.आय.आर. दाखल करत नाही. आम्ही एफ.आय.आर. दाखल करत नाही. आपण किती शाळांवर एफ.आय.आर. दाखल केली.

**मा. आयुक्त :-**

ह्यामध्ये गतवर्षी दोन एफ.आय.आर. दाखल केलेले होते. एफ.आय.आर. दाखल करण्याची प्रक्रिया फार वेळ खाऊ आहे. तरी आपल्या अधिकाऱ्यांनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत एफ.आय.आर. दाखल केलेले आहे. ह्या वेळेस आपण जो सर्व्हे केला. सर्व्हे मध्ये आपण जेव्हा म्हणतो दोन शाळा अनधिकृत आहे. त्यांचे फक्त बोर्ड लावले होते म्हणून त्यांला अनधिकृत डिक्लेअर केले. त्यांच्याकडे कोणतीही परवानगी नव्हती. ह्याच्या नंतर देखील त्यांनी प्रवेश घेतला किंवा शाळा सुरू ठेवल्या तर त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यांत येईल. ह्यापुढे त्याची व्यापक प्रसिध्दी दिलेली आहे. न्यूजपेपरमध्ये दिलेले आहे. शाळांची यादी प्रसिध्द केलेली आहे. नगरसेवकांना माहिती दिलेली आहे. शाळेसमोर बोर्ड लावण्याची देखील कारवाई करण्यांत येईल आणि मिरा भाईंदर शहरामध्ये असलेल्या सगळ्या शाळांची पुर्नःतपासणी करण्यांत येईल. त्यांच्यात कोणी अनधिकृत आढळले तर त्याच्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यांत येईल.

**नयना वसानी :-**

सर एवढी वर्ष ज्या अधिकाऱ्यांनी ह्या शाळेला पाठीशी घातले त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार? माझी अशी मागणी आहे की त्यांना त्वरीत निलंबित करा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम अनधिकृत शाळा अतिशय गांभिंयाचा, जिव्हाळ्याचा विषय आहे. शहरातल्या अनेक अनधिकृत शाळा दरवर्षी आपण बोलतो ही एक वास्तविकता होती हे ही तुम्हाला विसरता येणार नाही. अधिकारी नविन येतील. नेते नविन येतील. एक वेळ ह्या शहराची अशी गरज होती की कुठे तरी शाळा पाहिजेत त्या पध्दतीने त्या शाळा सुरू झाल्या. माझे ह्या व्यासपिठाला असे म्हणणे आहे की, त्या दोन शाळा आहेत त्यांना अधिकृत कसे करता येईल. त्यासाठी मा. महापौरांनी, मा.आयुक्तांनी लिड घ्यावे. आणि त्या अधिकृत करण्यासाठी प्रयत्न करावा. जर मा.आयुक्तांनी सांगितले असेल त्यांच्यावर मी फौजदारी करू शकतो तर मनपाच्या ज्या अनधिकृत आहेत त्यांच्यावर कोणावर फौजदारी करणार? मा.आयुक्तांवर करणार की शिक्षण अधिकाऱ्यावर करणार. मी खात्रीने सांगतो आपल्या शाळांना परवानगी नाही आहे. ह्याच्यातले गांभिर्य लक्षात घ्या. मुलांच्या हिताच्या दृष्टिने ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या आवश्यक आहेत. मी अनधिकृत शाळेचे समर्थन करत नाही. त्यांना कायद्याने काय मदत करता येईल ती करावी. जर त्यांच्यावर कारवाई केली असेल तर आपल्यावर कोण कारवाई करणार ते सांगा.

**नयना वसानी :-**

मा.महापौर मॅडम, मला लक्षवेधीमध्ये असे उत्तर देण्यांत आले आहे की, ज्या मुलांना प्रवेश मिळाला नसेल त्यांना अन्यत्र प्रवेशासाठी आम्ही सहकार्य करू. तर माझे एवढेच म्हणणे आहे की, जेवढ्या शाळा आहेत. त्यांच्यावर जो फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. त्या शाळांची लिस्ट जाहिर करावी. आणि आपण किती मुलांना प्रवेश दिला आहे त्याची माहिती द्यावी.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

ठीक आहे. आपल्या सुचनेवर निश्चीत कारवाई केली जाईल.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १, दि. ११/१२/२०१३ व दि. ११/०२/२०१४ (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आपण ह्या इतिवृत्तांला मंजुरी देत आहोत परंतू आपल्या विषयाचा अनुपालन अहवाल येत नाही.

**नगरसचिव :-**

पुढच्या सभेला देऊ.

**प्रशांत दळवी :-**

आता आपण ह्याला मंजुरी देतो. ह्याच्याप्रमाणे मिरारोड रेल्वे स्टेशनचे सुशोभिकरण आहे. काशिमिरा नाक्याचे छत्रपति शिवाजी महाराजांचे पुतळ्याचे उंचीकरण आहे. ह्या ठरावात म्हटले आहे. आठवीचे वर्ग सुरू

करायचे आहेत त्याच्यात सुचनेसह ठराव मंजुर केलेला आहे की आठवीचे वर्ग सुरू करावे अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यांत येईल. आपल्याकडे अनुपालन अहवाल येत नाही. आपण काही करत नाही. दोन-चार महत्त्वाचे विषय आहेत. मिरारोड स्टेशनबाहेर सुशोभिकरण करणे, आरक्षण क्र. १८४ विकसीत करणे काहीच होत नाही. आपण सभागृहामध्ये त्याला मंजुरी देतो कारवाई होत नाही.

**मा. महापौर :-**

दुसऱ्या महासभेत तुम्हाला येईल.

**मर्लिन डिसा :-**

सचिव साहेब पान नं २७,२८,७२ ह्याच्यात काही करेक्शन आहेत मी लिहून देते.

**निलम ढवण :-**

पान क्र. ८७ प्रकरण ७८ ला सर्व आरक्षण क्र. दिले आहेत. त्याच्यामध्ये २१४ आरक्षण पालिकेकडे हॅन्ड ओव्ही झाले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षण क्र. २१४ पार्टली हॅन्ड ओव्हर झालेले आहे. पूर्ण एरिया आपल्याकडे आली नाही.

**निलम ढवण :-**

त्याच्यावर जो खर्च दाखवला आहे. म्हणजे विकसीत करण्यासाठी आपल्या ताब्यातच आले नाही ते त्याच्यात मेन्शन केले आहे.

**मा. आयुक्त :-**

ताब्यात येण्याची प्रक्रिया सुरू असते काही क्षेत्र ताब्यात आलेले आहे. त्या क्षेत्रावर विकास करता येईल आणि जे क्षेत्र आलेले नाही ते येत्या आर्थिक वर्षात ताब्यात येईल असे आपण गृहित धरलेले आहे. त्यासाठी केलेले आहे. जर वर्षा अखेर ताब्यात आलेच नाही तर खर्च केले जाणार नाही.

**निलम ढवण :-**

त्याच्यात कार्यक्रम वगैरे करायचे असेल त्याला पालिकेची परवानगी नसते. २१४ वर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याची पालिकेतर्फे परमिशन दिली जात नाही.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर लक्ष घातले जाईल. किती जागा आपल्या ताब्यात आलेली आहे त्या जागेचे संरक्षण करणे, विकास करणे जी जागा ताब्यात आलेली नाही ती जागा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न करणे. आणि हे पुर्णपणे झाल्यानंतर किंवा आपल्याला एक हिस्सा ताब्यात आलेला असेल तर त्याचा विकास करण्यांत येईल. त्याच्यावर जी परवानगी द्यायची आहे ती आपल्यामार्फतच दिली जाईल. परस्पर दिली जाणार नाही ह्याची दक्षता घेण्यांत येईल.

**निलम ढवण :-**

साहेब त्याच्यातली अर्धी आपल्याकडे आली आहे का?

**मा. आयुक्त :-**

नेमकी टक्केवारी उपलब्ध नाही.

**निलम ढवण :-**

अर्धी जर असेल तर त्याचे भाडे किंवा इतर जे काही इन्कम आहे तो जमिनीचा मालक आहे त्याची परमिशन घेतली जाते. त्यांना भाडं दिलं जाते.

**मा. आयुक्त :-**

आपल्या ताब्यात आली नसेल तर त्यांना अधिकार आहेत. आपल्या ताब्यात आली असेल.

**निलम ढवण :-**

जेव्हा असेल तेव्हा २१४ ताब्यात मेन्शन करा.

**मा. आयुक्त :-**

२१४ आमचा प्रस्ताव नव्हता. तो महासभेने ठरावामध्ये नमूद केलेला आहे. त्यामुळे तो इतिवृत्तांतामध्ये आलेला आहे.

**निलम ढवण :-**

ह्याच्यात खर्च दाखवला जाणार नाही. जर आपल्याकडे नाहीच आहे.

**मा. आयुक्त :-**

मी भूमिका स्पष्ट केली ह्या आरक्षणापैकी जी जागा आपल्या ताब्यात आली असेल त्या जागेचे संरक्षण करणे. त्या जागेचा विकास करणे आणि ती जागा आपल्या ताब्यात घेऊन आपल्या माध्यमातून त्याचा वापर करणे किंवा वापर परवानगी देणे. ह्याची काळजी घेतली जाईल. जी जागा आपल्या ताब्यात आलेली नाही. तोपर्यंत त्या जागेवरचे अधिकार त्या मालकाचे असतात. त्या मालकाकडून ती जागा हस्तांतरीत करण्यासाठी प्रयत्न करण्यांत येतील. परंतू त्याचा अर्थ असा नाही की, आपल्या ताब्यात आलेल्या जागेवर आपण खर्च करू नये. आपल्याला तो खर्च करता येईल आणि तो जर पर्टीक्युलर ब्लॉक असेल तो सरसकट क्षेत्र असेल, आरक्षणामध्ये असेल तर त्याचा देखील आपल्याला करता येईल. त्यांच्यावर खर्च देखील करता येईल.

**निलम ढवण :-**

आपण खर्च करणार पण त्याचे भाडे मालक खाणार तर पालिकेला काय इन्कम आहे. पालिका खर्च करते तर त्याच्यातून काही तर इन्कम आले पाहिजे. ते पालिकेकडे का येत नाही.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यावर खर्च करताना आपला जो मुद्दा आहे. खर्च करू नये. तेच तेच मुद्दे परत सांगतो. ह्या आरक्षणापैकी जी जागा आपल्या ताब्यात आली असेल त्या जागेवर आपल्याला खर्च करण्याचा अधिकार आहे. आणि त्या जागेचा वापर करण्याचा अधिकार देखील आपल्याला आहे. त्या वापरासाठी आपल्याला जो काही खर्च करावा लागेल तो खर्च आपण योग्य प्राधिकरण माझ्या अधिकारात असेल तर माझ्या अधिकाऱ्यांमध्ये, मा. स्थासी समितीच्या अधिकारात असेल तर स्थायी समितीच्या मान्यतेने किंवा मा.महासभेच्या अधिकारात असेल तर महासभेच्या मान्यतेने खर्च करण्यांत अडचण येवू नये. जी जागा आपल्या ताब्यात नाही त्याच्यावर मनपातर्फे कुठलाही खर्च केला जाणार नाही हे मी इथे करू इच्छितो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. ११/१२/२०१३ व दि. ११/०२/२०१४ (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १ :-**

दि. ११/१२/२०१३ व दि. ११/०२/२०१४ (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०२ :-**

दि. ११/१२/२०१३ व दि. ११/०२/२०१४ (दि. ११/१२/२०१३ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २, भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालय येथील तात्पुरत्या ठोक मानधनावरील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचा-यांना मुदतवाढ देणे बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड येथील वैद्यकीय विभागाअंतर्गत भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालय नागरीकांच्या सोईसुविधांसाठी आवश्यक अधिकारी/कर्मचाऱ्यांसह सुस्थितीत कार्यरत असणे गरजेचे आहे. रुग्णालयासाठी शासन मंजूर पदानुसार १६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. शासन निर्णय क्र. जाबप्र-२००१/सीआर-९३/जार्बक/आ-४, दि. २३/१२/२००२ अन्वये सुचविलेल्या आकृतीबंध शहरी आरोग्य सेवेचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health standards नुसार सुचविलेल्या मानकांचा विचार करता सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्त लावणे शक्य होणार नाही. Indian Public Health standards नुसार भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ०२ | १५६००-३९,१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारीका | १६ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | ०२ | ५२००-२०२०० | १८०० |

सदर पदनिर्मिती करुन सदर पदास मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ ने पदनिर्मिती प्रस्ताव शासनास पाठवुन मान्यता मिळणेबाबत व शासन मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करार तत्वावर भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. त्याचप्रमाणे दि. १९/१०/२०११ रोजी शासनास "आय.पी.एच.एस." नुसार आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. मा. महासभा ठराव क्र. ५४, दि. २०/०९/२०११ नुसार भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयात पदनिर्मितीस मंजूरी दिली आहे. भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयात खालील प्रमाणे १६ वैद्यकीय अधिकारी/अधिपरिचारीका यांना मा. स्थायी समिती सभा

दि.२८/०८/२०१३, ठराव क्र. ७४ अन्वये सेवेत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ०६ महिन्यांसाठी मुदतवाढ आदेश देण्यात आले आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| १. | डॉ. विजया प्रभागर अहिरे | वैद्यकीय अधिकारी | १६/०३/२०१४ |
| २. | श्रीम. स्नेहा राणे | अधिपरिचारीका | ०५/१२/२०१३ |
| ३. | श्रीम. स्विडल फर्नांडिस | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ४. | श्रीम. नेहा निलेश वनमाळी | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ५. | श्रीम. अंजली अविनाश यादव | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ६. | श्रीम. वैशाली दिपेश ठाकरे | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ७. | श्रीम. राधिका मनिष चौधरी | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ८. | श्रीम. लिडीया अंतोन करास | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ९. | श्रीम. उज्वला दिनेश सोनावणे | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| १०. | श्रीम. जया नरेश पेडणेकर | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ११. | श्रीम. संघवी विशाल चौधरी | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १२. | श्रीम. लविना स्टीफन डाबरे | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १३. | श्रीम. जेविता परेरा | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १४. | श्रीम. रेखा रमेश कडू | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १५. | श्रीम. सय्यद सकिना चांदबाशा | शस्त्रक्रिया सहाय्यक | २२/०४/२०१४ |
| १६. | श्री. शिवाजी व्यंकटराव वाकोरे | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | २२/०१/२०१४ |

मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ नुसार मंजूरी दिलेल्या वरील पदनिर्मिती प्रस्तावास शासनाकडून आद्याप मंजूरी प्राप्त झालेली नसल्याने ठरावाच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका, शस्त्रक्रियागृह सहाय्यक/परिचर ठोक मानधनावर कार्यरत असल्याने वरील प्रमाणे ठोक मानधनावरील मुदत संपल्यानंतर प्रत्येकवेळी मुदत संपल्यानंतर ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन शासनाकडील पदनिमीर्तीचा प्रस्ताव मंजूर होईपर्यंत ही सभा मुदतवाढ देऊन सदर प्रस्तावास मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय हा जो विषय सादर केला आहे. त्यांची मुदत कधी संपली आहे त्याची माहिती द्यावी. कोणत्या कायद्या अंतर्गत ह्यांना मुदतवाढ देऊ शकतो. हे आपण कुठेही म्हटले नाही. तर त्याची माहिती दिली तर बरे होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो, ह्यापूर्वी महासभेने मंजुरी दिलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

कधी पर्यंत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जो पर्यंत कायम शासनाकडून मंजुर होत नाही तो पर्यंत दिलेली आहे. ६ महिन्यासाठी मा. महासभेची मंजुरी घेतलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय एवढ सगळ्यांना माहित आहे कोणालाही आपण विदाऊट ब्रेक वारंवार मानधनावर घेतल तर भविष्यात त्यांना कायम करायला लागते. स्थायी समितीला ६ महिन्याचा अधिकार आहे. त्यानंतर महासभा किंवा कुठलाही समितीला त्याला मुदतवाढ द्यायचा अधिकार नाही. ही कायद्यात तरतूद आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महासभेला अधिकार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

कुठल्या कायद्यात आहे दाखवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

हॉस्पीटल चालू करण्या संदर्भात........

**नरेंद्र मेहता :-**

आपण रितसर प्रोसेस करा. त्यांना २ दिवस, ३ दिवस ब्रेक द्यायचा असेल तर ब्रेक देऊन करा. आम्ही कुठे नाही बोललो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मध्यंतरी ब्रेक दिला.

**नरेंद्र मेहता :-**

कधी ह्याच्यात आपण काही म्हटले नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

प्रत्येक ६ महिन्याला.

**नरेंद्र मेहता :-**

ब्रेक दिल्यानंतर मुदतवाढ कशाला देअर इन अ न्यू अपॉइन्टमेंट.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब आहे. त्याच्यात बघा.

**नरेंद्र मेहता :-**

ब्रेक दिल्यानंतर नविन अपॉइन्टमेंट करायला लागेल ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ज्यांना ब्रेक देतो त्यांनाच पुन्हा घेतो. ज्या व्यक्तीला आपण घेतो त्यांनाच ब्रेक देतो.

**नरेंद्र मेहता :-**

मग ह्याला मुदतवाढ शब्द वापरता येईल का? ब्रेक दिला म्हणजे त्याला बरखास्त केले. मग आता तुम्ही सांगा परत घेण्यासाठी त्याला मुदत वाढ कसली. मा. आयुक्त महोदय आम्ही नक्कीच मुदतवाढ देऊ. शहराची गरज आहे. उदा. आपण कॉम्प्युटर ऑपरेटर आता होते, काय त्यांना परमनंन्ट करत नाही. त्यांना काढले तर दुसरीकडे नोकरी नाही. त्यांना कुठेतरी दिलासा द्या. त्यांना हे तरी माहित होऊ द्या की माझा हा टेम्परररी जॉब आहे. ते असा विचार करतात की, मी इकडे परमनंन्ट होणार आहे. आणि शेवटी सभागृहाला हा निर्णय घ्यावा लागेल की त्यांना इथे परमनंन्ट करा. नंतर तुम्ही बोलणार आम्ही घेणार नाही. प्रभातताई, सेना, काँग्रेस सगळ्यांनी सांगितले कॉम्प्युटर ऑपरेटरना परमनंन्ट करा. तुम्ही करता की नाही करतात. कायद्याला पण अडचणीत टाकले. काढताही येत नाही, घेताही येत नाही. अशा प्रकारे करायची आवश्यकता काय? तुम्ही रितसर मागणी करा ना की, असे असे आपण केले होते. आपल्याकडे स्टाफ पॅटर्न मंजुर झालेला नाही. म्हणून आपल्याला एक वर्ष ठेका पध्दतीने घ्यावे लागेल. ह्याच्यात मुदतवाढीचा प्रश्नच येत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन त्यांना मुदतवाढ ..........

**नरेंद्र मेहता :-**

खंड दिला मग आमचे काम संपले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यांनाच मुदतवाढ ना.

**नरेंद्र मेहता :-**

कोणत्या कायद्यात तरतूद आहे ते मला दाखवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कायद्यात तरतूद नसली तरी महासभेला अधिकार आहेत. सदरचा प्रस्ताव शासनाला पाठवला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण उपायुक्त मला ते पान उघडून दाखवा तरी. की ह्या कलमाव्दारे आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सहा महिन्याचे अधिकार.

**नरेंद्र मेहता :-**

सहा महिने संपले ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

स्टँडींगची संपल्यानंतर महासभेची अंतिम मंजुरी देते. मुळ ठराव जेव्हा मंजुर केला तेव्हा स्पष्ट लिहिले आहे. ज्यावेळी आपण ५० बेडचे हॉस्पीटल कार्यान्वित करण्या संदर्भात महासभेने तुम्हाला जे काही कर्मचारी कमी पडत असतील त्या संदर्भात पुन्हा प्रस्ताव टाकला होता. त्यात मेडीकल ऑफिसर, नर्सेस त्यासंदर्भात परमनंन्ट मंजुर होईल तोपर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यांत येईल.

**नरेंद्र मेहता :-**

कुठल्या कायद्यात तरतूद आहे ते पान दाखवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महासभेचा ठराव झाला ना.

**नरेंद्र मेहता :-**

जो पर्यंत पद मंजुर होत नाही तिथपर्यंत आपल्याला ह्यांना मानधनावर घेता येते ते कुठे आहे मला दाखवा. तात्पुरता शब्द बरोबर आहे की सहा महिने आपल्याला घेता येईल. तुमचे म्हणणे आहे महासभेला अधिकार आहे ते कोणत्या कलमात आहे ते दाखवा तरी. आपल्याकडे लॉ ऑफिसर आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महासभेला अधिकार आहे. मुदत वाढ शब्द नसला तरी.

**नरेंद्र मेहता :-**

मला दाखवा महासभेनं घरी कायदे बनवले का? कायद्यात आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मग कसे करायचे तुम्ही सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

तो भाग वेगळा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

असे नसते ना. आपल्याला हॉस्पीटलसाठी ठेवायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मी सांगेल तसे काम करणार का? कायद्याप्रमाणे करणार ना. मी बोलणार तशी महानगरपालिका चालणार आहे का? कायद्याप्रमाणे चालेल ना.

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब घेणे गरजेचे आहे. मुदतवाढ देता आहे नाही हा विषय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडला तसा होऊ शकतो. फक्त शब्द रचना बदलायची आहे. तो बदला.

**नरेंद्र मेहता :-**

जुबेर इनामदारजी ह्या शहराची गरज बघता आपण मानधनावर घ्या तो आमचा विषय नाही. माझा विषय आहे. आपण अशाच प्रकारे कॉम्प्युटर ऑपरेटरना घेतले. आता होते का? आपण अनेक वेळा ठराव करतो. मुदतवाढ, मुदतवाढ तेच चालत राहिले आहे. आता असे झाले आहे की, आपण त्यांना ठेऊही शकत नाही आणि काढूही शकत नाही. आता त्यांचे वय ३३ वर गेले आहे. ३३ वर तुम्हाला अपॉइन्टमेंट करता येणार नाही. मग ह्या सगळ्या बाबी सुटणार कशा. हे लोक ह्या आशेवर आहेत की, उद्या महानगरपालिकेमध्ये परमनंन्ट होऊ.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

डॉक्टर मिळत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

माझा विषय तो नाही. तुम्ही त्यांना ब्रेक देऊन ६ महिन्याची निविदा मागवायला पाहिजे. हा संपवा दुसरा सहा महिन्यांनी मागवा ते संपवा तिसरा सहा महिन्यांनी मागवा. ह्यांनाच कन्टीन्यू करता येत नाही ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब कर्मचारी मिळत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

उदा. सांगतो, खांबित साहेबांची अपॉइन्टमेंट कशी झाली. खांबित साहेबांना मानधनावर घेतले ते कोर्टात गेले. शेवटी आपल्याला त्यांना परमनंन्ट करायला लागले. मी त्यांना दोष देत नाही. ही वॉज अपोइन्टमेंट ऑन द टेम्पररी बेसीस मानधनावर. नंतर मी गेले तीन वर्षापासून आहे. चार वर्षापासून आहे. आपल्याला हो सांगायला लागेल मग आपल्याला त्यांना परमनंन्ट करायला लागेल, मग ह्यांना पण आम्ही हेच करायचे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

दुसरा पर्याय नाही.

**नरेंद्र मेहता :-**

कोर्टात गेले तर काय होईल ते सांगा. तुम्ही तुमची अडचण सांगता आम्ही मान्य करतो. पण अगोदर सहा महिने अपॉइन्टमेंट करून परत रितसर हा आला असता तर हा प्रश्न उत्पन्न झाला असता का? मा. आयुक्त महोदय कोणी वेळेवर निर्णय घेत नाही. सगळ्यांना ग्रॅन्टेड धरलेले आहे. की आपण जाऊन मा. महापौर आयदर विरोधी पक्षनेता कन्हव्हेयस करून आपले काम करून घेऊ. शेवटी आमचे दुर्भाग्य आहे की, शहराची गरज बघता, आम्हाला करावेच लागते. आम्ही विरोध केला तर हे बोलतील उद्यापासून हॉस्पीटल बंद हे आम्हांला करता येत नाही. नंतर भविष्यात आम्ही भोगायचे. मग ह्यांना परमनंन्ट करा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, शासनाचा पद मंजुराचा प्रस्ताव मंजुर झाला नाही. तो आल्याशिवाय त्यांना कसे परमनंन्ट करता येईल.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम एका ठिकाणी पदनिर्मितीचा प्रस्ताव मंजुर होत नाही. त्याचवेळेला वन विभागाची पद मंजुर होतात. आणि ९-९, १०-१० वर्ष संगणक चालकाशिवाय इथे पान हलत नाही. नुसती ट्रान्सफर केली साहेब किती रडारड झाली. मी हा ऑपरेटर सोडणार नाही. मला तो ऑपरेटर नको. इतकी निकड असताना आपण त्या कॉम्प्युटर ऑपरेटरच्या बाबतीत गेले ९ ते १० वर्ष काही निर्णय घेत नाही. आपण किती लोकांच्या भावनांशी खेळतो. एका विभागाची पद मंजुर होतात. आरोग्य सारख्या सेन्सेटीव्ह विषय तिकडे पद मंजुर होत

नाही. कॉम्प्युटर ऑपरेटर वय उलटून चालले आहे. त्यांच्या घरची परिस्थिती एवढी गंभीर आहे ते कुठे जाणार. त्यांच्याकडे आपण पूर्ण दुर्लक्षित आहोत.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम त्याचप्रमाणे मागच्या महासभेमध्ये बांधकाम विभागाचे अभियंता संदर्भात आपण चर्चा केली होती आणि पुढच्या महासभेत हा विषय घेतला जाईल असे सांगितले परंतू त्याबाबत देखील काही सिरियस वाटत नाही. कारण गेल्या वर्षीची देखील आमच्या नगरसेवक निधीची कामे अजूनही पेन्डींग आहेत. पुरेसे अभियंते नसल्यामुळे ही सगळी कामे अशी अडकून पडलेले आहेत. एका अभियंत्यांकडे ४ ते ५ प्रभागाचा चार्ज दिला जातो. अभियंते वाढवण्यामध्ये का सिरियस नाही. काम पेंन्डीग ठेऊन मिरा भाईंदरचा कसा विकास करणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ॲक्टमध्ये तरतूद नसेल तर महासभेला अधिकार आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

कोणते अधिकार. अधिकार घरी बनवले का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ॲक्टमध्ये तरतूद नसेल तर महासभेला अधिकार आहेत म्हणून हा निर्णय घेतला.

**भगवती शर्मा :-**

साहेब, ह्यांच्या अगोदर काही केले नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ह्याच्या अगोदर बऱ्याच नेमणूका झाल्या आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय उपायुक्तांचे अशाप्रकारे उत्तर देणे की आम्ही अनेक वेळेला केले आहे म्हणून करू का? आम्ही दुरूस्ती करायला सांगतो.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम पदनिर्मिती करू. परमंनन्ट करू. ती वेगळी गोष्ट आहे. पण ह्याच्या अगोदर सन्मा. सदस्य महापौर होते त्यावेळी असे प्रस्ताव मंजुर केलेले आहेत. तुम्ही त्यांना सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

असे कुठले प्रस्ताव मंजुर झाले. डायसवर बोलतात ऑन रेकॉर्ड बोलतात सांगा कुठले प्रस्ताव मंजुर झाले. मी मा. महापौरांनी विषय आणला म्हणून मी त्यांना दोष देत नाही. प्रशासनांनी विषय दिला त्यांचे कर्तव्य झाले. तुम्ही तीन महिन्यांत मंजुर केले असते मग त्यांना दोषी ठरवायचे का? त्यांचा दोष नाहीच आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण स्टँडींगची मंजुरी घेतली.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही मंजुर करा.

**भगवती शर्मा :-**

इसके पहले भी कोई पद मंजुर करने के लिए भेजे है। नगररचना और महत्वपूर्ण विभाग के है। उनके २०१०-११ कभी से भेजे है। पता नही आजतक क्यू मंजुर नही हो रहे। और हमारे वृक्ष प्राधिकरण के २०१३ में भेजे है। २०१४ में मंजुर हो गए। उस पॅटर्न के अंदर में बाकी के जो प्रस्ताव है मै मा. आयुक्त महोदय से निवेदन करना चाहूँगा उस तरीके से जाके पदनिर्मिती कर देंगे तो अपनी जो सब समस्या बंद हो जाएगी।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम माझे तेवढेच म्हणणे आहे की, ह्याप्रकारे पुढे होता कामा नये. आपल्याकडे अनेक कायद्यात तरतूद आहे. त्याप्रमाणे आपण घेऊ शकतो. आता त्याचे म्हणणे आहे ब्रेक दिला आहे. ब्रेक दिला आहे तर हॉस्पीटल बंद आहे का? नक्कीच ब्रेक दिला नाही. ऑन रेकॉर्ड दिला असेल ऑफ रेकॉर्ड चालू असेल, अशाप्रकारचे करू नका. भविष्यात आम्हाला सगळ्यांना भोगायला लागेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

शासनाकडे प्रस्ताव आहे लवकर होईल.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, एका बाजूला प्रस्ताव एका बाजूला मंजुर पद आहेत आम्ही आपल्याकडे अनेकदा चर्चा केली. स्टाफची कमी आहे. आपण मंजुर करत नाही. दुसऱ्या बाजूला मानधन, मानधन चालले आहे. तर आपल्याला विनंती राहील जी पद भरायची असतील आवश्यकता असेल तर आपण आजच्या आज निर्णय घ्यावा आणि ह्यापुढे असे होता कामा नये, अशी आपणांस विनंती.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त महोदय इंदिरा गांधी हॉस्पीटल में जो कन्सलटंन्ट है। उनका जो मानधन आता है, उसमे मेरे पास एक जानकारी आयी उसमे किसी को लाख मिल रहा है, किसी को देढ लाख, किसी को ६० हजार,

किसी को २५ हजार आप लोग बोलते है की कम पगारसे देने के कारण से डॉक्टर नही मिलते उसमे लाख, देढ लाख महिने का देते है। उसमे परमनन्ट कर सकते है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वह सॅक्शन पोस्ट नही है।

**प्रशांत केळूसकर :-**

मा. महापौर मॅडम माझ्या प्रभागात मा. आयुक्त साहेबांनी एक आरोग्य केंद्र उघडले. पद मंजुरी करून तिथे डॉक्टर ठेवू. ह्यासाठी आरोग्य केंद्राची स्थापना केली. आरोग्य केंद्राचे बांधकाम झाले परंतू तिकडे अजून डॉक्टर आणि परिचारिका कोणीच नाही. आरोग्य केंद्र तसेच बंद पडले आहे.

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड येथील वैद्यकीय विभागाअंतर्गत भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालय नागरीकांच्या सोईसुविधांसाठी आवश्यक अधिकारी/कर्मचाऱ्यांसह सुस्थितीत कार्यरत असणे गरजेचे आहे. रुग्णालयासाठी शासन मंजूर पदानुसार १६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. शासन निर्णय क्र. जाबप्र-२००१/सीआर-९३/जाबॅक/आ-४, दि. २३/१२/२००२ अन्वये सुचविलेल्या आकृतीबंध शहरी आरोग्य सेवेचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health standards नुसार सुचविलेल्या मानकांचा विचार करता सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्त लावणे शक्य होणार नाही. Indian Public Health standards नुसार भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ०२ | १५६००-३९,१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारीका | १६ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | ०२ | ५२००-२०२०० | १८०० |

सदर पदनिर्मिती करुन सदर पदास मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ ने पदनिर्मिती प्रस्ताव शासनास पाठवुन मान्यता मिळणेबाबत व शासन मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करार तत्वावर भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. त्याचप्रमाणे दि. १९/१०/२०११ रोजी शासनास "आय.पी.एच.एस." नुसार आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. मा. महासभा ठराव क्र. ५४, दि. २०/०९/२०११ नुसार भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयात पदनिर्मितीस मंजूरी दिली आहे. भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयात खालील प्रमाणे १६ वैद्यकीय अधिकारी/अधिपरिचारीका यांना मा. स्थायी समिती सभा दि.२८/०८/२०१३, ठराव क्र. ७४ अन्वये सेवेत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ०६ महिन्यांसाठी मुदतवाढ आदेश देण्यात आले आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| १. | डॉ. विजया प्रभागर अहिरे | वैद्यकीय अधिकारी | १६/०३/२०१४ |
| २. | श्रीम. स्नेहा राणे | अधिपरिचारीका | ०५/१२/२०१३ |
| ३. | श्रीम. स्विडल फर्नांडिस | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ४. | श्रीम. नेहा निलेश वनमाळी | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ५. | श्रीम. अंजली अविनाश यादव | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ६. | श्रीम. वैशाली दिपेश ठाकरे | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ७. | श्रीम. राधिका मनिष चौधरी | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ८. | श्रीम. लिडीया अंतोन करास | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ९. | श्रीम. उज्वला दिनेश सोनावणे | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| १०. | श्रीम. जया नरेश पेडणेकर | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ११. | श्रीम. संघवी विशाल चौधरी | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १२. | श्रीम. लविना स्टीफन डाबरे | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १३. | श्रीम. जेविता परेरा | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १४. | श्रीम. रेखा रमेश कडू | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १५. | श्रीम. सय्यद सकिना चांदबाशा | शस्त्रक्रिया सहाय्यक | २२/०४/२०१४ |
| १६. | श्री. शिवाजी व्यंकटराव वाकोरे | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | २२/०१/२०१४ |

मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ नुसार मंजूरी दिलेल्या वरील पदनिर्मिती प्रस्तावास शासनाकडून आद्याप मंजूरी प्राप्त झालेली नसल्याने ठरावाच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका, शस्त्रक्रियागृह सहाय्यक/परिचर ठोक मानधनावर कार्यरत असल्याने वरील प्रमाणे ठोक मानधनावरील मुदत संपल्यानंतर प्रत्येकवेळी मुदत संपल्यानंतर ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन शासनाकडील पदनिमीर्तीचा प्रस्ताव मंजूर होईपर्यंत ही सभा मुदतवाढ देऊन सदर प्रस्तावास मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे. तसेच

जे.एन.एन.यु.आर.एम. अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच २० द.ल.ली. पाणी पुरवठ्याची कामे हाती घेतलेली आहेत. तसेच पाणी पुरवठा योजनेतील कामे सुध्दा हाती घ्यावयाची आहे. त्याकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे पुरेसा अभियंता वर्ग नाही. भुयारी गटार योजना/पाणी पुरवठा कामांचा अनुभव असणारे ०३ अभियंते १) श्री. विलास चव्हाण २) श्री. सुरेन्द्र ठाकरे ३) श्री. किशोर देशमुख महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातून प्रतिनुयुक्तीवर घेण्यात आलेले आहेत. सदर कामे पूर्ण करण्यासाठी त्यांची आवश्यकता लागणार आहे. तरी अभियंत्यांना १ वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी व सदर कार्यपूर्ती न झाल्यास प्रशासन जबाबदार असेल असा ठराव मांडण्यात येत आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

सुचना घ्या, क्लब करून घ्या.

**भगवती शर्मा :-**

विषय दिल्यानंतर विषयाचे वेगवेगळे ठराव होऊ शकतात. आम्ही जो ठराव मांडला आहे तो इंदिरा गांधी रूग्णालयात मानधनावर जे ठेवले आहेत त्यांना मुदतवाढ देण्यासाठी ह्या प्रस्तावामध्ये वेगवेगळ्या डिपार्टमेंटमध्ये कार्यरत असलेले पद आहेत ते घेत आहेत. त्यांना घेऊ शकतात का? मंजुरी देऊ शकतात? ते ठरावामध्ये क्लब करा. लास्टला आहेत त्यांचा समावेश करा.

**नरेंद्र मेहता :-**

एम.जी.पी. चे तीन कर्मचारी आहेत. काम अजून पेन्डींग आहे. तर त्यांना एक वर्षाची मुदतवाढ द्या अशी आमची सुचना आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमच्या ठरावात त्यांनी जे तीन कर्मचारी सांगितले आहेत ते ॲड करा. त्यांची सुचना घ्या.

**मा. महापौर :-**

ठराव सुचनेसह मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. ०२ :-**

भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथील तात्पुरत्या ठोक मानधनावरील वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणे बाबत.

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड येथील वैद्यकीय विभागाअंतर्गत भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालय नागरीकांच्या सोईसुविधांसाठी आवश्यक अधिकारी/कर्मचाऱ्यांसह सुस्थितीत कार्यरत असणे गरजेचे आहे. रुग्णालयासाठी शासन मंजूर पदानुसार १६ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

शासन निर्णय क्र. जाबप्र-२००१/सीआर-९३/जाबॅक/आ-४, दि. २३/१२/२००२ अन्वये सुचविलेल्या आकृतीबंध शहरी आरोग्य सेवेचा विचार करता तसेच केंद्र शासनाच्या आरोग्य कुटूंब कल्याण मंत्रालयाने Indian Public Health standards नुसार सुचविलेल्या मानकांचा विचार करता सदर कर्मचारी वर्ग अतिशय अपुरा आहे. अपुऱ्या कर्मचारी वर्गामार्फत आरोग्य सेवा दिल्यास त्यामध्ये गुणवत्त लावणे शक्य होणार नाही. Indian Public Health standards नुसार भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयासाठी पुढील प्रमाणे स्थायी पदांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी | ग्रेड वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी | ०२ | १५६००-३९,१०० | ५४०० |
| २. | अधिपरिचारीका | १६ | ९३००-३४८०० | ४२०० |
| ३. | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | ०२ | ५२००-२०२०० | १८०० |

सदर पदनिर्मिती करुन सदर पदास मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ ने पदनिर्मिती प्रस्ताव शासनास पाठवुन मान्यता मिळणेबाबत व शासन मान्यता मिळेपर्यंत सदर पदे करार तत्वावर भरणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मा. महासभेने मंजूरी दिलेली आहे. त्याचप्रमाणे दि. १९/१०/२०११ रोजी शासनास "आय.पी.एच.एस." नुसार आवश्यक पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

मा. महासभा ठराव क्र. ५४, दि. २०/०९/२०११ नुसार भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयात पदनिर्मितीस मंजूरी दिली आहे. भारतरत्न इंदिरागांधी रुग्णालयात खालील प्रमाणे १६ वैद्यकीय अधिकारी/अधिपरिचारीका यांना मा. स्थायी समिती सभा दि.२८/०८/२०१३, ठराव क्र. ७४ अन्वये सेवेत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ०६ महिन्यांसाठी मुदतवाढ आदेश देण्यात आले आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| १. | डॉ. विजया प्रभागर अहिरे | वैद्यकीय अधिकारी | १६/०३/२०१४ |
| २. | श्रीम. स्नेहा राणे | अधिपरिचारीका | ०५/१२/२०१३ |
| ३. | श्रीम. स्विडल फर्नांडिस | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ४. | श्रीम. नेहा निलेश वनमाळी | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम | ठोक मानधनावरील मुदत संपण्याची दिनांक |
|---|---|---|---|
| ५. | श्रीम. अंजली अविनाश यादव | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ६. | श्रीम. वैशाली दिपेश ठाकरे | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ७. | श्रीम. राधिका मनिष चौधरी | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ८. | श्रीम. लिडीया अंतोन करास | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ९. | श्रीम. उज्वला दिनेश सोनावणे | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| १०. | श्रीम. जया नरेश पेडणेकर | अधिपरिचारीका | २२/०१/२०१४ |
| ११. | श्रीम. संघवी विशाल चौधरी | अधिपरिचारीका | ०६/०९/२०१३ |
| १२. | श्रीम. लविना स्टीफन डाबरे | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १३. | श्रीम. जेविता परेरा | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १४. | श्रीम. रेखा रमेश कडू | अधिपरिचारीका | ०९/०३/२०१४ |
| १५. | श्रीम. सय्यद सकिना चांदबाशा | शस्त्रक्रिया सहाय्यक | २२/०४/२०१४ |
| १६. | श्री. शिवाजी व्यंकटराव वाकोरे | शस्त्रक्रिया सहाय्यक/परिचर | २२/०१/२०१४ |

मा. महासभा दि. २०/०९/२०११, ठराव क्र. ५४ नुसार मंजूरी दिलेल्या वरील पदनिर्मिती प्रस्तावास शासनाकडून आद्याप मंजूरी प्राप्त झालेली नसल्याने ठरावाच्या अनुषंगाने वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारीका, शस्त्रक्रियागृह सहाय्यक/परिचर ठोक मानधनावर कार्यरत असल्याने वरील प्रमाणे ठोक मानधनावरील मुदत संपल्यानंतर प्रत्येकवेळी मुदत संपल्यानंतर ०१ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन शासनाकडील पदनिमीर्तीचा प्रस्ताव मंजूर होईपर्यंत ही सभा मुदतवाढ देऊन सदर प्रस्तावास मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अभियानांतर्गत भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच २० द.ल.ली. पाणी पुरवठ्याची कामे हाती घेतलेली आहेत. तसेच पाणी पुरवठा योजनेतील कामे सुध्दा हाती घ्यावयाची आहे. त्याकरीता मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे पुरेसा अभियंता वर्ग नाही. भुयारी गटार योजना/पाणी पुरवठा कामांचा अनुभव असणारे ०३ अभियंते १) श्री. विलास चव्हाण २) श्री. सुरेन्द्र ठाकरे ३) श्री. किशोर देशमुख महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातून प्रतिनुयुक्तीवर घेण्यात आलेले आहेत. सदर कामे पूर्ण करण्यासाठी त्यांची आवश्यकता लागणार आहे. तरी अभियंत्यांना १ वर्षाची मुदतवाढ देण्यात यावी व सदर कार्यपूर्ती न झाल्यास प्रशासन जबाबदार असेल असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सूचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्रीम. निलम ढवण**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३, भाईंदर (पूर्व) जैसलपार्क चोपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नुतनीकरण करणे कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसलपार्क खाडी किनारी महानगरपालिकेने दशक्रिया या विधी करीता शेड बांधलेली आहे. सदर शेडचे नुतनीकरण करणे कामास महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथरीटी यांच्याकडून मंजूरी मिळालेली आहे. सदर कामासाठी रु. ५६,५४,९८६/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**रोहिदास पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यामध्ये हॉल, रूम, बाथरूम म्हटले आहे असे त्याच्यात कनेक्शन आहे का? पाणी साठवण्याची टाकी.

**प्रकरण क्र. ०३ :-**

भाईंदर (पूर्व) जैसलपार्क चौपाटी येथे दशक्रिया विधी शेडचे नुतनीकरण करणे कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

**ठराव क्र. ०४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसलपार्क खाडी किनारी महानगरपालिकेने दशक्रिया या विधी करीता शेड बांधलेली आहे. सदर शेडचे नुतनीकरण करणे कामास महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथरीटी यांच्याकडून मंजूरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी रु. ५६,५४,९८६/- एवढा खर्च अपेक्षित असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. रोहिदास पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४, केंद्र शासनाच्या जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत बसेस खरेदी व जेईएफ ५ अंतर्गत प्रकल्प अहवाल बनविणे अवलोकनार्थ.

**नरेंद्र मेहता :-**

आम्हाला अवलोकन मान्य नाही. मिरा भाईंदर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या जे.एन.एन. यु.आर. एम. योजनेअंतर्गत बस खरेदी करणेकरीता व बस डेपो विकसीत करणे व अत्याधुनिक उपकरणे कार्यान्वियीत करणेकरीता निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. या पात्र निविदाधारकांना महानगरपालिकेने दि. ५/०३/२०१४ रोजी कार्यादेश दिलेले आहेत. बस खरेदी करण्यापूर्वी प्रशासनाने मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक होते. तसेच सदर विषय हा शहराशी निगडीत असल्याने या सर्व योजनेची व बस चालविण्याचे धोरण निश्चित करणेकामी मा. महासभेची अंतीम मंजुरी घेणे आवश्यक होते. अश्या प्रकारची कोणतीही मंजूरी प्रशासनाकडून घेतलेली नसल्याने सदर अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला विषय नामंजुर करण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय अवलोकनाला सादर केलेला आहे. ह्याच्यामध्ये ठराव होऊ शकत नाही. मा. आयुक्त साहेब खुलासा करा.

**राजेंद्र जैन :-**

पाटील साहेब अवलोकन का मतलब क्या है देख के राय जानना।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्टँडींग कमिटी मे जो भी सब्जेक्ट अवलोकन मे आते है उसके ठराव नही होते.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम वरील हेडमध्ये म्हटले आहे. आपल्याला जी काही माहिती दयायची असते मग विनंती अर्ज असू द्या. शासनाचे परिपत्रक हे अवलोकन म्हणजे माहिती तिकडे हे पाठवायला पाहिजे. ज्यावेळी अजेंड्यावर वियय आला तर त्या विषयावर निर्णय व्हायला पाहिजे. आम्ही तो निर्णय दिलेला आहे. प्रशासनाला जो योग्य वाटेल तो निर्णय घ्या, आम्ही आमच्या सद्बुध्दीप्रमाणे वाटले ते दिलेले आहे. कारण विषय पत्रिकेवर नंबर पडला आहे. माहितीसाठी द्यायचे होते तर वरती टाकायला पाहिजे. जसे-तसे शासनाचे पत्र देतो इतर काही माहिती तसे द्यायला पाहिजे होतं.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम हम कुछ सदस्य है जिनको तांत्रिक ज्ञान कम है जैसे इस विषय पे ठराव हो सकता है या नही हो सकता। इसके पहले भी हमने सदन में मागणी किया है की हमको पाठशाला के लिए दौरे पे भेज दिजिए। ताकि हम लोग ज्ञान का अनुभव प्राप्त कर सकते है। मा. आयुक्त साहेब आपके पास प्रस्ताव प्रलंबित है। आप महासभा में डिक्लेअर करीए। आपको ज्ञान है की ठराव कर सकते है। हमको ज्ञान नही है। आज आप खुले मन से घोषणा कर दो मेरी तरफ से दौरे के लिए मंजुरी है।

**राजेंद्र जैन :-**

मेरा विरोध है।

**मा. आयुक्त :-**

आपल्या देशात सर्वात मुंबई महानगरपालिका मोठी आहे. ३० हजार कोटींचे बजेट आहे. तिथे सुध्दा आपण दौरा करू शकतो.

**उदित नारायण सिंग :-**

मा. आयुक्त साहेब मुंबई महानगरपालिकेचे सदस्य जिकडे दौरा करतात तिकडे आम्ही दौरा करणार.

**मा. आयुक्त :-**

प्रत्येक सभासदाला प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. ह्या मताचा मी सुध्दा आहे. मी सुध्दा इथे येण्यापूर्वी प्रशिक्षण घेतले आहे. भारतामध्ये जिकडे चांगली अर्बन बॉडी आहे. त्याठिकाणी दौरा करण्यासाठी माझी काही हरकत नाही त्याला संमत्ती देण्यांत येत आहे.

**मा. महापौर :-**

विषय मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०४ :-**

केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत बसेस खरेदी व जेईएफ ५ अंतर्गत प्रकल्प अहवाल बनविणे अवलोकनार्थ.

**ठराव क्र. ०५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत बस खरेदी करणेकरीता व बस डेपो विकसीत करणे व अत्याधुनिक उपकरणे कार्यान्वयीत करणेकरीता निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. या पात्र निविदाधारकांना महानगरपालिकेने दि. ५/०३/२०१४ रोजी कार्यादेश दिलेले आहेत.

बस खरेदी करण्यापूर्वी प्रशासनाने मा. स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक होते. तसेच सदर विषय हा शहराशी निगडीत असल्याने या सर्व योजनेची व बस चालविण्याचे धोरण निश्चित करणेकामी मा. महासभेची अंतीम मंजुरी घेणे आवश्यक होते. अश्या प्रकारची कोणतीही मंजूरी प्रशासनाकडून घेतलेली नसल्याने सदर अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला विषय नामंजुर करण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र एल. मेहता अनुमोदक :- श्री. प्रशांत केळुसकर**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक मालमत्ता देखभाल, दुरुस्ती करणेकरीता वार्षिक मुदतीच्या निविदा मागविणे व खर्चास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देणे बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक, तसेच विकास योजनेतील रस्त्याखालून विविध यंत्रणाच्या केबल्स, पाईप लाईन इ. टाकण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. संबधित यंत्रणाकडून, नविन केबल्स टाकणे, जलवाहिनी टाकणे त्याची दुरुस्ती करणे इत्यादीसाठी आवश्यक परवानगी घेऊन व शुल्क भरून खोदण्यात येतात. सदर दुरूस्ती शुल्कातून बाधित रस्ते दुरूस्ती केले जातात. यासोबत अतीवृष्टीमुळे पडणारे खड्डे देखिल महानगरपालिकेकडे विविध यंत्रणामार्फत रस्ते दुरूस्तीसाठी जमा केलेल्या रक्कमेतून, दुरूस्ती करून घेण्यात येतात. सन २०१४-१५ या वर्षाकरिता प्रभाग समिती निहाय अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रस्ते देखभाल, दुरूस्ती, पुर्नपृष्ठीकरण करणे, गतिरोधक बसविणे, रस्त्यावर थर्मोप्लास्टिक पट्टे मारणे इ. कामासाठी वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकिय/ आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. तसेच फुटपाथ / नाले / गटारे या वरील साफसफाई साठी बसविण्यात येणारी लोखंडी/ फायबर/ क्रॉक्रीटची झाकणे, गटारावरील स्लॅब दुरुस्ती, कर्बस्टोन, पेव्हर ब्लॉक, वॉटर टेबल, चेकर्ड लादी दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पातील तरतुदीप्रमाणे वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. महानगरपालिकेच्या असलेल्या मालमत्ता मध्ये मुख्य कार्यालय इमारत, इतर कार्यालयीन इमारती, प्रभाग कार्यालये, समाजमंदीर, बालवाडया, स्मशानभूमी, उद्याने, मैदाने, तळी विहीरी दुरुस्ती, शाळा इमारती, शौचालय दुरुस्ती, नामफलक यांची किरकोळ दुरुस्त्यासाठी देखील वार्षिक दर मागवून कंत्राटदार निश्चित केल्यास सर्व कामे तातडीने आवश्यकतेनुसार करुन घेता येतात. यासाठी सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षात तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत विविध आरक्षणे असून आरक्षणाच्या जागा ताब्यात येत आहेत. ताब्यात आलेल्या जागेना पक्के कुंपणभिंत घालून जागेचे संरक्षण करणे आवश्यक आहे. यासाठी निविदा मागवून दर निश्चित केल्यास आवश्यकतेप्रमाणे जागेना कुंपणभिंती घालता येतील. यासाठी देखील अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. तरी सदर तरतूदीमधुन वरील कामांसाठी वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम सदर विषयात कोणत्या हेडखाली काय रक्कम आहे कुठे कशी वापरणार काही दाखवले नाही. म्हणजे बजेटमध्ये किती आणि आर्थिक प्रशासकीय किती. सगळे क्लब करून टाकले आहे. म्हणजे रस्ता काय, गटार रिपेअरींग, इमारत रिपेअरींग काय, झाकण काय त्याचे विस्तारपूर्व पालन व्हावे. १) मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक, तसेच विकास योजनेतील रस्त्याखालून विविध यंत्रणाच्या केबल्स, पाईप लाईन इ. टाकण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. संबधित यंत्रणाकडून, नविन केबल्स

टाकणे, जलवाहिनी टाकणे त्याची दुरूस्ती करणे इत्यादीसाठी आवश्यक परवानगी घेऊन व शुल्क भरून खोदण्यात येतात. सदर दुरूस्ती शुल्कातून बाधित रस्ते दुरूस्ती केले जातात. यासोबत अतीवृष्टीमुळे पडणारे खड्डे देखिल महानगरपालिकेकडे विविध यंत्रणामार्फत रस्ते दुरूस्तीसाठी जमा केलेल्या रक्कमेतून, दुरूस्ती करून घेण्यात येतात. मान्सूनला सुरूवात होणार असल्याने शहरातील रस्ते व्यवस्थित करणे इ. कामे युध्दपातळीवर करावयाची असल्याने तसेच संबंधीत बांधकाम विभागाने सन २०१४-१५ या वर्षाकरीता प्रभाग समिती निहाय अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रस्ते देखभाल, दुरूस्ती, पुर्नपृष्ठीकरण करणे, गतिरोधक बसविणे, नामफलक दुरुस्ती, रस्त्यावर थर्मोप्लास्टिक पट्टे मारणे इ. कामासाठी वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकिय/ आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. २) फुटपाथ / नाले / गटारे या वरील साफसफाई साठी लोखंडी/ फायबर/ क्रॉक्रीटची झाकणे बसविणे, गटारावरील स्लॅब दुरुस्ती, कर्बस्टोन, पेव्हर ब्लॉक, वॉटर टेबल, चेकर्ड लादी दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पात रु. २.५० कोटीची तरतुद आहे. सदर तरतुदीच्या मर्यादेत वार्षिक दराच्या निविदा मागविण्यात व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. ३) महानगरपालिकेच्या विविध सार्वजनिक इमारती दुरुस्तीसाठी रु. २०.०० लक्ष तरतुद असून स्मशानभूमी दुरुस्तीसाठी रु. २०.०० लक्ष, शाळा इमारती दुरुस्तीसाठी रु. २०.०० लक्ष, सार्वजनिक शौचालय व मुतारी दुरुस्तीसाठी रु. ८०.०० लक्ष, तलाव, विहिरी दुरुस्तीसाठी / सफाईसाठी रु. ५०.०० लक्ष उद्यान व मैदाने दुरुस्तीसाठी रु. ५०.०० लक्ष तरतूद असून सदर कामांसाठी अर्थसंकल्पीय रकमेच्या मर्यादेत वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे. ४) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत विविध आरक्षणे असून आरक्षणाच्या जागा ताब्यात येत आहेत. सदर जागेना पक्के कुंपणभिंत बांधणे आवश्यक आहे. त्यासाठी उद्यान विकास, मैदान विकास, शाळा बांधकामे या लेखाशिर्षाखाली तरतूदी करण्यात आल्या आहेत. सदर तरतूदीमधून खर्चास व वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, प्रत्येक वेळेला झाकण, रस्ते ह्याअर्थी विकासासाठी आर्थिक, प्रशासकिय मंजुरी दिली जाते. त्यानंतर ते ठेकेदार त्या पध्दतीने काम व्यवस्थित करतात की नाही हे सन्मा.सदस्यांना विचारले तर बरं होईल. आपण लोकांचा पैसा ह्या गोष्टीसाठी खर्च करतो आणि त्या सुविधा त्या लोकांना मिळतात का? त्या सुविधा ठेकेदाराकडून मिळत नाही. तर पहिल्यांदा ठेकेदाराची चौकशी करा. प्रत्येक वेळेला आपण पालिकेचा खर्च करून प्रशासकिय आर्थिक मंजुरी देतो. परंतु तिथली झाकणं टाकली जात नाही. आता पावसाळा आहे. लहान मुले शाळेत जात असतात. जेष्ठ नागरीक असतात त्याच्यातून जाणे मुश्किल होते. कधी ती त्या आकाराची नसतात. आणतो म्हणून सांगणार पुन्हा त्यांचा पत्ता नसतो. त्याची पहिल्यांदा चौकशी करा. त्यानंतरच त्याचे पेमेंट किंवा पुढची प्रोसिजर करत जा. त्यासंदर्भात त्या ठेकेदारांना सांगितले की झाकणं उडाली आहेत ती टाका किंवा त्याचे फ्रेम बनवा तर ते वेळोवेळी हेच उत्तर देतात की आमचे पेमेंट मिळत नाही. त्यामुळे लेट होते. मग हि काम कशी करायची. आपण मंजुरी देतो आणि ही कामं का अडकतात? अशा ठेकेदारांना देऊच नका. आता ही नवघर पट्टयाला फेरी मारली तर आम्ही वेळोवेळी फ्रेम बदलायला सांगितल्या. अद्यापही तिथे पडल्या नाहीत ह्याची दखल घ्या.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक मालमत्ता देखभाल, दुरुस्ती करणेकरीता वार्षिक मुदतीच्या निविदा मागविणे व खर्चास प्रशासकिय / आर्थिक मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. ०६ :-**

मिरा-भाईदर महनगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक, तसेच विकास योजनेतील रस्त्याखालून विविध यंत्रणाच्या केबल्स, पाईप लाईन इ. टाकण्यात आलेल्या आहेत व येत आहेत. संबधित यंत्रणाकडून, नविन केबल्स टाकणे, जलवाहिनी टाकणे त्याची दुरूस्ती करणे इत्यादीसाठी आवश्यक परवानगी घेऊन व शुल्क भरून खोदण्यात येतात. सदर दुरूस्ती शुल्कातून बाधित रस्ते दुरूस्ती केले जातात. यासोबत अतीवृष्टीमुळे पडणारे खड्डे देखिल महानगरपालिकेकडे विविध यंत्रणामार्फत रस्ते दुरूस्तीसाठी जमा केलेल्या रक्कमेतून, दुरूस्ती करून घेण्यात येतात.

सन २०१४-१५ या वर्षाकरिता प्रभाग समिती निहाय अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रस्ते देखभाल, दुरूस्ती, पुर्नपृष्ठीकरण करणे, गतिरोधक बसविणे, रस्त्यावर थर्मोप्लास्टिक पट्टे मारणे इ. कामासाठी वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास प्रशासकिय/ आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

तसेच फुटपाथ / नाले / गटारे या वरील साफसफाई साठी बसविण्यात येणारी लोखंडी/ फायबर/ क्रॉक्रीटची झाकणे, गटारावरील स्लॅब दुरुस्ती, कर्बस्टोन, पेव्हर ब्लॉक, वॉटर टेबल, चेकर्ड लादी दुरुस्तीसाठी अर्थसंकल्पातील तरतुदीप्रमाणे वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या असलेल्या मालमत्ता मध्ये मुख्य कार्यालय इमारत, इतर कार्यालयीन इमारती, प्रभाग कार्यालये, समाजमंदीर, बालवाडया, स्मशानभूमी, उद्याने, मैदाने, तळी विहीरी दुरुस्ती, शाळा इमारती, शौचालय दुरुस्ती, नामफलक यांची किरकोळ दुरुस्त्यासाठी देखील वार्षिक दर मागवून कंत्राटदार निश्चित केल्यास सर्व कामे तातडीने आवश्यकतेनुसार करुन घेता येतात. यासाठी सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात विविध लेखाशिर्षात तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत विविध आरक्षणे असून आरक्षणाच्या जागा ताब्यात येत आहेत. ताब्यात आलेल्या जागांना पक्के कुंपणभिंत घालून जागेचे संरक्षण करणे आवश्यक आहे. यासाठी निविदा मागवून दर निश्चित केल्यास आवश्यकतेप्रमाणे जागांना कुंपणभिंती घालता येतील. यासाठी देखील अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. तरी सदर तरतूदीमधुन वरील कामांसाठी वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६, मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्वधर्मिय उत्सवातंर्गत सणांसाठी विविध व्यवस्था करणे कामी खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे बाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात साजरे होणाया उत्सव व कार्यक्रमांसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | सणाचे/ उत्सवाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | श्री गणेशोत्सव, माघी/ साखर चौथ गणेश विसर्जन व्यवस्था | ७०.०० लक्ष |
| २ | रमजान ईद/ बकरी ईद | ३.०० लक्ष |
| ३ | कार्तिक पौर्णिमा | ४.०० लक्ष |
| ४ | छट पूजा/ दशमादेवी उत्सव | ३.७५ लक्ष |
| ५ | गणगौर उत्सव | ५.०० लक्ष |
| ६ | वेलंकनी उत्सव | ४२.५० लक्ष |
| ७ | नवरात्र विसर्जन | १०.०० लक्ष |
| ८ | गुरूनानक जयंती | ५.०० लक्ष |
| ९ | महावीर जयंती | ३०.०० लक्ष |
| १० | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे रोजी ची व्यवस्था | ३.०० लक्ष |
| ११ | अर्थिक गणना/ पल्स पोलिओ/ जनता दरबार व्यवस्था | ७.०० लक्ष |
| १२ | श्रीगणेशोत्सव, नवरात्र, माघी गणपती, छटपूजा, दशमादेवी उत्सव, साखरचौथ गणपती दरम्यान करावयाच्या अतिरिक्त उपाययोजना | |
| अ | लाकडी तराफे व्यवस्था | १४.०० लक्ष |
| ब | फोर्क लिफ्ट व्यवस्था | ३.०० लक्ष |
| क | हायड्रॉलिक क्रेन व्यवस्था | ३.०० लक्ष |
| ड | बोटीची व्यवस्था | १६.०० लक्ष |

तसेच आंबेडकर जयंती, हनुमान जयंती व इतर जयंती साजऱ्या करण्यास वरीलप्रमाणे खर्चास व वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास तसेच आवश्यक निधी उपलब्ध करुन घेण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**अशरफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

कोई भी धर्म का कोई भी मागणी करे कोई लाख पचास हजार के होंगे उनको भी समाविष्ट किया जाए।

**अशरफ शेख :-**

रमझान ईद, बकरी ईद उत्सवासाठी होणाऱ्या खर्चास रू. तीन लक्ष मान्यतेकरीता विषय पटलावर आहे. त्यामध्ये ईद-ए-मिलाद, मोहरम, बोहरी व ख्वाजा समाजाच्या सणासाठी तसेच दर्ग्याचे ऊरुस विविध व्यवस्था करणेकामी तसेच प्रशासकिय व आर्थिक मंजुरी बाबतच्या विषयाचा समावेश करून विषय पटलावर घेण्यांत यावा व ह्या सणाच्या खर्चास ५० लाख इतकी आर्थिक व प्रशासकिय मान्यता देण्यांत यावी. तसेच

निविदा काढताना प्रभाग निहाय निविदा करण्यांत यावे. जेणेकरून स्थानिक नागरीकांना सोयीस्कर होईल व प्रशासनामार्फत संबंधित ठेकेदारांना नियत्रंण ठेवले जाईल अशी मी सुचना मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात साजरे होणाऱ्या उत्सव व कार्यक्रमांसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | सणाचे/ उत्सवाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | श्री गणेशोत्सव, माघी/ साखर चौथ गणेश विसर्जन व्यवस्था | ७०.०० लक्ष |
| २ | रमजान ईद/ बकरी ईद | ३.०० लक्ष |
| ३ | कार्तिक पौर्णिमा | ४.०० लक्ष |
| ४ | छट पूजा/ दशमादेवी उत्सव | १०.०० लक्ष |
| ५ | गणगौर उत्सव | ५.०० लक्ष |
| ६ | वेलंकनी उत्सव | ४२.५० लक्ष |
| ७ | नवरात्र विसर्जन | १०.०० लक्ष |
| ८ | गुरूनानक जयंती | ५.०० लक्ष |
| ९ | महावीर जयंती | ४०.०० लक्ष |
| १० | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे रोजी ची व्यवस्था | ३.०० लक्ष |
| ११ | आर्थिक गणना/ पल्स पोलिओ/ जनता दरबार व्यवस्था | ७.०० लक्ष |
| १२ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | ५.०० लक्ष |
| १३ | बाबासाहेब आंबेडकर जयंती | ५.०० लक्ष |
| १४ | महाराणा प्रताप जयंती | ५.०० लक्ष |
| अ | लाकडी तराफे व्यवस्था | १४.०० लक्ष |
| ब | फोर्क लिफ्ट व्यवस्था | ३.०० लक्ष |
| क | हायड्रॉलिक क्रेन व्यवस्था | ३.०० लक्ष |
| ड | बोटीची व्यवस्था | १६.०० लक्ष |

सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामाच्या निविदा मागविताना इलेक्ट्रीक सिटी कामाकरीता पी. डब्लूच्या लायसन्सची अट काढून टाकण्यात यावी. त्याचप्रमाणे आवश्यक असल्यास निविदा मागविताना रोजंदारी/ ठेका पध्दतीने काम करीत असलेल्या ठेकेदारास निविदा भरण्यास प्रवेश द्यावा. तसेच इतर आवश्यक नसलेल्या अटी व शर्ती शिथिल कराव्यात. जेणेकरून निविदा भरताना स्पर्धा निर्माण होवून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल असे पाहावे. उपरोक्त कामाकरीता वरीलप्रमाणे खर्चास व वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास तसेच आवश्यक निधी उपलब्ध करुन घेण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदर ठरावात उपसुचना मांडीत आहे की, डोंगरी - तारोडी येथे श्री. धारावी मातेचे पांडवकालीन मंदिर आहे. आगरी कोळी बांधवांची ग्रामदेवता असून त्याठिकाणी दरवर्षी महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असून धारावी मातेचे दर्शन घेण्याकरिता आगरी कोळी व इतर समाजातील हजारो संख्येने भक्तगण येत असतात. तरी श्री. धारावी माता मंदिर, डोंगरी-तारोडी उत्सवाकरिता दरवर्षी रु. १५ लक्ष इतकी रक्कम अनुदान म्हणुन देण्यात यावी.

**मदन सिंग :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

हनुमान जयंती आणि ईद बाबत ज्या सुचना मांडल्या आहेत. त्या समावेश करून क्लब करा.

**शिल्पा भावसार :-**

ईस्ट आणि वेस्टच्या धक्क्यावर पुष्कळ गुजराती लोक दशामा घरी आणतात. त्या उत्सवात खुप पब्लिक जमा होते. त्याच्यात पैशाची वाढ करून घ्यावी अशी माझी सुचना आहे.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम ख्रिसमस कार्निवल साठी ४० लाख समावेश करण्यांत यावे.

**मा. महापौर :-**

ठराव क्लब करून सुचनेसह मंजुर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०६ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्वधर्मिय उत्सवातंर्गत सणांसाठी विविध व्यवस्था करणे कामी खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणेबाबत.

ठराव क्र. ०७ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात साजरे होणाऱ्या उत्सव व कार्यक्रमांसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | सणाचे/ उत्सवाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | श्री गणेशोत्सव, माघी/ साखर चौथ गणेश विसर्जन व्यवस्था | ७०.०० लक्ष |
| २ | रमज़ान ईद/ बकरी ईद | ३.०० लक्ष |
| ३ | कार्तिक पौर्णिमा | ४.०० लक्ष |
| ४ | छट पूजा/ दशमादेवी उत्सव | १०.०० लक्ष |
| ५ | गणगौर उत्सव | ५.०० लक्ष |
| ६ | वेलंकनी उत्सव | ४२.५० लक्ष |
| ७ | नवरात्र विसर्जन | १०.०० लक्ष |
| ८ | गुरूनानक जयंती | ५.०० लक्ष |
| ९ | महावीर जयंती / पर्युषण | ४०.०० लक्ष |
| १० | १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, १ मे रोजी ची व्यवस्था | ३.०० लक्ष |
| ११ | अर्थिक गणना/ पल्स पोलिओ/ जनता दरबार व्यवस्था | ७.०० लक्ष |
| १२ | श्रीगणेशोत्सव, नवरात्र, माघी गणपती, छटपूजा, दशमादेवी उत्सव, साखरचौथ गणपती दरम्यान करावयाच्या अतिरिक्त उपाययोजना | |
| १३ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | ५.०० लक्ष |
| १४ | बाबासाहेब आंबेडकर जयंती | ५.०० लक्ष |
| १५ | महाराणा प्रताप जयंती | ५.०० लक्ष |
| अ | लाकडी तराफे व्यवस्था | १४.०० लक्ष |
| ब | फोर्क लिफ्ट व्यवस्था | ३.०० लक्ष |
| क | हायड्रॉलिक क्रेन व्यवस्था | ३.०० लक्ष |
| ड | बोटीची व्यवस्था | १६.०० लक्ष |

सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर कामाच्या निविदा मागविताना इलेक्ट्रीक सिटी कामाकरीता पी. डब्लूच्या लायसन्सची अट काढून टाकण्यात यावी. त्याचप्रमाणे आवश्यक असल्यास निविदा मागविताना रोजंदारी/ ठेका पध्दतीने काम करीत असलेल्या ठेकेदारास निविदा भरण्यास प्रवेश द्यावा. तसेच इतर आवश्यक नसलेल्या अटी व शर्ती शिथिल कराव्यात. जेणेकरून निविदा भरताना स्पर्धा निर्माण होवून महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल असे पाहावे.

उपरोक्त कामाकरीता वरीलप्रमाणे खर्चास व वार्षिक दराच्या निविदा मागविण्यास तसेच आवश्यक निधी उपलब्ध करुन घेण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली आहे.**

सदर ठरावात उपसुचना मांडीत आहे की, डोंगरी - तारोडी येथे श्री. धारावी मातेचे पांडवकालीन मंदिर आहे. आगरी कोळी बांधवांची ग्रामदेवता असून त्याठिकाणी दरवर्षी महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असून धारावी मातेचे दर्शन घेण्याकरिता आगरी कोळी व इतर समाजातील हजारो संख्येने भक्तगण येत असतात. तरी श्री. धारावी माता मंदिर, डोंगरी-तारोडी उत्सवाकरिता दरवर्षी रु. १५ लक्ष इतकी रक्कम अनुदान म्हणुन देण्यात यावी.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. असेन्ला मेंडोन्सा परेरा यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

हनुमान जयंती उत्सवाकरिता व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती करिता देखील अनुदान देण्यांत यावे. तसेच इतर कोणत्याही धर्माची रु. एक लाख, पन्नास हजार रक्कमेची मागणी असेल त्यांना देखील यामध्ये समाविष्ट करण्यात यावे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली आहे.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्वधर्मिय उत्सवांतर्गत सणांसाठी व्यवस्था करणे कामी खर्चास प्रशासकीय आर्थिक मान्यता देणे गोषवा-यातील मध्ये अ. क्र. २ मध्ये नमूद रमजान ईद / बकरी ईद उत्सवासाठी होणा-या खर्चास रुपये ३ लक्ष नुसार आर्थिक मान्यतेकरीता विषय पटलावर आहे.

त्यामध्ये ईद-ए-मिलाद/मोहरम/बोरी व खोजा समाजाचे सणासाठी तसेच दर्गांचे उरुस विविध व्यवस्था करणेकामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरीबाबतचा विषयाचा समावेश करुन विषय पटलावर घेण्यात यावा व या सणांच्या खर्चास रु. ५० लक्ष इतकी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. तसेच निविदा काढताना प्रभागनिहाय निविदा काढण्यात याव्यात जेणेकरुन स्थानिक नागरीकांना सोयीस्कर होईल व प्रशासनामार्फत संबंधीत ठेकेदारावर नियंत्रण ठेवले जाईल, अशी मी सुचना मांडत आहे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. मर्लिन मर्विन डिसा यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर क्रिसमस कार्निवल करिता ४० लक्ष ही रक्कम समाविष्ठ करावी.

**सदर ठरावात सन्मा. सदस्या श्रीम. शिल्पा भावसार यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

दशामा देवीसाठी जो खर्च आहे तो पब्लिक सार्वजनिक जास्त असून हा खर्च कमी आहे ते ७ लाख पर्यंत असावा अशी विनंती.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही /-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७, सन्मा. सदस्य श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो यांचा दिनांक ०६/०६/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत लागु केलेल्या भुमीगत गटार योजनेच्या करातुन मुर्धा-डोंगरी-उत्तन या परिसरातील करदात्यांना सुट देणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत भाईंदर (प.) व भाईंदर (पूर्व) तसेच मिरारोड या ठिकाणी भुमीगत गटार योजनेचे काम गेल्या दोन वर्षापासुन सुरु असुन सदरचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर असुन अंतिम टप्प्यामध्ये आहे. मिरा भाईंदर शहराकरिता सुरु असलेल्या भुमीगत गटार योजनेचा लाभ हा मुर्धा-डोंगरी-उत्तन या परिसरातील करदाते यांना मिळालेला नाही कारण सदर योजना या भागासाठी मनपाने लागु केलेली नाही तरीसुध्दा मुर्धा-डोंगरी-उत्तन या परिसरातील करदात्याकडुन मनपा सदर कर वसुल करीत आहे व ही बाब नैसर्गिक न्यायाला अनुसरुन नाही व एकप्रकारे हा तेथील करदात्यावर अन्याय होत आहे. स्थानिक करदात्यावर होणारा अन्याय लक्षात घेऊन मा. महापौर महोदया आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोन्सा व विधान परिषद सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी मा. आयुक्तांकडे लेखी पत्र देऊन सदरचा कर मुर्धा-डोंगरी-उत्तन परिसरातील करदात्याना कमी करणेकरिता मागणी केलेली आहे. तरी दि. १५/०२/२०११ च्या महासभेमध्ये पारित केलेल प्रकरण क्र. १०८ व ठराव क्र. ९४ या ठरावातुन सदरच्या करातुन मुर्धा-डोंगरी-उत्तन या परिसरातील करदात्यांना १०० % सुट देणेकरिता आजच्या महासभेमध्ये मी अनुसूची "ड" प्रकरण २ नियम २ अन्वये प्रस्ताव सदरचा मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**फरिद कुरेशी :-**

अनुसुची 'ड' प्रकरण २ नियम 'ज' अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत लागु केलेल्या भुमीगत गटार योजनेच्या मलःनिसरण करातुन मुर्धा-डोंगरी-उत्तन या परिसरातील करदात्यांना सुट देणेबाबत प्रस्ताव सदरच्या मा. महासभेमध्ये आहे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये विविध ठिकाणी भुमीगत गटार योजनेचे काम गेल्या दोन वर्षापासुन सुरु असुन ते अंतिम टप्प्यामध्ये आहे. मात्र सुरु असलेले भुमीगत गटार योजनेचा लाभ हा मिरा गावठण, काशी गांव, अग्रवाल कॉम्पलेक्स पासुन ते हर्मिटेज कॉम्पलेक्स या परिसरातील करदाते यांना मिळालेला नाही व योजनेचा लाभ प्रस्तावितही नाही. तरीसुध्दा या परिसरातील करदात्याकडुन मनपा सदरबाबत कर वसुल करीत आहे व ही बाब नैसर्गिक न्यायाना अनुसरुन नाही. तरी सदर प्रस्तावामध्ये मिरा गावठण, काशी गांव, अग्रवाल कॉम्पलेक्स पासुन ते हर्मिटेज कॉम्पलेक्स पर्यंतचा परिसर मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत लागु केलेल्या मलःनिसरण कर वगळण्यात यावा, अशी मी सुचना मुळ ठरावात मांडत आहे.

**अशरफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम खारीगांव, गोडदेव, नवघर ह्याठिकाणी अंडरग्राऊंड ड्रेनेजचे पाईप सिस्टिम आहे. त्यांना पण ह्या करामधून सूट देण्यांत यावी.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम ह्या सगळ्या सुचना येत आहेत. ह्याचे उपभोगते जे नाहीच आहेत. त्या सगळ्यांना माफ करा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम ह्यांच्यात दुरूस्तीचा शब्द असा आहे की ज्याठिकाणी ते उपभोगते नाही जी एरिया आपण वगळतो त्यांना टॅक्समधून वगळले पाहिजे. मग कोणतेही गांव असू दे कोणतीही एरिया असू दे.

**मा. महापौर :-**

जिथे पण गावठण एरिया आहे आणि ज्यांना ज्याचा लाभ नाही त्यांना हा कर लावण्यांत येणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, खारीगांवच, बी.पी.रोड, नवघर रोड त्यांनापण त्यांच्यातून वगळण्यांत यावे.

**प्रभात पाटील :-**

नवघर रोड, बी.पी.रोड गावठण नाही पण तिथे ती सुविधा नाही आणि होणार पण नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही सुचना दिली आहे ना. तुमची सुचना घेण्यांत येईल.

**नरेंद्र मेहता :-**

सदरचा विषय आपण प्रशासनामार्फत सादर केला असता तर कदचित ह्या शहरवासियांना कुठेतरी सुट मिळाली असती. कर कायद्याप्रमाणे जी काही आपल्याला सूट द्यायची असेल, रद्द करायची असेल ती २० फेब्रुवारीच्या आतमध्ये झाली पाहिजे. तरच ते इम्प्लीमेन्ट करता येते. आता अर्थसंकल्पाला मान्यता झाली आता ती तूट आपल्याला करून देता येणार नाही. ही आमची खात्री आहे. दरवेळी सभागृहामध्ये आपण शहरवासियांना आपण आश्वासन देतो की आम्ही रद्द करणार आणि ते होत नाही. मला मा.आयुक्तांना विचारायचे आहे की जो ठराव मांडला आहे. ते कमी होऊ शकते का? त्याचा आपण खुलासा केला तर बाकी आपल्याला सोपे होईल.

**मा. आयुक्त :-**

कुठल्याही कराचे प्रस्ताव आहेत त्याची "ज" च्या प्रस्तावामध्ये चर्चा होत नाही. तो प्रशासनाचा प्रस्ताव नाही. ती सभागृहाची भावना आहे किंवा सभागृहाने दिलेली सुचना आहे. त्याबरोबरच महापालिकेचे आर्थिक हीत विचारात घेता सरसकट माफ करता येणार नाही. आता आपण पाण्याचे काही ठिकाणी कमी देतो. ती सुध्दा अडचण निर्माण होईल. ह्याचा निर्णय तपासून घेण्यांत येईल. आज मी माझे भाष्य ह्यासाठी स्पष्ट करू इच्छित नाही की त्याचे इम्प्लीकेशन्स काय काय होती. त्याच्या अभ्यास करून नंतरच निर्णय घेतला जाईल.

**भगवती शर्मा :-**

इस सभागृह में पहली बार भी सन्मा. बर्नड डिमेलोने उत्तन, डोंगरी, मुर्धा, राई, मोर्वा का उल्लेख किया था। उसमे कुछ सदस्योने भाईंदर गांवठण की चर्चा की थी। सन्मा. प्रेमनाथ पाटील ने जो एरिया कहाँ उसका समावेश होना चाहिए। लेकिन बार बार चर्चा करने के बाद प्रशासन ने ध्यान न देते हुए कभी विषय नही लिया। क्योंकी हरबार यह कहते है की हमारे उपर आर्थिक बोजा आएगा। लेकिन मैं सभी सन्मा.सदस्य से निवेदन करना चाहूँगा प्रशासन नही देगा तो हम चूप बैठकर जनता के उपर अन्याय नही होने देंगे। मा. आमदार गिल्बर्ट मेंन्डोसा ने आपसे तीन बार पत्रव्यवहार किया। तीनो बार दिपक सावंतजी ने कहाँ की बजेट मे तरतूद नही है। सभागृह के सभी सदस्य एक राय प्रगट की है की जिनको सुविधा नही दि जा रही उनको उस कर से छूट मिलनी चाहिए। सबकी एक ही मागणी है। मेरा सन्मा.महापौर मॅडम से निवेदन है इसको भले ही इस वर्ष के लिए एक्झम्प्शन नही चाहिए लेकिन छ महिना दे सकते हे तो उसके उपर गंभीरता से विचार किया जाए। कोई रास्ता हो जो दो साल से टॅक्स भर रहे है। हमारी कोई मागणी नही कोई करदाताओं की मागणी नही है की जो वसूल किया टॅक्स वापिस दिया जाए। लेकिन इन सदस्य की जो माँगनी हे उसके उपर गंभिरता से विचार करे मैं पूर्ण विश्वास करूँगा की आप इसमे पूर्ण तरह से छूट प्रदान करेंगे।

**नरेंद्र मेहता :-**

प्रशासनानी हा विषय दिला होता. माहितीसाठी सांगतो यांना आणि मंजुर केला होता. आणि सरकारकडे भांडून आम्ही ते रद्द करावयाला लावले. प्रशासनाने जर विषय दिला की मलप्रवाह ह्या शहरात लावा. त्यावेळी आम्ही ठराव मांडलेला की ज्या भागात ही सुविधा नाही त्यांना हा कर लादू नये. ठराव नं.९४ त्यामध्ये ठरावावर मतदान झाले. भाजप/सेना ही भूमिका मांडली. ह्याच्यावर हा लावलेला कर अन्यायकारक असून ज्यांना ही सुविधा भविष्यात नाही. त्यावेळी मतदान झाले. मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य भगवती शर्मा ह्या सर्वांचे त्या ठरावाच्या बाजूने मतदान आहे की कर लावण्यांत यावे. आम्ही हे सांगितले होते की कर लावू नये. ठरावाची मागची कॉपी सुध्दा मी आणलेली आहे. ह्या ठरावात कर लावू नये आणि तरी कुठल्याही प्रकारे बहुमताच्या जोरावर हा कर लादला गेला. वारंवार आम्ही सांगितले की त्यांच्यावर हा कर लादण्यांत येऊ नये. उत्तन, राई, मुर्धा, मोर्वा, चेना, वर्सोवा त्यांना ह्या प्रोजेक्टमध्ये सुविधा नाही. त्यावेळी कोणी ऐकले नाही. त्यावेळी बहुमताच्या जोरावर हा ठराव केला आणि परत हा विषय आलेला आहे. त्यांचवेळी हा निर्णय घेतला असता तर रितसर त्या लोकांना सूट भेटली असती. हा भुर्दंड त्यांच्यावर आला नसता. आमची पहिलीपण भूमिका होती आतापण तिच भूमिका आहे. त्याच्यावर कर लादण्यांत येऊ नये. आता बजेट मंजुर झालेला आहे. इन्कम बाजू ज्यावेळेला कमी होतात खर्च बाजू देखील कमी व्हायला पाहिजे. आपण ज्या आर्थिक व प्रशासकिय मान्यता दिली ती कुठल्या हेडखाली ते कमी करणार त्या सगळ्या बाबींचा विचार होऊन हा रितसर विषय सादर करावा अशी माझी विनंती राहिल त्याच्यावर मी ठराव मांडत आहे.

**भगवती शर्मा :-**

साहब आपने कौन सा ठराव लाया पता नही। जो ठराव मे हमने कहाँ था की २० फरवरी के पहले नही ला सकते उसके उपर हमने मतदान किया था। जो प्रशासनसे जवाब मांगा जा रहा था की इस कर में छूट दे सकते है की नही दे सकते। बजेट में तरतूद है की नही। बजेट में तूट होगी की नही। सन्मा. सदस्य ने आयुक्त की भूमिका पहलेसे ही लगा दि है। इस शहर में जो कर के बोज से है जिनको आज हम वंचित करना चाहते है। आप उन लोगो के लिए वापिस वही भूमिका निभा रहे है। प्रशासन कभी भी गोषवारा नही

देगा। आज यह विषय आया है। आप से फिर से निवेदन करता हूँ की राजनिती न करते हुए इस विषय पे जैसे आपने एल.बी.टी. के विषय पे जो भूमिका सोची है वैसे इसके बारे में सोचिए।

**नरेंद्र मेहता :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिनीव्हल मिशन अंतर्गत भाईंदर (पूर्व) व भाईंदर (पश्चिम) तसेच मिरारोड या ठिकाणी भूमीगत गटार योजनेचे काम चालू आहे. सदर काम अंतिम टप्प्यात आहे. या योजनेचा लाभ सर्वसाधारणपणे भाईंदर (प.), भाईंदर (पूर्व) येथील नागरीकांना होणार आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १२९ (बब) नुसार मलप्रवाह सुविधा लाभ कर लागू करण्याची तरतुद आहे. उक्त तरतुदीनुसार महानगरपालिकेने दि. १५/०२/२०११ रोजी प्रकरण क्र. १०८, ठराव क्र. ९४ ने मलप्रवाह सुविधा लाभ कर सन २०११-१२ या वर्षापासून कर योग्य मुल्याच्या आठ टक्क्या प्रमाणे महानगरपालिकेतील सर्व मालमत्तांवर आकारण्यास सुरूवात केलेली आहे. मालमत्ता सुविधा कर लागू करणे संबंधी मा. महासभामध्ये दि. १५/०२/२०११ रोजी विषय ठेवला असता या विषयांचा ठराव मांडताना राई, मुर्धा, मोर्वा, उत्तन, पाली, डोंगरी इत्यादी गावांमधील मालमत्तांना हा कर आकारण्यात येवू नये असा आमच्या पक्षाने ठराव मांडला होता. परंतु सदर ठरावास त्यावेळेच्या सत्ताधारी पक्षाने आमच्या पक्षाने केलेल्या ठरावास बहुमताने नामंजुर करुन ठरावास मंजुरी घेतलेली होती. आज सादर केलेल्या ठरावास सुचक श्री. बर्नट डिमेलो व अनुमोदक श्री. जुबेर इनामदार यांनी त्यावेळी त्यावेळच्या ठरावास विरोध दर्शविलेला होता. परंतु उशीरा का होईना सन्मा. सदस्यांना लोकांच्या भावना व अडचणी समजून आल्या असून आमच्या पक्षाने त्यावेळी केलेल्या ठरावाचे महत्व आता समजलेले आहे. म्हणजे असे म्हणता येईल "देर आये, दुरुस्त आये।" तरी सदर सन्मा. सदस्यांचे आम्ही अभिनंदन करत आहोत. परंतु प्रत्येक वेळेस अश्याप्रकारे उत्तन येथील रहिवाश्यांची फसवणूक करणे योग्य नाही. घनकचरा प्रकल्प असो किंवा इतर शास्ती प्रकारचे कोणतेही प्रश्न असोत जर सन्मा. सदस्यांना खरोखरच या प्रकाराच्या कामाची कळकळ होती तर सदर विषय हा अधिनियमातील तरतुदीप्रमाणे २० फेब्रुवारीच्या आत मंजुर करून घेणे आवश्यक होते. परंतु ह्या वरुन असे दिसून येते की, जनतेच्या हितासाठी नव्हे तर त्यांच्या फसवणूकीसाठी सत्तधारी अश्याप्रकारे विषय घेत आहेत. सध्याची योजनेतील लाभार्थ्यांची वस्तुस्थिती पाहता मुर्धा ते मोर्वा, डोंगरी ते उत्तन परिसर, व चेणा घोडबंदर येथील नागरीकांना या योजनेचा लाभ होत नाही. तरी सध्या लागू असलेला मलप्रवाह सुविधा लाभ कर वरील गावातील मालमत्तांना सन २०१४-१५ या वर्षापासून आकारू नये. तसेच मिरा भाईंदर शहरात भुयारी गटार योजना रद्द करण्यात येत आहे. तसेच मालमत्ता करामध्ये या परिसरातील नागरीकांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती कराची आकारणी केली जात आहे. ही शास्ती कराची आकारणी यापुढे कर विभागाने करू नये असा ठराव मांडण्यात येत आहे. गरज भासल्यास सदर ठरावास शासनाकडून मंजुरी घेण्यात यावी.

**दिनेश जैन :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपको क्लब करने मे इझी होगा। उत्तन, राई, मुर्धा, मोर्वा त्यांचाही ठराव झाला होता. त्यांच्यावर शास्ती लावावी. जुनी घर आहेत ते आपले परिवार कुटुंब वाढल्या कारणाने थोडे फार वाढी करता ठराव मांडला गेला होता तो ठराव कॉंग्रेस पक्षाकडून मांडला गेला होता. त्याच्यावर शास्ती लावण्यांत येवू नये. तरी आपल्या मनपातर्फे शास्ती लावण्यांत येते. ती वगळण्यांत यावी तसेच तसेच जे.एन.एन.यू.आर.एम. प्रोजेक्ट तीन वर्षाच्या आत संपला पाहिजे होता तरी सात वर्ष झाली तरी संपला नाही परंतू लोक आजही मलप्रवाह कर भरतात आणि अजून तीन वर्ष होणार नाही. म्हणून शहरातन हा मलप्रवाह कर जिथ पर्यंत सुरू होत नाही वगळण्यांत यावे, असा आम्ही ठराव मांडतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम विरोधी पक्षनेते बोलतात काय आणि करतात काय. जर त्यांना खरच इच्छा असती तर ज्यावेळी स्टँडींगमध्ये प्रशासनाने अर्थसंकल्प दिला त्यावेळी हा कर त्यांनी माफ केला असता पण तुम्ही माफ केला नाही. ज्यावेळी आम्ही विषय आणला त्यामुळे आता इलेक्शन आले आहे. आपण ह्या शहरामध्ये घुसू या आणि क्रेडीट घेऊ या. मेहता साहेब तुम्हाला करायचा असता तर स्टँडींगमध्ये हा कर माफ केला असता पण तुम्ही केला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब खरोखरच आपल्याला ट्रेनिंगची आवश्यकता लागेल. आम्ही उद्या स्टँडींगमध्ये घेतो आणि मिरा भाईंदरचे सगळे कर माफ करून टाकतो. आम्हांला काही हरकत नाही जे होत नाही ते आम्हांला करायची आवश्यकता नाही. जे नियमात आहे तेच आम्ही करणार. स्टँडींगला करायचे असते तर आम्ही अनेक कर माफ केले असते. हा महासभेचा अधिकार आहे. आम्ही केल्याने होणार असेल तर आम्ही उद्या करतो.

(सभागृहात गोंधळ)

**बर्नड डिमेलो :-**

मला वाटते आमच्या गावावर सुरूवाती पासून दोन तीन आयुक्त गेले. प्रत्येक आयुक्तांना हा प्रश्न विचारला की ज्यावेळी आपल्याला प्रोजेक्ट दाखविण्यात आला त्यावेळी पण मी विचारतो ह्या एरियाचे काय? अगोदरच्या आयुक्तांनी देखील त्याचे उत्तर दिले नव्हते. आता विरोधी पक्षनेत्याचे म्हणणे पूर्ण शहराला आहे जो

पर्यंत चालू होत नाही तोपर्यंत पूर्ण बंद करावं. म्हणजे त्यांना तेच करायचे आहे की, हे बंद होऊ नये, आमचे एवढेच मत आहे की, जिथे कोट्यावधी खर्च करून शहरामध्ये जे प्लान उपभोग घेणार त्यांना ते लागू असावे जे उपभोग घेणारच नाही त्यांना त्या योजनेतून सूट द्यावी. किंवा त्याला वगळावं. ही मागणी असल्या कारणाने पूर्ण शहराचं बंद करावे तुम्हीच उत्तर दिले होते बजेटमध्ये जमणार नाही मला वाटते इकडीची तिकडची भाषा न करता तुम्हाला जर आवडत असेल सदर विभागाला ती योजना राबवली नाही. त्यांना वगळावे तर सरळ भाषेत सांगितलेले बरे. इकडचे तिकडे घुमवून पाणी फिरवायचे असेल तर एकाच हिशोबाने ठराव मांडावा अशी माझी विनंती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

बर्नड डिमेलोंनी उत्तन, राई, मोर्वा हे कायम स्वरूपी वगळण्यांत याव. मिरा भाईंदर शहरात तीन वर्षाचा काळ आहे. ॲडव्हान्समध्ये हे मलप्रवाह कर लावले होते. जी सुविधा अजून चालू झालेली नाही. त्याच्यावर कर आकारणी नक्की करायला पाहिजे. पण सुविधा तर चालू होऊ द्या. माझ्या माहितीप्रमाणे मा. आयुक्त महोदय हायकोर्टामध्ये ह्याच्याबद्दल मलप्रवाह कर आकारता येणार नाही. याबद्दल रिपिटीशन फाईल झाल होत आणि मला १०० टक्के माहित नाही. हायकोर्टाने पण ते नाकारले आहे की अजून चालू झालेले नाही. म्हणून तुम्हाला कर आकारणी करता येणार नाही. हायकोर्टाच्या रिपिटीशन बद्दल सभागृहाला खुलासा करावा.

**भगवती शर्मा :-**

हायकोर्टामध्ये इकडच्या स्थानिक लोकांनी एक रिट टाकली होती.

**राजेंद्र जैन :-**

मा. आयुक्त महोदय सरकारी कामकाज की सुचना हमे यहाँ से मिलेगी या प्रशासनसे मिलेगी।

**मा. महापौर :-**

आपने मेरा परवानगी नही लिया आप बैठीये। बाद में आप बोलिए।

**राजेंद्र जैन :-**

अधिकारी से सुचना मांगी गई है। प्रशासन देगा या नगरसेवक देगा। उनका विश्वास करेंगे की यहाँ का विश्वास करेंगे। ऑन रेकॉर्ड वहाँ से बोला जाए।

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

साहब स्थानिक लोगो ने एक रिट डाली थी। जो सिव्हरेज टॅक्स लगाए लेकीन उस रिट ते एक कन्डीशन थी स्थायी समिती के पहले लगाना चाहिए था। वह रिट डालने के बाद हायकोर्ट का निर्णय थी आया था। हम लोगो को भेजा था जिसके अंदर में हुआ था की सिव्हरेज टॅक्स से मुक्ती मिल गई है। मैने भी दिपक सावंत साहब से पुछा था की क्या हुआ ताकि हम लोग भी जनता के सामने जाके क्या हुआ क्या नही हुआ तो इन्होने बोला यह रिट हुई जिसमे स्थायी समिती नियात के पहले बाद के अंदर में जो ठराव किया था उसको डिसमिस किया है। उसके उपर निर्णय आया है। इसके उपर विधी अधिकारी बोलेगे।

**मा. आयुक्त :-**

डॉ. जैन साहेबांचा मुद्दा होता की प्रश्न उपस्थित झालेला आहे. आणि त्याचे उत्तर आम्ही द्यावे. उत्तर देण्यासाठी काही हरकत नाही. परंतू सभागृहामध्ये पिठासीन अधिकाऱ्यांनी ज्यांना डायरेक्शन दिलेले आहेत. त्यांनीच उत्तर द्यायला पाहिजे असा माझा समज आहे. कदाचित चूकीचे असेल तर मला सांगा. राहीला प्रश्न मलःनिसारण कर लावण्याबद्दल पी.आय.एल. कारण बरेचस दाखल झालेले होते. ह्यासंबंधी एक पी.आय.एल. जे झालेले होत ते पी.आय.एल. मा.उच्च न्यायालयांनी फेटाळले आहे. त्यामुळे कुठलेही कर वसूली करू नये ह्याला सध्या काही बंधन नाही.

**मा. महापौर :-**

दोन्ही ठराव क्लब करून ठराव मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. ०७ :-**

सन्मा. सदस्य श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो यांचा दिनांक ०६/०६/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव -- मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत लागू केलेल्या भूमीगत गटार योजनेच्याकरातून मुर्धा ते मोर्वा, डोंगरी ते उत्तन, घोडबंदर, चेणा या परिसरातील करदात्यांना सुट देणेबाबत.

**ठराव क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिनीव्हल मिशन अंतर्गत भाईंदर (पूर्व) व भाईंदर (पश्चिम) तसेच मिरारोड या ठिकाणी भूमीगत गटार योजनेचे काम चालू आहे. सदर काम अंतिम टप्प्यात आहे. या योजनेचा लाभ सर्वसाधारणपणे भाईंदर (प.), भाईंदर (पूर्व) येथील नागरीकांना होणार आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १२९ (बब) नुसार मलप्रवाह सुविधा लाभ कर लागू करण्याची तरतुद आहे. उक्त तरतुदीनुसार महानगरपालिकेने दि. १५/०२/२०११ रोजी प्रकरण क्र. १०८, ठराव क्र. ९४ ने मलप्रवाह सुविधा लाभ कर सन २०११-१२ या वर्षापासून कर योग्य मुल्याच्या आठ टक्क्या प्रमाणे महानगरपालिकेतील सर्व मालमत्तांवर आकारण्यास सुरूवात केलेली आहे.

सध्याची योजनेतील लाभार्थ्यांची वस्तुस्थिती पाहता मुर्धा ते मोर्वा, डोंगरी ते उत्तन परिसर, व चेणा घोडबंदर येथील नागरीकांना या योजनेचा लाभ होत नाही. कारण सदर योजना या भागासाठी मनपाने लागू केलेल्या नाही. तरीसुध्दा मुर्धा, डोंगरी, उत्तन या परिसरातील करदात्यांकडून मनपा सदर कर वसूल करीत आहे. ही बाब नैसर्गिक न्यायाला अनुसरुन नाही व एक प्रकारे हा तेथील कर दात्यावर अन्याय होत आहे. स्थानिक करदात्यावर होणारा अन्याय लक्षात घेऊन मा. महापौर महोदया, मा. आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोन्सा व विधान परिषद सदस्य मा. श्री. मुझफ्फर हुसेन यांनी मा. आयुक्तांकडे लेखी पत्र देऊन सदरचा कर मुर्धा, डोंगरी, उत्तन परिसरातील करदात्यांना कमी करणेकरिता मागणी केलेली आहे. तरी दि. १५/०२/२०११ च्या महासभेमध्ये पारित केलेल्या प्रकरण क्र. १०८ व ठराव क्र. ९४ या ठरावातून मुर्धा, डोंगरी, उत्तन या परिसरातील करदात्यांना १००% सूट देण्यात यावी व सध्या लागू असलेला मलप्रवाह सुविधा लाभ कर वरील गावातील मालमत्तांना सन २०१४-१५ या वर्षापासून आकारू नये. तसेच मिरा भाईंदर शहरात भुयारी गटार योजना रद्द करण्यात येत आहे. तसेच मालमत्ता करामध्ये या परिसरातील नागरीकांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शास्ती कराची आकारणी केली जात आहे. ही शास्ती कराची आकारणी यापुढे कर विभागाने करू नये असा ठराव मांडण्यात येत आहे. गरज भासल्यास सदर ठरावास शासनाकडून मंजुरी घेण्यात यावी.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- श्री. नरेंद्र मेहता**

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

अनुसुची 'ड' प्रकरण २ नियम 'ज' अन्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत लागु केलेल्या भुमीगत गटार योजनेच्या मलःनिसरण करातुन मुर्धा-डोंगरी-उत्तन या परिसरातील करदात्यांना सुट देणेबाबत प्रस्ताव सदरच्या मा. महासभेमध्ये आहे. तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये विविध ठिकाणी भुमीगत गटार योजनेचे काम गेल्या दोन वर्षापासुन सुरु असुन ते अंतिम टप्प्यामध्ये आहे. मात्र सुरु असलेले भुमीगत गटार योजनेचा लाभ हा मिरा गावठण, काशी गांव, अग्रवाल कॉम्पलेक्स पासुन ते हर्मिटेज कॉम्पलेक्स या परिसरातील करदाते यांना मिळालेला नाही व योजनेचा लाभ प्रस्तावितही नाही. तरीसुध्दा या परिसरातील करदात्याकडुन मनपा सदरबाबत कर वसुल करीत आहे व ही बाब नैसर्गिक न्यायाना अनुसरुन नाही.

तरी सदर प्रस्तावामध्ये मिरा गावठण, काशी गांव, अग्रवाल कॉम्पलेक्स पासुन ते हर्मिटेज कॉम्पलेक्स पर्यंतचा परिसर मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत लागु केलेल्या मलःनिसरण कर वगळण्यात यावा, अशी मी सुचना मुळ ठरावात मांडत आहे.

**सदर ठरावात सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

सदर ठरावात सुचना मांडीत आहे की, खारीगाव, गोडदेव, नवघर बंदर वाडी, तसेच बाळाराम पाटील रोड, नवघर रोड, नवघर फाटक रोड येथे भुयार गटार योजना होणार नसुन तरी त्यांना मलप्रवाह लाभकर रद्द करावी अशी मी सुचना मांडीत आहे.

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८, सन्मा. सदस्य श्री. हंसु कुमार पांडे यांचा दिनांक ०६/०६/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. मिरा भाईंदर शहराकरीता शासनाने लागु केलेला स्थानिक संस्था कर रद्द करणेबाबत.

**हंसुकुमार पांडे :-**

सन २०१०-११ मध्ये महाराष्ट्र शासनाने प्रायोगिक तत्वावर तीन ते चार महानगरपालिका हद्दीत स्थानिक संस्था कर नव्याने लागू केला आहे. त्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेचा समावेश होता. त्यानंतर राज्य शासनाने टप्पा-टप्याने सन २०१३ अखेर मुंबई वगळता राज्यातील सर्व महानगरपालिका हद्दीत स्थानिक संस्था कर लागू केलेला आहे. स्थानिक संस्था कर वसुली पध्दतीमध्ये स्वयंप्रेरित व स्वयं निर्धारणव्दारे कर भरावयाचा असल्यामुळे लघु व मध्यम उद्योग व्यापारांना अतिशय गैरसोयीचे व जिकरीचे होत आहे. स्थानिक संस्था कर पध्दतीमुळे शासनाच्या धोरणाबाबत नागरीकांमध्ये तीव्र नाराजी व असंतोष निर्माण झालेला आहे व यामुळे मागील वर्षी राज्यातील विविध शहरातील व्यापारांनी निदर्शने करुन आंदोलने केलेली आहेत. सदर कर रद्द करणेकरिता शहरातील व्यापाऱ्यांनी महानगरपालिकेकडे व शासनाकडे वेळोवेळी मागणी केलेली आहे. मिरा भाईंदर शहराचे आमदार श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा, विधानपरिषद सदस्य श्री. मुझफ्फर हुसैन व मा. महापौर व उपमहापौर महोदया यांनी राज्याचे मा. मुख्यमंत्री महोदयांकडे व शासनाच्या प्रधान सचिवांकडे मिरा भाईंदर शहराचा स्थानिक संस्था कर रद्द करणेकरिता आग्रही मागणी केलेली आहे. तरी संपूर्ण राज्यामध्ये विविध औद्योगिक संस्थांच्या माध्यमातून स्थानिक संस्था कर रद्द करणेबाबत सुरु असलेली चळवळ तसेच मिरा भाईंदर शहराच्या नागरिकांची व व्यापाऱ्यांच्या मागणीला प्रतिसाद देत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने लागू केलेले स्थानिक संस्था कर रद्द करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवावा व यास्तव महापालिकेला होणारा आर्थिक तोटा अनुदानाच्या स्वरुपात राज्य शासनाकडून प्राप्त करण्याची उपाययोजना करावी, असा मी ठराव मांडत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रशांत दळवी :-**

महाराष्ट्र शासनाने सन २०१०-११ या वर्षामध्ये स्थानिक संस्था कर नव्याने लागू केलेला आहे. हा कर लावताना मुंबई वगळता सर्व राज्यामध्ये स्थानिक संस्था कर चालू आहे. या कराची वसुलीची पध्दत अत्यंत क्लिष्ट आहे. वसुली पध्दतीमध्ये व्यापाऱ्याने स्वयंम प्रेरित व स्वाय्यत निर्धारनाव्दारे कर भरावयाच्या असल्यामुळे व्यापारी कारखानदार यांना अतिशय गैरसोयीचे होत आहे. व हा कर भरण्यास व्यापारी संघटना योग्य प्रतिसाद देत नाही. तसेच शासनाच्या या धोरणाबाबत व्यापारी वर्गात व नागरीकांमध्ये तिव्र नाराजी व असंतोष आहे. हा कर रद्द व्हावा म्हणून शहरातील व्यापारी नेहमीच महानगरपालिकेकडे व शासनाकडे आपला निषेध व्यक्त करीत आहे. एल.बी.टी. कर लागू होण्यापूर्वी शासनाने उद्योगधंद्यावर व्हॅट कर प्रस्तावित केलेला आहे. या व्हॅट करांमधून सर्व नगरपालिका व महानगरपालिकांना त्यांच्या हिश्यांची एल.बी.टी. कराची रक्कम देण्यात येईल असे आश्वासित केले होते. परंतु शासनाने नव्याने एल.बी.टी. कराची आकारणी करून उद्योजकांवर अतिरिक्त भार टाकलेला आहे. सदर एल.बी.टी. कर रद्द करणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे. या कार्यवाहीची वाट न पाहता मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि. १/०७/२०१४ पासून हा कर रद्द करावा तसेच अर्थसंकल्पात येणारी तुट भरून करण्याकरीता अन्य उत्पन्नाचे मार्ग तयार करावेत असा ठराव ठेवण्यात येत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

शासनाचा निर्णय होईपर्यंत १ जुलै पासून ह्या शहरात एल.बी.टी. बंद करावी. आपली महानगरपालिका तेवढी सक्षम आहे. एक दोन महिने लागतील. १५ ऑगस्ट पर्यंत सरकार आहे. तिथपर्यंत त्यांच्याकडून करून घ्यावे. दिड महिन्याचे नुकसान आपण भरू या. म्हणून १ जुलै पासून रद्द करावे. उद्या परवा फलक लावून पेपर नोटीस करून लोकांना सांगा की जुने बाकी आहे ते भरून घ्या १ तारखेपासून बंद.

**भगवती शर्मा :-**

साहब बहोत अच्छी सोच है। इन्होने बोला १ जुलै से उनसे वसूली किया जाए। हमारा भी यही मत है की शहर में एल.बी.टी. नही लगनी चाहिए। वैसा ही खुला मन दिखाओ सिव्हरेज के लिए जो अभी भर रहे है उत्तन, डोंगरी वाले उनके लिए न्याय करो। हमारी भी यही एक इच्छा है आप भी सी.एम. साहब के मिटींग मे गई थी जहाँ पे आपने बोला था हमारे शहर की भले ही एक एल.बी.टी. की वसूली हरसाल में बढती गई होगी। व्यापारीयों का इधर जनता का खुला मन है। लेकिन यहाँ पे आमदार साहब ने भी एक पत्र दिया था। यहाँ की एल.बी.टी. तुरंत रद्द की जाए। तत्कालीन सि.एम. ने ऑक्ट्रॉय के लिए ऑक्ट्रॉस हटाया जाएगा। उस समय व्हॅट लगाया जाएगा। व्हॅट लगाने के समय मे दुसरा कोई भी कर व्यापारियों को लागू नही होगा। लेकिन उसके बाद भी एल.बी.टी. लागू हो गई। लेकीन आज हमारा ठोस निर्णय है की, व्यापारीयों को एल.बी.टी. से मुक्त किया जाए। इनका भी एक सुचना ले लो।

**फरीद कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम माझी सुचना घेण्यांत यावी.

**मा. महापौर :-**

दोन्ही ठराव क्लब करून मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. ०८ :-**

सन्मा. सदस्य श्री. हंसु कुमार पांडे यांचा दिनांक ०६/०६/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव -- मिरा-भाईंदर शहराकरीता शासनाने लागु केलेला स्थानिक संस्था कर रद्द करणेबाबत.

**ठराव क्र. ०९ :-**

महाराष्ट्र शासनाने प्रायोगिक तत्वावर सन २०१०-११ या वर्षामध्ये स्थानिक संस्था कर नव्याने लागू केलेला आहे. शासनाने मुंबई वगळता सर्व शहरामध्ये टप्पाटप्प्याने स्थानिक संस्था कर चालू केला आहे. या कराची वसुलीची पध्दत अत्यंत क्लिष्ट आहे. वसुली पध्दतीमध्ये व्यापाऱ्याने स्वयंम प्रेरित व स्वाय्यत निर्धारनाव्दारे कर भरावयाच्या असल्यामुळे व्यापारी कारखानदार यांना अतिशय गैरसोयीचे होत आहे. व हा कर भरण्यास व्यापारी संघटना योग्य प्रतिसाद देत नाही. तसेच शासनाच्या या धोरणाबाबत व्यापारी वर्गात व नागरीकांमध्ये तिव्र नाराजी व असंतोष आहे. हा कर रद्द व्हावा म्हणून शहरातील व्यापारी नेहमीच महानगरपालिकेकडे व शासनाकडे आपला निषेध व्यक्त करुन आंदोलने करीत आहेत. मिरा भाईंदर शहराचे आमदार श्री. गिल्बर्ट मेन्डोंसा, विधानपरिषद सदस्य श्री. मुझफ्फर हुसैन व मा. महापौर व उपमहापौर महोदया यांनी राज्याचे मा. मुख्यमंत्री महोदयांकडे व शासनाच्या प्रधान सचिवांकडे मिरा भाईंदर शहराचा स्थानिक संस्था कर रद्द करणेकरिता आग्रही मागणी केलेली आहे.

एल.बी.टी. कर लागू होण्यापूर्वी शासनाने उद्योगधंद्यावर व्हॅट कर प्रस्तावित केलेला आहे. या व्हॅट करांमधून सर्व नगरपालिका व महानगरपालिकांना त्यांच्या हिश्यांची एल.बी.टी. कराची रक्कम देण्यात येईल असे आश्वासित केले होते. परंतु शासनाने नव्याने एल.बी.टी. कराची आकारणी करून उद्योजकांवर अतिरिक्त

भार टाकलेला आहे. सदर एल.बी.टी. कर रद्द करणेबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे. संपूर्ण राज्यामध्ये विविध औद्योगिक संस्थांच्या माध्यमातून स्थानिक संस्था कर रद्द करणेबाबत सुरु असलेली चळवळ तसेच मिरा भाईंदर शहराच्या नागरिकांच्या व व्यापाऱ्यांच्या मागणीला प्रतिसाद देत शासन स्तरावर एल.बी.टी. रद्द करण्याच्या कार्यवाहीची वाट न पाहता मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि. १/०७/२०१४ पासून हा कर रद्द करावा. तसेच अर्थसंकल्पात येणारी तुट भरून करण्याकरीता अन्य उत्पन्नाचे मार्ग तयार करावेत असा ठराव ठेवण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. हंसुकूमार पांडे** **अनुमोदक :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ९, सन्मा. सदस्य श्री. प्रशांत एन. केळुसकर यांचा दिनांक ०६/०६/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत परिवहन सेवेकरिता बस खरेदी करणे व बस चालविण्याचे धोरण निश्चित करणेबाबत.

**मा. महापौर :-**

विरोधी पक्षनेते केळूसकर सर का है। उनको बोलने दो। वह प्रेझेंट है उनको बोलने दो।

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम "ज" प्रस्ताव विषय पटलावर विषय आहे आणि त्याच्यावर कोणालाही बोलता येईल.

**मा. महापौर :-**

बोलता येणार आहे परंतू त्यांना सुरूवात तरी करू द्या. इथला नियम बोलत आहे. त्यांना दोन मिनिट बोलू द्या, मग कॅरी फॉरवर्ड करा. ज्यांनी नांव दिले आहे तो बोलणार.

**प्रशांत केळूसकर :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या व शहरामधील नविन होणारी बांधकामे व घर संकुलन विचारात घेता शहरामध्ये परिवहन व्यवस्थेत सुधारणा आणण्याकरीता व नागरीकांना कार्यक्षम परिवहन सेवा देणेकरीता महानगरपालिकेने सन २००९ मध्ये केंद्र शासनाच्या जव्हारलाल नेहरू नागरी पुर्नरोत्थान अभियान योजनेअंतर्गत २५० बसेस खरेदी करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ९ दि. २२/०५/२००९ व मा. महासभा ठराव क्र. ४ दि. १८/०४/२००९ अन्वये मंजुरी दिलेली होती. त्या अनुशंगाने पहिल्या टप्प्यात सन २०१० मध्ये ५० बसेस खरेदी केल्या होत्या. या ५० बसेस पी.पी.पी. तत्वावर चालविण्यात याव्यात असे धोरण मा. महासभा दि. ११/०२/२०१२ अन्वये ठराव क्र. ५१ प्रमाणे घेण्यांत आले व हा ठेका मे. कॅस्टोल इन्फ्रॉ.प्रा.लि. यांना प्रति कि.मी. रू. १ प्रमाणे रॅायल्टीच्या स्वरूपात देण्यात आलेला आहे. सदर ठेकेदार रॅायल्टीची ठरल्याप्रमाणे रक्कम मनपाकडे जमा करत नाही. व करारनाम्यातील अटीशर्तींचा भंग करीत आहे. या ठेकेदारावर मनपा कडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. त्याशिवाय सध्या देत असलेली बस सेवा निकृष्ठ दर्जाची असून सर्व बसेसची अवस्था दयनिय आहे. सदर परिवहन योजनेमध्ये ५० टक्के महानगरपालिकेचा व ५० टक्के ठेकेदाराचा सहभाग असावा असे ठरलेले होते. परंतु मे. कॅस्टोल इन्फ्रॉ.प्रा.लि. या ठेकेदारास ठेका देताना ५० टक्क्याचा सहभाग ठेकेदाराकडून घेतलेला नाही. यामुळे सद्या चालवित असलेला परिवहन ठेका नुकसानीस जात आहे. या ठेकेदाराच्या विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आलेली होती. त्यामध्ये १ ते १० मुद्दे उपस्थित करून मुद्दे निहाय कार्यवाही करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने परिवहन विभागास दिलेले आहे. परंतु यावर परिवहन विभागाने काय कार्यवाही केली याचा अहवाल देण्यात आलेला नाही. केंद्र शासनाच्या दि. १६/०८/२०१३ च्या निर्णयानुसार बसेस व आवश्यक साधनसामुग्री खरेदी करण्याचे धोरण निश्चित झालेले आहे. या धोरणाप्रमाणे महानगरपालिकेने मा. स्थायी समिती यांचे ठराव क्र. २९ दि. ७/०२/२०१३ नुसार बस व साधनसामुग्रीची मागणी बाबतचा अहवाल तयार करण्याचे काम मे. अर्बन मास ट्रांन्झीट कंपनी यांना दिले. केंद्र शासनाने दि.२४/०९/२०१३ च्या सी.एस.एम.सी. बैठकीमध्ये महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रकल्प अहवालाप्रमाणे बस व साधनसामुग्री खरेदी करण्यास निधी मंजुर केला. त्या अनुशंगाने १०० बसेस व साधनसामुग्री खरेदी करण्याच्या निविदा उपक्रमाने घाईघाईने मागविण्यात आलेल्या आहेत. या निवीदा मागवितांना परिवहन उपक्रमाने लोकप्रतिनीधी बरोबर कोणत्याही प्रकारची चर्चा केलेली नाही.

**(दर प्रती बस)**

| अ.क्र. | बसेसचा प्रकार | बसेसची संख्या | वोल्वा मोटर्स | टाटा मोटर्स | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | 400 mm diesel premium segment AC | १० | १,००,७४,०००/- | -- | १०,०७,४०,०००/- |
| २ | 900 mm diesel standard non AC | ७० | -- | ४०,१०,४४३/- | २८,०७,३१,०१०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | 650 mm diesel mini non AC | १० | -- | -- | -- |
| ४ | 900 mm diesel midi non AC | १० | -- | २६,११,४८८/- | २,६१,१४,८८०/- |

बसेस खरेदीसाठी करण्यासाठी दि. २७/१२/२०१३ व दि.१३/१२/२०१३ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली होती. यानंतर तांत्रिक दृष्टया पात्र असलेल्या ठेकेदारांना प्रशासनाने दि. ५/०३/२०१४ रोजी कार्यादेश दिलेले आहेत. प्रशासनाने दराबाबत विचारविनिमय निर्णय घेण्यासाठी दि. १४/०२/२०१४ रोजी सदर विषयाचा गोषवारा मा. स्थायी समितीस सादर करण्यात आला होता. गोषवारा सादर केल्यानंतर दि. १७/०२/२०१४ रोजी मा. स्थायी समितीची बैठक घेण्यात आली होती. वरील घटनाक्रम लक्षात घेता दि. २४/०९/२०१३ ते दि. ५/०२/२०१४ (गोषवारा मध्ये नमूद केल्याप्रमाणे) पर्यंत प्रशासनाकडे वेळ असून सुध्दा लोकप्रतिनिधींना या योजनेची माहीती व बस खरेदीचा तपशील मा. स्थायी समितीच्या सदस्यांना व नगरसेवकांना यांना दिलेली नाही. व परस्पर आपल्या अधिकाऱ्यात सदर निविदा अंतिम करून मंजुर केलेल्या आहेत. बस खरेदी करत असताना बस खरेदीचे धोरण कसे असावे, बस चालविण्याचे धोरण निश्चित करणे, कोणामार्फत, कोणत्या मार्गांवर बसेस धावणार आहेत, बसेसची देखभाल दुरूस्ती, इंधन वंगण, बस डेपो करीता जागा व अन्य Liability, महानगरपालिकेचे आर्थिक हित काय असावे, महानगरपालिकेने उभारलेली रक्कम कंट्राटदार गुंतवणूकीच्या माध्यमातून महानगरपालिकेस कसा देईल, सदर प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर द्यावयाचा असल्यास रॉयल्टीचा दर व पध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. या सर्व धोरणांची माहीती प्रशासनाने सर्व नगरसेवकांना देणे अपेक्षित आहे. परंतु अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही परिवहन विभागाकडून झालेली नाही. या उपक्रमामध्ये आपण सादर केलेल्या बस खरेदी निविदेमध्ये १० बसेस वॉल्वो कंपनीच्या असणार आहेत. या १० बसेस कोणत्या मार्गांवर चालणार आहेत. या बसेसची देखभाल दुरूस्ती या बसेसवर काम करणारे चालक व वाहक यांच्या कामाच्या मर्यादा कशा असाव्यात, या महागड्या बसेस परिवहन विभाग कुठे उभ्या करणार आहेत, प्रती कि.मी. च्या मागे भाडे किती असावेत इ. चा सविस्तर अहवाल व धोरण परिवहन विभागाने तयार करणे आवश्यक होते. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांची लांबी व रूंदी व सध्याची परिस्थिती पाहता वॉल्वो बसेस चालविणे प्रशासनाच्या मर्यादापलिकडे आहे. सदर विषय धोरणात्मक असल्याने बसेस खरेदी करणे व धोरण निश्चित करणेकामी मा. महासभेमध्ये चर्चा होऊन निर्णय घेणे अपेक्षित होते. तरी मा. आयुक्त सो., यांनी दिलेले कार्यादेश रद्द करण्यात यावे. व संबंधीत ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे देयक देवू नये. सदर विषय हा धोरणात्मक असल्याने मा. महासभेपुढे फेरसादर करून त्यावर सखोल चर्चा व्हावी अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच याकामी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, दिलेले कार्यादेश रद्द करण्यात यावे व बस खरेदीचे धोरण निश्चित करणे व खरेदी करणे. तसेच वस्तुस्थितीचे गांभीर्य वरील हकीगतीचा विचार करता परिवहन उपक्रमाकरीता जीईएफ-५ योजनेअंतर्गत व बस खरेदी करणेकरीता मागविण्यात आलेली निविदा देणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**राकेश शहा :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, २०१० साली आपण निर्णय घेतलेला मिरा भाईंदर महानगरपालिकेची बसेस ठेका पध्दतीने चालावी आणि त्यामध्ये ५० टक्के गव्हरमेन्ट ग्रॅन्ट होता आणि ५० टक्के महानगरपालिकेचा सहभाग होता. त्यावर महानगरपालिकेने ठरवले की ५० टक्के आपल्याला टाकता येणार नाही. आणि बसेस सगळ्या सांभाळता येणार नाही. जुना ठेका आपण रद्द केला. नुकसान भरपाई महानगरपालिकेने आपल्या फंडातून त्यांना करून दिली. कारण ठेक्याची मुदत आपण रद्द केली. आपल्याला ३-४ करोड रूपये मोजायला लागले. जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत बसेस प्राप्त झाले. १०० बसेसचा करारनामा केस्ट्रल इन्फ्रा. ह्याच्यांमार्फत केला गेला. मिरा भाईंदर महानगरपालिका महासभेने ठरवले होते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये जेवढी परिवहन सेवा आहे. ठेका पध्दतीने ठेकेदारामार्फत चालवली जाणार. महानगरपालिकेचा जो काही सहभाग आहे तो ठेकेदार भरतील आणि प्रती १ रूपया कि.मी. प्रमाणे त्यांच्याकडून आकारणार. ५२ बसेस पहिल्या ५० बसेस नंतर टोटल १०२ बसेस या मिरा भाईंदर शहरात चालत होत्या. त्या आता ४० वर आल्या आहेत. आता सर्वात जास्त नुकसान उत्तनच्या एकमात्र प्रवास आहे. बसेस आहे. बाकी ठिकाणी शहरी भाग आहे. रिक्शा इझीली शेअरिंगवर अवेलेबल होतात. उत्तनकरांचे सर्वात जास्त हाल होतात. यावर अनेकदा चर्चा झाली पण बसेसमध्ये आजपर्यंत सुधारणा आली नाही. ह्यावर मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन पण दाखल झाली. त्यावर १० मुद्यांवर चर्चा पण झाली. त्यावर कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही. १०२ बसेसचे कॉन्ट्रक्टर आणि ४० बसेस चालतात. अजून आपल्याकडुन त्याच्यावर काही निर्णय झालेला नाही. ठेकेदारावर कुठल्याही प्रकारची कारवाई केली गेली नाही. हे सगळे आपण महासभेत ठरवले. आमची बसेस आम्ही चालवू शकत नाही. म्हणून ठेकेदाराला अपॉइन्ट केले आता नविन गव्हरमेंन्ट जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत आपल्याला नविन बसेस १०० टक्के ग्रॅन्टनी द्यायचा हा निर्णय झाला. ज्यावेळी निर्णय झाला तेव्हा मा. आयुक्त प्रशासनांनी महासभेपुढे यायला पाहिजे की एवढ्या बसेस आपल्याला उपलब्ध होणार आहे. त्यामध्ये महासभेचे धोरण काय? आपण चालवणार गव्हरमेन्ट कडून ग्रॅन्ट घ्यायची १०० टक्के ठेकेदाराला अनुदान घ्यायचे किंवा महानगरपालिकेने चालवायची. किती बसेस घ्यायची. उदा. सांगतो माझ्या माहितीप्रमाणे व्हॉल्वो बसेस ५०

मंजुर झाल्या होत्या. पण त्या १० चं घ्यावी. आता १० का ५० का नाही. ते कोणी ठरवायचे हा महासभा सुप्रिम बॉडी आहे ह्यांनी ठरवायला पाहिजे की ती बसेस आपण घ्यायच्या. परस्पर अधिकारी जाऊन सांगून आले की १० बसेस आम्हांला द्या. व्हॉल्वो बस म्हणजे एक करोडची बस. आपण ती १०-१५ लाखाची बस सांभाळू शकत नाही. आपल्या बसेस उभ्या उभ्या जळतात. बसेसची व्हॉरेन्टी गॅरंटी ह्याला पर्याय नाही. आपल्याकडे व्हॉल्वो बसेसचा ड्रायव्हरपण नाही. अर्धे ड्रायव्हर विदाऊट बॅचेस वाले बसेसची परिस्थिती अशी आहे. पत्रा वाकडा झाला, ॲक्सीडेन्ट होता. सगळ्या बसेस नॉन मेन्टेनन्स आहेत. १-१ करोडची बस घेऊन त्याचा मेन्टेनन्स करायची आपली क्षमता आहे का? आणि ह्या सगळ्या विषयावर ज्यावेळी महासभेने ठरवले की मिरा भाईंदर शहराच्या बसेस पीपीपी तत्वावर चालतील. मा. आयुक्तांना किंवा प्रशासनाला वाटले असेल की हे शहराच्या हिताचे आहे किंवा हे मनपाच्या हिताचे आहे. हा विषय महासभेपुढे सादर केला पाहिजे होता की आता आपण ह्यामध्ये काय केले पाहिजे. आपण बसेसची ऑर्डर देऊन टाकली. ते ठेकेदार चालवणार की महानगरपालिका चालवणार. उद्या विषय आणला आणि बोलणार आम्ही चालवणार. मग आपण काय करणार? त्यावेळी काय बोलणार आणि अधिकारी पण मला वाटत नाही कोण चालवेल. मग बसेस कोण चालवणार? ह्यासाठी निर्णय होणे गरजेचे होते. शासनाची मंजुर केलेली तारीख आपण बघा. अंतिम मान्यता झालेली २४/०९/२०१३ रोजी आपल्याला निधी मंजुर झाला. बसेस ॲलोट झाली. मा.आयुक्तांनी निधी मान्यतेसाठी निविदा स्थायी समितीपुढे सादर केले. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जून अजुन स्टँडींगपुढे निविदा गेली नाही. निविदा ओपनच होत नाही. मा. आयुक्तांनी ९ व्या व १० व्या महिन्यांत बसेसचा विषय सादर करायला पाहिजे. ह्या शहरात लोकप्रतिनिधी आले. स्थायी समिती सक्षम बॉडी आहे. त्याच्या परवानगीची आवश्यकता नाही. असे अनेकदा झाले. आम्ही ह्या मनपामध्ये पी.पी.पी वर ठराव केला आम्ही स्टँडींगमध्ये महापौरांच्या अधिकाराचा वापर करायचा का? आमचा अधिकार नाही . आम्ही चर्चा करत होतो. नक्की ह्या महासभेने धोरण ठरवले आहे. त्याला ओव्हर रूल करायचे का? निविदा परस्पर द्यायची का? पॉलिसी आम्हांला माहित नाही. ड्रायव्हर कोण? कंडक्टर कोण? पद मंजुरी झाली की नाही झाली? आणि व्हॉल्वो बस घेऊन ठेका पध्दतीने ड्रायव्हर देणार. १०,०००/- वाला ते बस चालवतील का? एवढा घाई घाईने हा निर्णय घेतलेला आहे. का घेतला? हा प्रश्नचिन्ह आहे. ह्या सभेत आमचे गंभीर म्हणणे आहे की, महासभेपुढे निर्णय होणे गरजेचे आहे. सदर बसेस खरेदी करायला पाहिजे की, नाही करायला पाहिजे. १०२ बसेस केल्या. त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करत नाही ठेकेदारांना आपण कॅन्सल करत नाही. आमची ठाम मत आहे. मा. आयुक्त साहेब स्टँडींग आणि महासभेचे दोघांचा अधिकार वापरला ह्याचा खुलासा करावा.

**मा. आयुक्त :-**

केंद्र शासनाने पूर्ण देशाची जी मोठी महानगर आहे. जी मोठी शहर आहेत किंवा जी वेगाने वाढणारी शहरं आहेत. त्यासाठी जवाहरलाल नेहरू नागरी पुर्नःनिर्माण योजना घोषित केली होती. त्या योजनेचे स्वरूप वेगळे होत. सुरूवातीला जेव्हा आपण वेगळे प्रस्ताव सादर केले. त्यामध्ये बस खरेदी हा एक प्रस्ताव होता. त्याच्यानंतर अंडर ग्राऊंड सिव्हरेज सिस्टम हा एक होता आणि बी.एस.यु.पी. हा तिसरा प्रस्ताव होता. ह्या तिन्ही प्रस्तावामध्ये केंद्र शासनाकडून आपल्याला ३५ टक्के अनुदान, राज्य शासन १५ टक्के अनुदान आणि उर्वरित खर्च त्या-त्या मनपानी करायचा होता. बस खरेदीचा प्रस्ताव जेव्हा मा. महासभेपुढे आला. मा.महासभेने २५० बसेस खरेदीचा प्रस्ताव, आर्थिक, प्रशासकिय मान्यता ही २००९-१० मध्ये दिली होती. त्यानुसार सुरूवातीलाच जेव्हा आपण प्रस्ताव सादर केला तेव्हा ५० बसेसचा केला आणि नंतर आपण कन्सलटंन्ट नेमला. केंद्र शासनाची उप-कंपनी आहे. ए.यू.एम.पी.सी. म्हणून त्या कंपनीला आपण आपला कन्सलटन्ट नेमला. त्या कन्सलटन्टली असा अहवाल दिला की, ह्या शहराची एकूण बसेसची संख्या १५० ते १८० असायला पाहिजे. बाकीच्या कालबाह्य झालेल्या बसेस सोडून ५० बसेस रस्त्यावर होत्या. म्हणून आपण १०० बसेसचा प्रस्ताव तयार केला. रस्त्याची विविध पातळीवर तपासणी झाली. एम.एम.आर.डी.ए. लेवलला तपासणी झाली. राज्य शासनाची त्याला शिफारस केली. केंद्र शासनांनी देखील त्यांला विविध यंत्रणेतून तपासून घेतले. त्या प्रस्तावाला साधारणतः सप्टेंबर- ऑक्टोबर मध्ये मान्यता दिली. मान्यता दिल्यानंतर त्यांनी हे सुध्दा निकष ठरवून दिले की, आपण कुठल्या प्रकारच्या बसेस घ्यावा त्याचे स्पेसिफिकेशन काय असावे. मॅन्युफॅक्चर कोणता देण्यांत यावे, असे विविध बंधन टाकले होते. विविध सुचना देखील निविदा सुचनामध्ये काय काय अंतर्भुत असावे हे देखील ठरवून दिलेले आहे. त्यानुसार आपण निविदा सुचना प्रसिध्द केल्या. सुरूवातीला त्याला आपण मुदतवाढ दिली. मुदत दिल्यानंतर आपण त्याचे ज्या निविदा सुचना आल्या. त्याची तांत्रिक तपासणी केंद्र शासनाच्या कंपनीकडून तपासून घेतली आणि तपासून घेतल्यानंतर जेव्हा त्यांनी म्हटले की ह्या निविदा योग्य आलेल्या आहेत. त्याच्या बरोबर फायनाशियल बीड ओपन केली. व फायनाशियल बीड ओपन केल्यापंतर त्याच्या सोबत वाटाघाटी सुध्दा केल्या. आणि वाटाघाटी करून त्याचे दर आपण काही प्रमाणात कमी करून घेतले. ही कार्यवाही काही प्रमाणात कमी करून घेतले. ही कार्यवाही अत्यंत पारदर्शक प्रमाणे पार पाडली. त्यानंतर केंद्र शासनाने एक बैठक घेतली. त्यांनी अशा सुचना दिल्या की आपल्याला जे काही आदेश द्यायचे आहेत ते २८ फेब्रुवारी पूर्वी द्यायचे आहेत. आपण १४ फेब्रुवारी २०१३ मा. स्थायी समितीला प्रस्ताव दिला. स्थायी समितीला प्रस्ताव दिल्यानंतर आणखी एक पत्रही दिल की आपण हा निर्णय तातडीने घ्यावा. कारण आपल्या २८ फेब्रुवारी पूर्वी करायचे आहे. परंतू तो निर्णय होऊ शकला नाही. १४ फेब्रुवारी नंतर ५ मार्चला आणि आपल्याला माहिती होते की, आचारसंहिता कधीही लागू शकते. आणि एकदा आचारसंहितेत

अडकल्यानंतर परत कार्यादेश देता येत नाही. नियमानुसार ते शक्य होत नाही. आपण ५ मार्चला माझ्या अधिकारामध्ये ७३ क अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे ७३ क अन्वये मला अधिकार असल्याचा वापर करुन १५ दिवसांच्या आतमध्ये जर स्थायी समितीने जर निर्णय घेतला नाही तर आयुक्तांच्या अधिकारामध्ये तो निर्णय मी घेतला. हा निर्णय परत केंद्र शासनानी, राज्य शासनानी तपासून पाहिला आणि मला हे सांगायला आनंद होतो की ह्यामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेने ज्या बसेस खरेदी केल्या आहेत. त्या इतर मनपाच्या तुलनेमध्ये आपले दर कमी आहेत. हे सांगायला मला आनंद वाटतो. आपल्याला जर आकडेवारी पाहिजे असेल तर आकडेवारी काढून ठेवलेली आहे. ती वाचून दाखवतो. आपण प्रिमियम सिक्वेंट मधल्या व्हॉल्वोच्या १० बसेस घेतल्या १० बसेससाठी आपण युरो फोर ह्या बसेस निवडल्या. महाराष्ट्रामध्ये दोन मनपा आणि इतर ह्याच्यामध्ये युरो फोरच्या ५-६ मनपाच्या तुलनात्मक तक्ता माझ्याकडे आहे. उदा. सोलापूर मनपाचे दर हे आपल्या दरापेक्षा जास्त दर आहेत. आणि महाराष्ट्रात सगळ्यात कमी दर मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आहेत हे सांगताना मला आनंद होतो. ९०० एम.एम. डिझेलच्या ज्या बसेस आहेत नॉन एसी बसेस त्यामध्ये आपण ३० बसेस घेतल्या आहेत. त्या ३० बसेसचे दर कल्याण डोंबिवली मनपाचे दर आणि आपल्या मनपाच्या दराची तुलना केली तर आपले दर कमी आहेत. ९०० एम.एमच्या ७० मिनी बस घेतल्या आहेत. त्यामध्ये आपले दर जे आहेत ते नवी मुंबई आणि सोलापूरपेक्षा ते कमी आहेत. सांगायचे तात्पर्य हे की मिरा भाईंदर महानगरपालिकेचे दर कमी आहेत हा एक भाग आणि फक्त मुंबई महापरिषदेमध्ये एकमेव महापालिका अशी आहे की मागच्या वेळेला केंद्र शासन आणि राज्य शासन मिळून ५० टक्के अनुदान मिळाले होते. ह्यावेळेला राज्य शासन आणि केंद्र शासन १०० टक्के अनुदान देत आहे. ही बाब मी इथे अभिमानाने नमूद करु इच्छितो. ह्यानंतर केंद्र शासनाने आपली सगळी प्रक्रिया तपासली. नवीन सरकार सत्तेमध्ये आले आणि जे दर आपण दिले होते त्या दरांना त्यांनी मान्यता दिलेली आहे त्याप्रमाणे पैसे देखील मुक्त केलेले आहेत. निधीदेखील मुक्त करण्यात आलेला आहे. माझ्याकडे दि. ९ जून २०१४ केंद्रशासनाचा जी.आर. आहे. त्या जी.आर. अन्वये ५० टक्के रक्कम म्हणजे त्यांच्या हिश्याची ८० टक्के रक्कम होती. त्याच्या ५० टक्के रक्कम कार्यान्वीत निधीस मान्यता दिलेली आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे हा व्यवहार अत्यंत पारदर्शक झालेला आहे. ह्याच्यात आपल्या सोबत बाकीच्या महानगरपालिका होत्या पण ज्या महानगरपालिका २८ फेब्रुवारी किंवा आचारसंहिता लागण्यापूर्वी कार्यादेश दिले नसतील तर त्यांचा बसेसचा प्रस्ताव रद्द होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तर आपण ह्या शहराचे नुकसान करायचे १०० बसेस मागवायच्या नाहीत की, आपण त्याला आणखी विलंब लावायचा ह्या सदर हेतूने हा निर्णय घेतलेला आहे आणि तो निर्णय पारदर्शकपणे घेण्यात आलेला आहे. ह्यामध्ये इतर मनपाचे रेट माझ्याकडे आहेत आणि फक्त ह्या जी.आर नुसार आपल्या महाराष्ट्रामध्ये फक्त चार मनपाला हा निधी मिळाला आहे. आठ मनपानी प्रस्ताव सादर केले होते. चार मनपानी वर्कऑर्डर वेळेवर न दिल्यामुळे त्यांची ऑर्डर कॅन्सल होतील किंवा त्यांना अनुदान वितरीत होणार नाही. त्यांना बसेस मिळणार नाहीत त्यांना बसेस मागवायच्या झाल्या तर नविन धोरणामध्ये बदल होणार आहेत. त्या बदललेल्या धोरणामध्ये त्यांना सुधारीत प्रस्ताव सादर करायला लागेल. त्याच्यातून आपण वाचलेलो आहेत. आपण १०० पैकी ९० चे आदेश दिले आहेत. ९० बसेस आपल्याला येत्या कालावधीमध्ये मिळू शकतील. दुसरा प्रश्न होता कंत्राटदार किंवा ऑपरेटर नेमण्याची ऑपरेटर नेमण्यासाठी सॅमलटेनिस्ली प्रोसेस सुरु केलेली आहे. आपण असे कधी करणार नाहीत की बसेस येऊन उभ्या आहेत आणि ऑपरेटरची कारवाई सुरु आहे. आपण असे नियोजन केलेले आहे की ऑपरेटर नेमायच आणि बसेस एकाच वेळी यायच आणि ऑपरेटर समजा नेमला आणि बसेसची वाट बघत बसायची कारण वातावरण अनिश्चिततेच होत म्हणून आपल्याला तेही करणे शक्य नव्हते. म्हणून आपली ती ही प्रोसेस चालू आहे. त्यासाठी टेंडर १-२ दिवसात प्रसिध्द होतील. त्यामध्ये केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या विविध यंत्रणानी ज्या उपाययोजना सुचवल्या आहेत. जी कार्यपध्दती ठरवून दिलेली आहे त्या कार्यपध्दतीचाच वापर करुन आपण ते टेंडर नोटिस काढतो. टेंडर नोटिस काढण्याचा हेतू हा आहे की शहरामध्ये एक ऑपरेटर असला तर तिथे मोनोपॉली होऊ नये म्हणून आपण त्याला दुसरा ऑपरेटर तयार व्हावा. दुसऱ्या ऑपरेटरमार्फत देखील व्हाव. आता योगायोगाने हाच ऑपरेटर कमी ह्याच्याने झाला तर त्याच्यावर आपल्याला निर्णय घ्यावा लागेल. तो भाग वेगळा परंतु पर्यायी व्यवस्था असावी. म्हणून आपण पूर्णपणे विचार केलेला आहे. त्याच्या रुटचा आम्ही अभ्यास केलेला आहे. हे सगळे केल ते मा. महासभेने २५० बसेस खरेदीला आर्थिक प्रशासकीय मान्यता देणे आणि आयुक्तांना जे अधिकार प्रदान केलेले आहेत. नियमाची तरतुदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ७३ "क" चा वापर करुन केलेले आहे. शासनाकडे देखील माझ्या माहितीप्रमाणे काही तक्रारी झालेल्या आहेत. शासनाकडे देखील अहवाल गेलेला आहे. शासनाने देखील आपला मुद्दा उचलून धरण्याच्या ह्याच्यात आहेत. आपला मुद्दा राज्य शासनाने, केंद्र शासनानी तपासला आणि केंद्र शासनाने तपासून निधी देखील उपलब्ध करुन दिलेला आहे. ह्यामध्ये मला १ टक्के देखील शंका नाही की ह्याच्यात काही गैरव्यवहार झाला असेल पूर्णपणे पारदर्शीरित्या कारवाई अवलंबिली गेलेली आहे. मा. स्थायी समितीला आपण प्रस्ताव दिलेला होता. त्याच्यानंतर मी एक पत्र ही दिल होत आपण लवकर निर्णय घ्या. आचारसंहिता लागेल आणि आपली अडचण निर्माण होईल आणि त्याच्यानंतरच परिपूर्ण संधी देऊन हा निर्णय घेतलेला आहे. ह्या निर्णयामध्ये योग्य बदल करावा आणि प्रक्रिया पूर्ण करावी. ह्या शहराचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे हे सुध्दा आपण

ध्यानात घेतले पाहिजे. ८० टक्के गर्व्हमेंट ऑफ इंडिया २० टक्के गर्व्हमेंट ऑफ महाराष्ट्र हे अनुदान आपल्या महानगरप्रदेशामध्ये आपली मनपा सोडली तर ह्याच्यामध्ये कुठल्याही मनपाला मिळालेले नाही.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम आपल्या आयुक्तांनी त्यांच्या अधिकारात जे काम केले ते अभिनंदन करण्यासारखे आहे. त्यांना एक विचारायचे आहे ह्या ज्या ५० बसेस चालतात त्या कन्टीन्हयु चालतील. आणि केस्ट्रल इन्फ्रा. जी आहे त्या कंपनीला ठेका देऊ नये अशी माझी विनंती आहे. आताची स्थिती बघितल्यानंतर त्यांच्या गाड्या, वाहक, चालक त्यांचे नेहमी प्रॉब्लेम असतात त्याची तुम्ही काळजी घ्यावी.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, मा.आयुक्त साहेबांनी बसेस आणल्या त्याबद्दल चांगली माहिती दिली. माझा एवढाच प्रश्न होता की सप्टेंबर महिन्यांत निविदा मागवतात. मा.आयुक्त साहेबांना जाणिव होती का ५ मार्चला आचारसंहिता लागणार आहे. २८ मार्चला लागली असती तर काय संभाषण केले असते. २८ पर्यंत विषय आमच्याकडे होता. २८ नंतर १५ दिवस पूर्ण झाले. म्हणजे माहित होते का? तसे काही पिक्चर नव्हते ते नंतर समजायला लागलं. नवव्या महिन्यात निविदा मागवली गेली त्याच्याकडे तीन महिने होल्ड केली. शेवटच्या क्षणी सांगतात मंजुर करा. अभ्यास करायला नको. आता मा.आयुक्त साहेब सांगतात आम्ही ऑपरेटर शोधतो आहे. मॅडम आपल्याला माहित आहे त्यांना ऑपरेटर कसा शोधता येणार ते १०० टक्के ग्रॅन्टवर आलेले आहे. कारण ५० टक्के त्याचे होते. आता आपण काय करणार महापालिका चालवतील की तोच ऑपरेटर चालवतील त्यांनाच परत द्यायचे आहे का? एकही सभागृहातील व्यक्ती सांगणार नाही की त्यांना परत द्या. मा.आयुक्त महोदय सांगतात की ११० बसेस आपल्याकडे येतील. ६० बसेसची काळजी आपण घेतली नाही. नविन काय येतात ते घ्या सरकारचे पैसे ते पब्लिकचे पैसे ते चालले असते तर ५० बसेस कमी घेतल्या असत्या. आता १०२ मधून ४० बसेस चालवतात. ६२ बस बंद झाल्या, काही बसेस जळाल्या, त्यावर काही निर्णय झाला नाही. ठेकेदार उद्या सोडून देईल त्याला जबाबदार कोण? त्याच्याकडे एवढी मोठी डिपॉझीट नाही की नुकसान भरून देईल. त्यावर निर्णय झालेला नाही. आम्हांला आयुक्तांनी केले त्यावर काही आक्षेप नाही. आता आयुक्त महोदय सरकारने सांगितले व्हॉल्वो बसेस ५० घ्या. मग आपण १० का घेतल्या. दुसरं म्हणजे व्हॉल्वो बसेस आपण चालवू शकतो का? एक-एक करोडची एक बस आहे. आमची क्षमता आहे का? चालवायची आपण वर्क ऑर्डर देऊन टाकली. १५-२० लाखाची बसेस चालवू शकतो. रूट वगैरे सगळे मान्य करून बॉडीपुढे येऊन त्याच्यावर चांगला निर्णय झाला पाहिजे होता की, भविष्यात येणाऱ्या बसेस आपण चालवणार की ठेकेदार चालवणार की दुसरा ठेकेदार चालवणार? मा.आयुक्तांनी सांगितले की आपण ते बघू. दुसऱ्याला द्यायचे की त्यालाच द्यायचे हे ही सांगितले की त्याच्या बरोबर चर्चा करू तो चालवत असेल १०२ चे ४० केली त्यांना परत बसेस द्यायच्या आहेत का? दिल्यानंतर आपल्याला मान्य होईल का? ती पॉलिसी आम्ही ठरवणार, विव्हिल डिसाईड, बॉडी व्हिल डिसाईड की पुढच्या बसेसचा नक्की काय निर्णय करायचा. मा.आयुक्त महोदय आपण टेंडर मागवणार ते मान्य होणार नाही. तो ठेकेदार कोर्टात पण जाईल. जस महालक्ष्मी तसेच झाले ह्या ठेकेदाराला आपण अपॉईन्ट केले, महालक्ष्मी बोलतो माझे नुकसान भरा. नाहीतर मी कोर्टात चाललो. आपण शेवटी काय बोललो शहराची गरज आहे. बसेस बंद होता कामा नये. किती मागतो चार करोड, मॅडम आपण त्यांना चार करोड दिले. तुम्ही दुसऱ्याला दिले तर हा ठेकेदार कोर्टात जाणार नाही? ही शूड सीट अॅन्ड सॉल्व्ह द प्रॉब्लेम.

**भगवती शर्मा :-**

चुकीची माहिती देतात. चार करोड कोणाला भरले. डी.एस.आर. रेटप्रमाणे तिकडून जो अहवाल आला त्याप्रमाणे त्यांना डिफेन्स दिला. काहीतरी चुकीची माहिती देतात.

**नरेंद्र मेहता :-**

आपल्या माहितीसाठी सांगतो विषय काढून बघा.

**भगवती शर्मा :-**

साहेब तुम्ही अतिशय चांगले काम केले आहे. तुमचे आम्ही अभिनंदन करतो.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही आमचा ठराव मांडलेला आहे.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही ठराव करा. आम्हांला पण अभिनंदन करू द्या. साहब आपने बहोतही अच्छा काम किया है।

**मर्लिन डिसा :-**

मॅडम मला विचारायचे आहे एवढ्या बसेस आल्यावर आपल्याकडे डेपोसाठी जागा आहे का?

**मा. आयुक्त :-**

मागच्या डिसेंबरमध्ये जेव्हा मा.महासभा झाली होती. त्यावेळेला मा.महासभेने दोन जागा निश्चीत केल्या आहेत. त्या दोन्ही जागाचे विकास करण्याचे काम प्रगतीपथवर आहे. एक जागा घोडबंदरला आहे आणि एक उत्तनला आहे. एक ईस्टला आणि एक वेस्टला.

**भगवती शर्मा :-**

इस शहर के अंदर में कोई भी फंड जैसा पहले भी हमारे जे.एन.एन.यु.आर.एम पानी के लिए वैगरे लॅप्स हो गया था। आपने बहुत अच्छा काम किया फरवरी के एन्ड के अंदर मे २८ फरवरी के पहले जाना चाहिए था वह आपने किया सन्मा. सदस्योंने बोला की, निविदा प्रक्रिया सप्टेंबर, लेकिन निविदा प्रक्रिया के अंदर में प्रसिध्दी नही मिलने के कारण से वापिस डिसेंबर के अंदर वह आपने किया आपने वह स्वस्थ परंपरा अंदर में किया की, उसमें कोई भी कमी नहीं रह न जाए। उसके बाद में साहब आपने जब केंद्रशासन से मंजुरी मिलने के बाद उस टेंडर में सर्टीफीकेट लागू करने के हिसाब से १४ फरवरी आपने स्थायी समिती के अंदर में प्रशासनने गोषवारा सादर किया था। मेरे खयाल से १४ फरवरी के बाद में मा. स्थायी समिती दो या तीन बार हुई थी। अगर यह प्रस्ताव उसके अंदर लेके उनके जो भी फेरबदल करने जो भी उनको उसके अंदर चाहिए थे वह कर सकते थे। लेकीन आपने नहीं किया स्थायी समिती के अंदर में उसके बाद के अंदर में आपने अपने अधिकार का युज करते हुए और इस शहर अच्छी सुविधा मिले और फंड भी लॅप्स नहीं हुए। आपने खाली निविदा प्रक्रिया को मंजुरी दी अपने अधिकार को युज करते हुए और उसके अंदर में बहुतसी पारदर्शकता रखी सभी सदस्यों का एकमत था की जैसे की बसेस आ जाएगी। एजन्सी नियुक्त है की नहीं कौन चलाएगा, कौन नहीं चलाएगा। हमने इसके पहले जैसे की अभी यह जो ठेकेदार चला रहा है, इसके अंदर में भी काफी खामिया रह गयी थी। उस खामिया दुर करते यह जो निर्णय लिया है की विभिन्न माध्यम से कही भी एक एजन्सी को देते है तो आप मोनोपोली कर लेते है, स्ट्राईक करने लगते है। उसके अंदर में हम शहरवासीयोंको बहुत तकलीफ होती है। आपने बहुत अच्छा काम कीया। हमारा सबका एकही सोच था साहब इस शहर के अंदर में जैसे अन्य महानगरपालिका वाळू बस भी चल रहीं है, ट्रक भी और ऐसी दुसरी बसेस भी चल रही है। बडे बसेस ही चल रही है। इस शहर के लोगो से टॅक्स के माध्यम से पैसा देते हैख इस शहर के अंदर में अच्छी से अच्छी सेवा परिवहन के माध्यम से दे सके, आपने जो प्रयत्न किया हम सभी आपका अभिनंदन करते है। लेकीन उसके अंदर इतना ध्यान रखिएगा की जैसे इस ठेकेदार जो गलतियाँ की है वह गलतिया की पुनरावर्ती न हो उसका पूर्ण रुप से ध्यान रखते हुए उस बस सेवा को इस महिने अंत में या अगले महिने के शुरु के अंदर में जल्द से जल्द चालु करे। धन्यवाद।

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करत आहे.

**प्रकरण क्र. ०९ :-**

केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत परिवहन सेवेकरीता बस खरेदी करणे व बस चालविण्याचे धोरण निश्चित करणेबाबत.

**ठराव क्र. १० :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या व शहरामधील नविन होणारी बांधकामे व घर संकुलन विचारात घेता शहरामध्ये परिवहन व्यवस्थेत सुधारणा आणण्याकरीता व नागरीकांना कार्यक्षम परिवहन सेवा देणेकरीता महानगरपालिकेने सन २००९ मध्ये केंद्र शासनाच्या जव्हारलाल नेहरू नागरी पुर्नरोत्थान अभियान योजनेअंतर्गत २५० बसेस खरेदी करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ९ दि. २२/०५/२००९ व मा. महासभा ठराव क्र. ४ दि. १८/०४/२००९ अन्वये मंजुरी दिलेली होती.

त्या अनुशंगाने पहिल्या टप्प्यात सन २०१० मध्ये ५० बसेस खरेदी केल्या होत्या. या ५० बसेस पी.पी.पी. तत्वावर चालविण्यात याव्यात असे धोरण मा. महासभा दि. ११/०२/२०१२ अन्वये ठराव क्र. ५१ प्रमाणे घेण्यांत आले व हा ठेका मे. कॅस्टोल इन्फ्रॉ.प्रा.लि. यांना प्रति कि.मी. रू. १ प्रमाणे रॅायल्टीच्या स्वरूपात देण्यात आलेला आहे. सदर ठेकेदार रॉयल्टीची ठरल्याप्रमाणे रक्कम मनपाकडे जमा करत नाही. व करारनाम्यातील अटीशर्तींचा भंग करीत आहे. या ठेकेदारावर मनपा कडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. त्याशिवाय सध्या देत असलेली बस सेवा निकृष्ठ दर्जाची असून सर्व बसेसची अवस्था दयनिय आहे. सदर परिवहन योजनेमध्ये ५० टक्के महानगरपालिकेचा व ५० टक्के ठेकेदाराचा सहभाग असावा असे ठरलेले होते. परंतु मे. कॅस्टोल इन्फ्रॉ.प्रा.लि. या ठेकेदारास ठेका देताना ५० टक्क्याचा सहभाग ठेकेदाराकडून घेतलेला नाही. यामुळे सद्या चालवित असलेला परिवहन ठेका नुकसानीस जात आहे.

या ठेकेदाराच्या विरोधात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आलेली होती. त्यामध्ये १ ते १० मुद्दे उपस्थित करून मुद्दे निहाय कार्यवाही करण्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने परिवहन विभागास दिलेले आहे. परंतु यावर परिवहन विभागाने काय कार्यवाही केली याचा अहवाल देण्यात आलेला नाही.

केंद्र शासनाच्या दि. १६/०८/२०१३ च्या निर्णयानुसार बसेस व आवश्यक साधनसामुग्री खरेदी करण्याचे धोरण निश्चित झालेले आहे. या धोरणाप्रमाणे महानगरपालिकेने मा. स्थायी समिती यांचे ठराव क्र. २९ दि. ७/०२/२०१३ नुसार बस व साधनसामुग्रीची मागणी बाबतचा अहवाल तयार करण्याचे काम मे. अर्बन मास ट्रांन्झीट कंपनी यांना दिले.

केंद्र शासनाने दि.२४/०९/२०१३ च्या सी.एस.एम.सी. बैठकीमध्ये महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रकल्प अहवालाप्रमाणे बस व साधनसामुग्री खरेदी करण्यास निधी मंजुर केला. त्या अनुशंगाने १०० बसेस व

साधनसामुग्री खरेदी करण्याच्या निविदा उपक्रमाने घाईघाईने मागविण्यात आलेल्या आहेत. या निवीदा मागवितांना परिवहन उपक्रमाने लोकप्रतिनीधीं बरोबर कोणत्याही प्रकारची चर्चा केलेली नाही.

**(दर प्रती बस)**

| अ.क्र. | बसेसचा प्रकार | बसेसची संख्या | वोल्वा मोटर्स | टाटा मोटर्स | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|
| १ | 400 mm diesel premium segment AC | १० | १,००,७४,०००/- | -- | १०,०७,४०,०००/- |
| २ | 900 mm diesel standard non AC | ७० | -- | ४०,१०,४४३/- | २८,०७,३१,०१०/- |
| ३ | 650 mm diesel mini non AC | १० | -- | -- | -- |
| ४ | 900 mm diesel midi non AC | १० | -- | २६,११,४८८/- | २,६१,१४,८८०/- |

बसेस खरेदीसाठी करण्यासाठी दि. २७/१२/२०१३ व दि.१३/१२/२०१३ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली होती. यानंतर तांत्रिक दृष्टया पात्र असलेल्या ठेकेदारांना प्रशासनाने दि. ५/०३/२०१४ रोजी कार्यादेश दिलेले आहेत. प्रशासनाने दराबाबत विचारविनिमय निर्णय घेण्यासाठी दि. १४/०२/२०१४ रोजी सदर विषयाचा गोषवारा मा. स्थायी समितीस सादर करण्यात आला होता. गोषवारा सादर केल्यानंतर दि. १७/०२/२०१४ रोजी मा. स्थायी समितीची बैठक घेण्यात आली होती.

वरील घटनाक्रम लक्षात घेता दि. २४/०९/२०१३ ते दि. ५/०२/२०१४ (गोषवारा मध्ये नमूद केल्याप्रमाणे) पर्यंत प्रशासनाकडे वेळ असून सुध्दा लोकप्रतिनिधींना या योजनेची माहीती व बस खरेदीचा तपशील मा. स्थायी समितीच्या सदस्यांना व नगरसेवकांना यांना दिलेली नाही. व परस्पर आपल्या अधिकाऱ्यात सदर निविदा अंतिम करून मंजुर केलेल्या आहेत.

बस खरेदी करत असताना बस खरेदीचे धोरण कसे असावे, बस चालविण्याचे धोरण निश्चित करणे, कोणामार्फत, कोणत्या मार्गांवर बसेस धावणार आहेत, बसेसची देखभाल दुरूस्ती, इंधन वंगण, बस डेपो करीता जागा व अन्य Liability, महानगरपालिकेचे आर्थिक हित काय असावे, महानगरपालिकेने उभारलेली रक्कम कंट्राटदार गुंतवणूकीच्या माध्यमातून महानगरपालिकेस कसा देईल, सदर प्रकल्प पी.पी.पी. तत्वावर द्यावयाचा असल्यास रॉयल्टीचा दर व पध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. या सर्व धोरणांची माहीती प्रशासनाने सर्व नगरसेवकांना देणे अपेक्षित आहे. परंतु अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही परिवहन विभागाकडून झालेली नाही.

या उपक्रमामध्ये आपण सादर केलेल्या बस खरेदी निविदेमध्ये १० बसेस वॉल्वो कंपनीच्या असणार आहेत. या १० बसेस कोणत्या मार्गांवर चालणार आहेत. या बसेसची देखभाल दुरूस्ती या बसेसवर काम करणारे चालक व वाहक यांच्या कामाच्या मर्यादा कशा असाव्यात, या महागड्या बसेस परिवहन विभाग कुठे उभ्या करणार आहेत, प्रती कि.मी. च्या मागे भाडे किती असावेत इ. चा सविस्तर अहवाल व धोरण परिवहन विभागाने तयार करणे आवश्यक होते. तसेच महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांची लांबी व रूंदी व सध्याची परिस्थिती पाहता वॉल्वो बसेस चालविणे प्रशासनाच्या मर्यादापलिकडे आहे.

सदर विषय धोरणात्मक असल्याने बसेस खरेदी करणे व धोरण निश्चित करणेकामी मा. महासभेमध्ये चर्चा होऊन निर्णय घेणे अपेक्षित होते. तरी मा. आयुक्त सो., यांनी दिलेले कार्यादेश रद्द करण्यात यावे. व संबंधीत ठेकेदारास कोणत्याही प्रकारचे देयक देवू नये.

सदर विषय हा धोरणात्मक असल्याने मा. महासभेपुढे फेरसादर करून त्यावर सखोल चर्चा व्हावी अशी मागणी करण्यात येत आहे. तसेच याकामी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, दिलेले कार्यादेश रद्द करण्यात यावे व बस खरेदीचे धोरण निश्चित करणे व खरेदी करणे.

तसेच वस्तुस्थितीचे गांभीर्य वरील हकीगतीचा विचार करता परिवहन उपक्रमाकरीता जीईएफ-५ योजनेअंतर्गत व बस खरेदी करणेकरीता मागविण्यात आलेली निविदा देणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर** **अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०, सन्मा. सदस्य डॉ. राजेंद्र जैन यांचा दिनांक ०६/०६/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. आरोग्य विभागामार्फत सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील साफसफाई, कर्मचारी, मशीन व इतर साहित बाबत माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, मा.आयुक्त साहेब. यह प्रस्ताव लाने की जरूरत क्यो पडी। पहले बताना चाहूँगा सभी नगरसेवको को जानकारी शेअर करना चाहूँगा। हमारा वॉर्ड जो कामगार है। उसको अपने नगरसेवक का पाच साल के पिरेयड में ७ लाख पगार जाता है। अगर एक आदमी भी मिस करते है। इसमे जो नए नगरसेवक आये है। ५० प्रतिशत लेडीज भी है। नई आयी है उनको भी मैने पुछा मुझे जानकारी नही आपको जानकारी है क्या? कितने लेबर किस समय कहाँ पर काम कर रहे है। उन्हे जानकारी नही रहती। वॉर्ड में काम हो रहा है लेकीन कहाँ हो रहा है। अगर नगरसेवक चेक करना चाहे की यह आदमी सडक पे है या गटर पे है। कुल संख्या कितनी है। अभी के सिस्टम में नगरसेवक चेक नही कर सकते। इसिलिए यह प्रस्ताव लाया गया है। मैने शिंदे साहब और कांबळे साहेब से माहिती अधिकार में अपिल तक चला गया। उन्होने जानकारी नही दी। अल्टीमेटली पानपट्टे साहबने आश्वासन दिया कि ऐसा किया जाएगा। ठेका पध्दती संपूर्ण मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात साफसफाई (रस्ता सफाई, गटार सफाई, तसेच उंदीर व मच्छर मारण्याकरिता औषध फवारणी) करण्याचे काम सुरू आहे. परंतु कोणत्याच प्रभागात हे स्पष्ट नाही की, १. प्रत्येक प्रभागात रस्ता सफाई करीता किती कामगार कोणत्या रस्त्यावर व किती वाजेपर्यंत काम करतात याबाबत सदर प्रभागातील रस्त्याचा नकाशा बनवून सविस्तर अहवाल देण्यात यावा. २. प्रत्येक विभागातील असलेली सर्व गटारे ही प्रत्येक महिन्यात पूर्ण साफसफाई करण्याचे नियोजन करावे. याप्रमाणे महिन्याच्या प्रत्येक दिवशी किती सफाई कामगार कुठून ते कुठपर्यंत, किती वाजेपर्यंत गटारावर साफसफाई करत आहेत याबाबत महिन्याच्या आत सर्व गटारे साफ होतील असे नियोजन करून त्याची माहिती त्या त्या प्रभागातील नगरसेवकांना देण्यात यावी. ३. प्रभागातील सर्व इमारतींमध्ये एका महिन्यात कमीत कमी एक वेळा उंदीर नियंत्रण योजना राबविण्यात यावी. प्रत्येक दिवशी या उपक्रमात येणाऱ्या इमारतींची व साहित्यांची माहीती सदर प्रभागातील नगरसेवकांना देण्यात यावी. ४. प्रभागातील सर्व इमारतींमध्ये एका महीन्यात कमीत कमी एक वेळा मच्छरांकरीता औषध फवारणी करण्यात यावी. प्रत्येक दिवशी या उपक्रमात येणाऱ्या इमारतींची व साहित्यांची माहीती सदर प्रभागातील नगरसेवकांना देण्यात यावी. सदर साफसफाई उपक्रमात ठेकेदारांवर कोणकोणत्या प्रकारची दंडात्मक कारवाई केली जाईल याबाबतची सर्व प्रभागातील नगरसेवकांना माहीती नियमीत देण्यात यावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**नयना वसाणी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १० :-**

आरोग्य विभागामार्फत सर्व नगरसेवकांना त्यांच्या प्रभागातील साफसफाई, कर्मचारी, मशीन व इतर साहित्यबाबत माहीती उपलब्ध करून देणेबाबत.

**ठराव क्र. ११ :-**

ठेका पध्दती संपूर्ण मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात साफसफाई (रस्ता सफाई, गटार सफाई, तसेच उंदीर व मच्छर मारण्याकरिता औषध फवारणी) करण्याचे काम सुरू आहे. परंतु कोणत्याच प्रभागात हे स्पष्ट नाही की, १. प्रत्येक प्रभागात रस्ता सफाई करीता किती कामगार कोणत्या रस्त्यावर व किती वाजेपर्यंत काम करतात याबाबत सदर प्रभागातील रस्त्याचा नकाशा बनवून सविस्तर अहवाल देण्यात यावा. २. प्रत्येक विभागातील असलेली सर्व गटारे ही प्रत्येक महिन्यात पूर्ण साफसफाई करण्याचे नियोजन करावे. याप्रमाणे महिन्याच्या प्रत्येक दिवशी किती सफाई कामगार कुठून ते कुठपर्यंत, किती वाजेपर्यंत गटारावर साफसफाई करत आहेत याबाबत महिन्याच्या आत सर्व गटारे साफ होतील असे नियोजन करून त्याची माहिती त्या त्या प्रभागातील नगरसेवकांना देण्यात यावी. ३. प्रभागातील सर्व इमारतींमध्ये एका महिन्यात कमीत कमी एक वेळा उंदीर नियंत्रण योजना राबविण्यात यावी. प्रत्येक दिवशी या उपक्रमात येणाऱ्या इमारतींची व साहित्यांची माहीती सदर प्रभागातील नगरसेवकांना देण्यात यावी. ४. प्रभागातील सर्व इमारतींमध्ये एका महीन्यात कमीत कमी एक वेळा मच्छरांकरीता औषध फवारणी करण्यात यावी. प्रत्येक दिवशी या उपक्रमात येणाऱ्या इमारतींची व साहित्यांची माहीती सदर प्रभागातील नगरसेवकांना देण्यात यावी. सदर साफसफाई उपक्रमात ठेकेदारांवर कोणकोणत्या प्रकारची दंडात्मक कारवाई केली जाईल याबाबतची सर्व प्रभागातील नगरसेवकांना माहीती नियमीत देण्यात यावी असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- डॉ. राजेंद्र जैन** **अनुमोदक :- डॉ. नयना वसाणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडून "क" खाली प्रस्ताव आलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

"क" चा प्रस्ताव असल्याने कोणाकडे गोषवारा नाही?

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम यह "ज" जो सन्मा. राजेंद्र जैन का प्रस्ताव है। अभी बारीश का टाईम है सब जगह पाणी भरा है। छः गाडी रखी है हर प्रभाग में छाटनी के लिए। लेकिन प्रभाग ५ मे मैं २० दिन से फोन कर रहा हूँ वहाँ पे गाडी खराब पडी है। अभी बारीश के मौसम में डेंग्यु, मच्छर मलेरिया यह सब बिमारीयां होती है। बारीश में फवारणी नही होगी। आप कितना भी लिस्ट दोंगे यहाँ पे काम कर कर रहा हूँ। वहा काम कर रहा हूँ उसका का कुछ मिनींग नही है। हर प्रभाग में २-२ आदमी काम करने के लिए रखे है जो फवारणी करते है। मेरे प्रभाग में दो महिने से एक भी आदमी नही की वो फवारणी कर रहा है। मैंने राठोड को बोला मेरे प्रभाग में कोई फवारणी नही कर रहा तो कल उसने मेरे प्रभाग में आदमी भेजा और बोला की किसी को बोलो मत यह आरोग्य की कन्डीशन है। पानपट्टे साहब इसका जवाब देंगे की ऐसा क्यों हो रहा है।

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौर मॅडम आमच्या प्रभाग ६ ला तसेच हाल आहेत. आम्ही फोन केल्यावर ऐकायला मिळते की गाडी खराब है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, गाडी खराब झालेली ती दुरूस्त करून घेतली आता फवारणी सुरू आहे.

**दिनेश जैन :-**

२० दिवस झाले फक्त वायर निघाली आहे ते रिपेयर होत नाही. तिकडे माझ्या प्रभागात डेंग्युचे १०-१५ पेशन्ट आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मला फोन करा. मी लगेच करतो.

**दिनेश जैन :-**

राठोडची काय जबाबदारी नाही का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मला फोन करा. मी करून घेतो.

**दिनेश जैन :-**

पावसाळ्यात विषय लक्षात ठेवा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पावसाळ्यात औषध खरेदी केलेली आहेत. टेम्पो दुरूस्त केलेला आहे. लगेच फवारणी सुरू करून देतो.

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौर मॅडम जसे कर्मचाऱ्यांबद्दल महोदयांनी सांगितले तर माझे पण असे म्हणणे आहे. ह्यांच्या व्यतिरीक्त आपले जे अधिकारी आहेत त्यांना आम्ही फोन केला तर ते आम्हांला बोलतात मी कोर्टात आहे. ठाण्याला आहे. तर माझी अशी सुचना आहे की, आम्हांला हे कळू द्या की कोणत्या अधिकाऱ्यावर किती केस लागल्या आहेत आणि त्यांना महिन्यातून किती दिवस कोर्टात जावे लागते. आम्हांला ते कधी वेळ देणार. आमचा फोन उचलायला त्यांना त्रास होतो. वेगवेगळ्या नंबरनी फोन करायला लागतो. त्यामुळे आम्हांला ती सोय करून द्या.

**मा. महापौर :-**

ठीक आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११, आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अतिरिक्त २० द.ल.ली. पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत उपलब्ध करून घेण्यासाठी मान्यता मिळालेली आहे. सदर पाणी उपलब्ध करून पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा होण्यासाठी आवश्यक त्या जलवाहिनी अंथरणे गरजेचे आहे. तसेच पाण्याचा दाब योग्य तो ठेवण्याकरीता काही ठिकाणी जलकुंभ बांधणे आवश्यक आहे. तसेच काही ठिकाणी मुख्य जलवाहिनी अंथरणे सुध्दा आवश्यक आहे. पाणी पुरवठा उपलब्ध झाल्यानंतर पाणी पुरवठा वितरण योग्य होणेकरीता आवश्यक ती खालील कामे हाती घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर २ येथे उंच जलकुंभ बांधणे. | १,१९,४७,३००/- |
| २ | भाईंदर (प.) येथील सुभाष मैदान जलकुंभ ते राई बस स्टॉप पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरवणे व अंथरणे. | १,२८,६४,४००/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) शांती नगर येथे सेक्टर ११ जलकुंभ ते सेक्टर ७ व २ जलकुंभाकरीता ३५० मि.मी. व्यासाची एम.एस.जलवाहिनी पुरवणे व अंथरणे. | ९९,०६,४००/- |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २२६ इंद्रलोक फेज क्र. ०४ मौजे नवघर येथे उंच जलकुंभ बांधणे. | २,३२,७२,९००/- |
| ५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) हटकेश ते कनाकिया जलकुंभापर्यंत ८६४ मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | ५,६२,६३,५००/- |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर येथील जी.सी.सी. क्लब, आकृती व पूनम नगर व गौरव रेसीडेन्सी येथे बीडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | १,०६,२५,०००/- |
| ७ | मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरूस्तीकरीता वार्षिक मुदतीने पाईप पुरवठा करणे. | १,००,००,०००/- |

तरी वरील कामे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण २ (१) (के) अन्वये सदर कामे अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार करून घेण्यांस, ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अतिरिक्त २० द.ल.ली. पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत उपलब्ध करून घेण्यासाठी मान्यता मिळालेली आहे. सदर पाणी उपलब्ध करून पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा होण्यासाठी आवश्यक त्या जलवाहिनी अंथरणे गरजेचे आहे. तसेच पाण्याचा दाब योग्य तो ठेवण्याकरीता काही ठिकाणी जलकुंभ बांधणे आवश्यक आहे. तसेच काही ठिकाणी मुख्य जलवाहिनी अंथरणे सुध्दा आवश्यक आहे. पाणी पुरवठा उपलब्ध झाल्यानंतर पाणी पुरवठा वितरण योग्य होणेकरीता आवश्यक ती खालील कामे हाती घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर २ येथे उंच जलकुंभ बांधणे. | १,१९,४७,३००/- |
| २ | भाईंदर (प.) येथील सुभाष मैदान जलकुंभ ते राई बस स्टॉप पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरवणे व अंथरणे. | १,२८,६४,४००/- |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) शांती नगर येथे सेक्टर ११ जलकुंभ ते सेक्टर ७ व २ जलकुंभाकरीता ३५० मि.मी. व्यासाची एम.एस.जलवाहिनी पुरवणे व अंथरणे. | ९९,०६,४००/- |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २२६ इंद्रलोक फेज क्र. ०४ मौजे नवघर येथे उंच जलकुंभ बांधणे. | २,३२,७२,९००/- |
| ५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) हटकेश ते कनकिया जलकुंभापर्यंत ८६४ मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | ५,६२,६३,५००/- |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर येथील जी.सी.सी. क्लब, आकृती व पूनम नगर व गौरव रेसीडेन्सी येथे बीडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | १,०६,२५,०००/- |
| ७ | मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरूस्तीकरीता वार्षिक मुदतीने पाईप पुरवठा करणे. | १,००,००,०००/- |

तरी वरील कामे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण २ (१) (के) अन्वये सदर कामे अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार करून घेण्यांस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

एकच आहे काही बदल केलेला नाही.

**मा. महापौर :-**

सेम ठराव आहे.

**जुबेर इनामदार :-**

विरोधी पक्षनेते साहेब ठराव तोच आहे. त्याच्यामध्ये सुचना केली जात आहे. सुचनेचा त्याच्यात समावेश करून घ्यावा हि विनंती.

**राजेश वेतोस्कर :-**

मिरारोड नरेंद्र पार्क ज्यूपिटर इमारत ते कॉर्पोरेशन बँकपर्यंत चार फूट रुंदीचे गटार व त्यावर स्लॅब बांधणे व भाईंदर (प.) उत्तन भाईंदर मुख्य रस्त्यापासून कोपऱ्याकडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम करणे व भाईंदर (प.) स्पॅन हाईट्स ते मिरारोड हॉस्पीटल व पूढे ३० मिटर पर्यंतचा रस्ता तयार करणे ह्या कामाचा समावेश करण्यात यावा अशी मी सुचना करत आहे.

**अशरफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम "क" खाली प्रस्ताव पारित करतो त्याचा एक पेपर सर्व सभासदांना दिला असता तर काही हरकत नव्हती. आम्हांला कळलं असत. हे काय वाचतात ते ऐकतो ते काय वाचतो ते ऐकतो. सगळं संभ्रम आहे की आपण कशाला मंजुरी देतो. संपूर्ण सभागृहाची मंजुरी आहे आमच्याकडे त्याचे काही नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम प्रशासनाने हा ठराव आणलेला आहे. मा.आयुक्त साहेब ऐकूण घ्या. आपला देश शेतीप्रधान आहे. पावसाळा येणार शेतकरी ३ महिने आधी त्याची तयारी करतो. घराची कौल बदलतो, बि-बियाणांची व्यवस्था करतो. अशी आज काय घटना घडलेली आहे. कावळा सुध्दा त्याचे घरटे बांधायला लागतो आणि मग शेतकरी सांगतो कावळा घरटे बांधतो. आपल्याला आपली काम पूर्ण करायची आहे. २-४ दिवसामध्ये असे काय घडले की प्रशासनाने हा क खाली प्रस्ताव येतोय. उद्या संध्याकाळी पाणी येणार आहे. परवा येणार आहे. काय येणार आहे. आज लोकांना ६६ तासांनी शहरांमध्ये पाणी चालू आहे. पाण्याची टाकी बांधायला घेतली आहे. इथे पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही आहे. असे काय घडले आहे. कोणाच्या दबावाखाली मी म्हणत नाही. त्याची आवश्यकता असेल तर त्याचे स्वागत करू. आज पर्यंतचा इतिहास आहे, मिरा भाईंदरच्या कोणत्याही नगरपरिषदेपासून कोणत्याही पक्षाने कोणत्याही नगरसेवकाने पाण्यासाठी कधीही विरोध केलेला नाही. आजही आम्ही विरोध करणार नाही. प्रशासन "क" खाली एवढा कोट्यावधी रूपयांचा विषय आणतो की आताच जोडणी केल्यावर पाणी चालु होणार आहे का? आता तुम्ही फाईलिंग केल्यावर टाकी बनणार आहे का? काय कामाची पध्दत. एक पत्रक आमच्या हातात मिळाल असते. आम्ही १०० लोक ह्याला संमत्ती देतो. सभागृह नेते सन्मानीत आहे. विरोधी पक्षनेते सन्मानीत आहेत. पण ह्याचा अर्थ १०० नगरसेवक जमेत आहेत असाची ह्याचा अर्थ निघता कामा नये. आम्ही सुज्ञ नगरसेवक आहोत. असे आम्हांला स्वतःला वाटते. त्यामुळे जे कामकाज चालणार आहे ते पारदर्शक चालले पाहिजे. तुम्ही मघाशी जसे निवेदन केले आमचे असे मत आहे की तुम्ही प्रामाणिक निवेदन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे त्याचे मनापासून स्वागत करतो. ह्या ही कामाचे तुम्ही प्रामाणिक निवेदन करणे गरजेचे होते की शहरात पाणी टंचाईवर मात करण्यासाठी ह्या योजना करणे गरजेचे आहे. इथे पाईपलाईन टाकणे गरजेचे आहे. अशा पध्दतीने कामकाज चालणार असेल. उद्या तर आचारसंहिता लागणार नाही ना. आपल्या सभा लागणारच आहेत. मा. महापौरांना अधिकार आहे. मा. महापौरांशी बोलणे करायला पाहिजे. सभागृह नेते आणि विरोधी पक्षनेत्याशी बोलणे करायला पाहिजे. ते विषय सभासदांना विश्वासात घेऊन केले तर त्याचे स्वागत होईल. अन्यथा आपआपल्या अकलेनुसार जो तो जे जे अडथळे आणता येतील ते अडथळे आणण्याचा प्रयत्न करतील. मिडीया आपल्या मागे बसलेली आहे. आपण जे काही करतो ते कोणी बघत नाही असे नाही. आपण सगळयांनी मिळून ह्याची वाटणी करू या. वाटणी करायला आपले कोणी हात नाही बांधले. ते काचेतून बघतात ना आपली काय वाटणी चालली आहे. ही कामाचीच वाटणी असेल आमचा पुन्हा आग्रह राहील. मा. महापौर म्हणून तुम्ही विनंती राहील की जे काम असेल ते ट्रान्सफरन्ट होऊ द्या. ८ दिवसात १० दिवसात दुसरी सभा लावा. त्याला कुठे आडकाठी आहे. नियमानुसार अजेंडा द्या. मोजमाप द्या. दुसरे विचारतात खुलासा होत नाही. माझे बाय हार्ट ज्याला म्हणतात ते निवेदन केलेले आहे. इज्जत ठेवायची तर ठेवा नसेल तर तुमच्या तुम्ही स्वाधीन आहात.

**प्रभात पाटील :-**

काकांच्या बरोबर मी सुध्दा सहमत आहे. सभागृह सहमत असेल कारण आपण काही कागद न देता करोडोचे विषय वेळेवर आणता. ह्यांच्या ठरावामध्ये इंजिनिअरला पण मुदतवाढ दिली गेली हे काय. मनात आले की सगळं होते का? त्याच्या ठरावामध्ये विषय होता. विषय मांडला ना.

**नरेंद्र मेहता :-**

प्रभात ताई आपण इशारा केला म्हणून "क" चा विषय हे तर ठिक आहे. योगायोगाने सभा तहकूब झाली नाही. तर एका निमिटात मांडता येतो आणि एका मिनीटात कॉपी सुध्दा देता येत नाही. तहकूब झाली म्हणून आपल्याला वेळ होता. म्हणून नाहीतर "क" चा विषय कधील दिला जात नाही. मी जी सुचना मांडली ती नियमाला धरून सुचना मांडली आहे. परत ह्या गोष्टी होऊ नये. आम्ही सदस्य म्हणून मांडली मा. आयुक्त महोदयाचा अधिकार आहे. नियमात असेल ते करतील. त्यांना वाटले नियमाच्या बाहेर आहे तर ते फेटाळतील.

विखंडीत करतील तो त्यांचा निर्णय आहे. मला असे वाटले कायद्यात आहे. आमची भूमिका होती आम्ही मांडली.

**प्रभात पाटील :-**

मी म्हणते सचिव साहेब "क" चे विषय येत नाही का? नगरसेवकांना "क" च्या विषयाच्या प्रती देत नाही का?

**नगरसचिव :-**

"क" चा प्रस्ताव वेळेवर होता.

**प्रभात पाटील :-**

वेळेवर येतो परंतु त्याच्या प्रती देत नाही.

**नगरसचिव :-**

"ज" सारखा आगाऊ येत नाही.

**प्रभात पाटील :-**

"क" च्या प्रस्तावाला काही नियम असतील ना. किती करोड पर्यंत तुम्ही आर्थिक प्रशासकिय मंजुरी देऊ शकता. आर्थिक प्रशासकीय मंजुरीचा तो विषयच नसतो. तुम्ही त्याच्या विषयाला मंजुरी घेऊ शकता.

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडून विषय द्यायची तरतूद आहे. मा. आयुक्तांना वाटले की हा प्रस्ताव पुढे तर तसा प्रस्ताव मा. आयुक्त देऊ शकतात. त्या प्रमाणे तो प्रस्ताव आलेला आहे.

**मा. महापौर :-**

पूर्वी पण असे प्रस्ताव आलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, प्रशासनाला अधिकार असेल तर आम्ही मान्य करू. पण इमरजन्सी काय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सुचना मांडली आहे ती आम्ही स्विकारत नाही.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. मी सुचना फेटाळत आहे. पाण्याचा जो विषय आहे.

**प्रकरण क्र. ११ (के प्रस्ताव) :-**

आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२ :-**

उपरोक्त विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात अतिरिक्त २० द.ल.ली. पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत उपलब्ध करून घेण्यासाठी मान्यता मिळालेली आहे. सदर पाणी उपलब्ध करून पाणी पुरवठ्यामध्ये सुधारणा होण्यासाठी आवश्यक त्या जलवाहिनी अंथरणे गरजेचे आहे. तसेच पाण्याचा दाब योग्य तो ठेवण्याकरीता काही ठिकाणी जलकुंभ बांधणे आवश्यक आहे. तसेच काही ठिकाणी मुख्य जलवाहिनी अंथरणे सुध्दा आवश्यक आहे. पाणी पुरवठा उपलब्ध झाल्यानंतर पाणी पुरवठा वितरण योग्य होणेकरीता आवश्यक ती खालील कामे हाती घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर २ येथे उंच जलकुंभ बांधणे. | १,१९,४७,३००/- |
| २ | भाईंदर (प.) येथील सुभाष मैदान जलकुंभ ते राई बस स्टॉप पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरवणे व अंथरणे. | १,२८,६४,४००/- |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) शांती नगर येथे सेक्टर ११ जलकुंभ ते सेक्टर ७ व २ जलकुंभाकरीता ३५० मि.मी. व्यासाची एम.एस.जलवाहिनी पुरवणे व अंथरणे. | ९९,०६,४००/- |
| ४ | मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २२६ इंद्रलोक फेज क्र. ०४ मौजे नवघर येथे उंच जलकुंभ बांधणे. | २,३२,७२,९००/- |
| ५ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) हटकेश ते कनाकिया जलकुंभापर्यंत ८६४ मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | ५,६२,६३,५००/- |
| ६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घोडबंदर येथील जी.सी.सी. क्लब, आकृती व पूनम नगर व गौरव रेसीडेन्सी येथे बीडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | १,०६,२५,०००/- |
| ७ | मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरूस्तीकरीता वार्षिक मुदतीने पाईप पुरवठा करणे. | १,००,००,०००/- |

तरी वरील कामे आवश्यक असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची "ड" मधील प्रकरण २ (१) (के) अन्वये सदर कामे अर्थसंकल्पीय तरतूदीनुसार करून घेण्यांस, ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रोहिदास पाटील :-**

शोक प्रस्ताव एकनाथ जगन्नाथ पाटील, नवघर ह्यांचे दुःखद निधन झालेले आहे. ही सभा शोक प्रस्ताव मांडत आहे.

**दुःखवटा ठराव १३ :-**

श्री. एकनाथ जगन्नाथ पाटील, नवघर ह्यांचे दुःखद निधन झालेले आहे. म्हणून शोकप्रस्ताव मांडत आहे. त्या सर्वांच्या कुटूबीयांच्या दुःखात ही सभा सहभागी असून त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदन :- श्री. प्रविण पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शिक्षण अधिकारी :-**

मा. महापौर ह्यांच्या परवानगीने, आदरणीय आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य ह्यांना मी माझा परिचय करून देतो. माझे नांव सुरेश मोतीराम देशमुख. मी २५ वर्षापासून प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभागामध्ये काम केलेले आहे. आणि आपल्या मनपामध्ये चांगल्या पध्दतीने काम करण्याचा प्रयत्न करेन. ह्याच्या अगोदर शिक्षण अधिकारी माध्यमिक ह्या कार्यालयात विषय तज्ञ म्हणून काम करीत होतो. त्यानंतर मा. शिक्षण उच-संचालक कार्यालयात काम केलेले आहे. नगरपालिकेत सुध्दा काम केलेले आहे. आणि प्रौढ शिक्षणात काम केलेले आहे. डी.एड. कॉलेजमध्ये लेक्चरर म्हणून काम केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

शिक्षण अधिकारी साहेब मध्येच अशी चर्चा होती की आपले ७ वी चे विद्यार्थी ८ वी चे विद्यार्थी कुठे जातील. आपण ७ वी आणि ८ वी केले तर ८ वी नंतर हा प्रश्न आहे की ९ वी वे विद्यार्थी कुठे जातील. मॅडम, आपल्याकडे जे विद्यार्थी आहेत ते ९० टक्के बिलो पावर्टी लाईन वाले आहेत. आर.टी.आई. ॲक्टप्रमाणे २५ टक्के आपण त्यांच्याकडून ॲडमीशन घेऊ शकतो आणि त्याचे पैसे सरकार देणार आहे. ज्या शाळेत आपले विद्यार्थी शिकतात. त्यांच्याकडून इन्कम सर्टिफिकेट घेतले तर आपल्याला कुठल्याही शाळेत त्यांना ॲडमिशन मिळवून देता येईल. आणि मा. आयुक्त महोदयांनी प्रायोरिटीवर पत्र दिले तर आपले जे विद्यार्थी आहेत त्यांच्या शाळेत त्यांना फ्री ऑफ कॉस्ट ॲडमीशन मिळवून देता येईल. आणि हे बंधनकारक आहे. त्या प्रमाणे १०० टक्के नाही तर २५ ते ३० टक्के मुलं ही दुसऱ्या शाळेत समावेश करण्यांत येईल. २५ टक्के आर. टी. आई. ॲक्टप्रमाणे शिक्षण अधिकाऱ्यांनी यादी मागवावी आपले जे विद्यार्थी आहेत. मा. आयुक्त महोदय चर्चा करून हा कोटा पूर्ण करावा.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. सभा संपली असे मी जाहीर करते.

**(सभा संपल्याची वेळ :- २.४५ वाजता)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२५/११/२०१४

**// गोषवारा //**

**प्रकरण क्र. २९:-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.**

निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे

१) श्रीम. अनिता जयवंत पाटील
२) श्री. राजु यशवंत भोईर
३) श्री. मुन्नासिंग
४) श्री. रोहिदास शंकर पाटील
५) श्री. शरद केशव पाटील
६) श्रीम. मिरादेवी रामलाल यादव
७) श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी
८) श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदस्यांपैकी निम्मे आठ सदस्य माहे नोव्हेंबर २०१४ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना भारतीय जनता पार्टी ३, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ३, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस १ व शिवसेना १ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची नेमणूक दोन वर्षाकरीता करण्यात येत आहे.

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१५/११/२०१४

### // गोषवारा //

**प्रकरण क्र. ३०:-** **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरवता येईल अशा रितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतूद आहे.

प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून स्विकृत (नामनिर्देशित) करुन घेता येईल. परंतु, अशा स्विकृत सदस्यांची संख्या तीन पेक्षा अधिक असता कामा नये. हे सदस्य वृक्ष प्राधिकरण समिती ठरविल अशारितीने व मुदतीसाठी स्विकृत करण्यात आले पाहिजे.

तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र दि. ८ जानेवारी १९९६ मध्ये सुधारणा केल्यानुसार या वृक्षप्राधिकरणाचा सभापती मा. आयुक्त हे असतील.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने यापूर्वी ९ पालिका सदस्य मा. आयुक्त पदसिध्द अध्यक्ष अशी वृक्षप्राधिकरण समिती स्थापन केलेली होती. सदर सदस्यांची मुदत संपल्याने निवडून आलेल्या सदस्यांमधून संख्याबळानुसार सदस्य नेमणूक होणे आवश्यक आहे.

संख्याबळाचे प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | २८ / ९२ X ९ = २.७३ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | २७ / ९२ X ९ = २.६४ |
| ३ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १९ / ९२ X ९ = १.८५ |
| ४ | शिवसेना | १५ / ९२ X ९ = १.४६ |
| ५ | बहुजन विकास आघाडी | ३ / ९२ X ९ = ०.२९ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येचा तौलानिक संख्याबळातुन पुर्णांकाच्या आधारे प्रथम पक्ष गटनिहाय खालील नेमणुका करण्यास प्रस्तावित.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भारतीय जनता पार्टी | - | ०३ |
| २. | राष्ट्रवादी काँग्रेस | - | ०३ |
| ३. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | - | ०२ |
| ४. | शिवसेना | - | ०१ |
| ५. | बहुजन विकास आघाडी | - | ०० |

वरीलप्रमाणे वृक्षप्राधिकरण समिती सदस्य निवड होणेस प्रस्तावित.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि १५/११/२०१४

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. ३१ :-   महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० (१) व ३१ (अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठित करण्याची तरतूद आहे. महिला व बालकल्याण समिती ९ सदस्यांची गठीत करणेकरिता खालीलप्रमाणे आजमितीस असलेल्या सदस्य संख्येवरुन तौलानिक संख्या निश्चित करण्यांत येत आहे.

संख्याबळाचे प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | २८<br>---- X ९ = २.७३<br>९२ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस | २७<br>---- X ९ = २.६४<br>९२ |
| ३ | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | १९<br>---- X ९ = १.८५<br>९२ |
| ४ | शिवसेना | १५<br>---- X ९ = १.४६<br>९२ |
| ५ | बहुजन विकास आघाडी | ३<br>---- X ९ = ०.२९<br>९२ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येचा तौलानिक संख्याबळातुन पुर्णांकाच्या आधारे प्रथम पक्ष गटनिहाय खालील नेमणुका करण्यास प्रस्तावित.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भारतीय जनता पार्टी | - | ०३ |
| २. | राष्ट्रवादी काँग्रेस | - | ०३ |
| ३. | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | - | ०२ |
| ४. | शिवसेना | - | ०१ |
| ५. | बहुजन विकास आघाडी | - | ०० |

वरीलप्रमाणे महिला व बालकल्याण समिती सदस्य निवड होणेस प्रस्तावित.

नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १५/११/२०१४
## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ३२ :- महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी सणा निमित्त सानुग्रह अनुदान प्रदान केल्याबद्दल मंजूरी मिळणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी व ठोक मानधनावरील कर्मचारी यांना दरवर्षी दिवाळी सण कालावधीत कर्मचारी संघटनाकडुन, सन्मा.पदाधिकारी यांच्याकडुन सानुग्रह अनुदान देण्याची मागणी करण्यात येते.

दि. ३१/१०/२००२ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे महानगरपालिका कामगार संघटना व सर्व महानगरपालिका आयुक्त यांचे समवेत झालेल्या बैठकीमध्ये, महानगरपालिकेने आर्थिक परिस्थितीचा विचार करुन, सानुग्रह अनुदान किती द्यावे या बाबतचा निर्णय महानगरपालिका स्तरावर घेण्यात यावा. अशा प्रकारचा निर्णय झाला होता. त्यानुसार नगरविकास विभागाचे पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र.२६१/नवि-२४, दि. २७/११/२००२ रोजीच्या पत्रान्वये सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आलेले आहे. आणि त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणे बाबत मा. महासभेमार्फत योग्य निर्णय घेतला जातो.

सन-२०१३ मध्ये महानगरपालिका मा. महासभा ठराव क्र. ४६, दि. १९/१०/२०१३ अन्वये मंजूर करुन अदा करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदान तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशील | कार्यरत अधिकारी/कर्मचारी सन २०१२-१३ | प्रती कर्मचारी सानुग्रह अनुदानाची रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते ०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४५२ | ११,००० | १,५९,७२,००० |
| २ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९३ | ११,००० | २१,२३,००० |
| ३ | संगणक चालक, लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७७ | ८,५०० | ६,५४,५०० |
| ४ | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ५,००० | २५,००० |
| ५ | आर. सी. एच. विभाग (ठोक मानधनावरील कर्मचारी) | २९ | ८,५०० | २,४६,५०० |
| ६ | क्षयरोग व कुष्ठरोग नियंत्रण कर्मचारी | ३३ | ५,००० | १,६५,००० |
| ७ | लिंक वर्कर | १२७ | २,००० | २,५४००० |
| ८ | सुवर्ण जयंती योजना, (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ४,५०० | ९,००० |
| ९ | स्व. इंदिरा गांधी रुग्णालय मधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १७ | ८,५०० | १,४४,५०० |
| १० | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०६ | ४,००० | २४,००० |
| | एकुण | १९४१ | | १,९६,१७,५०० |

अशा प्रकारे गत वर्षी कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रु. १,९६,१७,५००/- एवढे सानुग्रह अनुदान रक्कम मंजूर करण्यात येऊन, त्याप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आले होते.

चालू वर्षासाठी सन्मा. पदाधिकारी व कामगार संघटना यांनी महानगरपालिका आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचारी व ठोक मानधनावरील कर्मचारी यांना सानुग्रह अनुदानाची मागणी केलेली होती. याअनुषंगाने महानगरपालिका आस्थापनेवरील दि. ३१/०३/२०१४ रोजी सहा महिन्यांपेक्षा अधिक सेवा झालेल्या कार्यरत स्थायी व अस्थायी अधिकारी/कर्मचारी यांना मागील वर्षी मंजूर रक्कमेप्रमाणे सानुग्रह अनुदान देणेबाबत प्रस्ताव निर्णयास्तव सादर केलेला होता.

राज्यातील विधानसभा निवडणूक आचारसंहिता नजीकच्याकाळात लागून दिवाळीपर्यंत आचारसंहितेचा कालावधी संपणार असल्याची शक्यता असल्याने, याप्रकरणी दिवाळीपूर्वी मा.महासभेत धोरणात्मक निर्णय होणे शक्य नव्हते. त्यामुळे मा.महापौर यांनी सर्व अधिकारी, पदाधिकारी व सर्व पक्षीय गटनेते यांची बैठक दि.०३/०९/२०१४ रोजी आयोजित केलेली होती. सदर बैठकीमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना मागील वर्षी दिलेल्या सानुग्रह अनुदानाच्या रक्कमेत रु.१०००/- ने वाढ करावी व दिवाळीपूर्वी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदानाचे वाटप करावे असा एकमताने निर्णय घेण्यात आला. याअनुषंगे सदर सभेच्या प्रस्तावानुसार महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे सानुग्रह अनुदानाचे मा.महासभेची कार्योत्तर मंजूरीच्या अधीन राहून दिवाळीपूर्वी वाटप केलेले आहे.

***<u>महानगपालिका आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी/कर्मचारी करीता :-</u>***

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | कार्यरत अधिकारी /कर्मचारी | प्रदान केलेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम रुपये | अनुदानापोटी झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | महापालिका आस्थापनेवरील वर्ग-०२ ते वर्ग-०४ संवर्गातील कर्मचारी वर्ग | १४७२ | १२,०००/- | १,७४,१५,०००/- |
| ३ | संगणक चालक/लघुलेखक (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ७४ | ९,५००/- | ६,८५,५८४/- |
| ४ | बालवाडी शिक्षिका (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०५ | ६,०००/- | ३०,०००/- |
| ५ | आर.सी.एच. कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०३ | ९,५००/- | २८,५००/- |
| ६ | क्षयरोग नियंत्रण व आय.सी.टी.सी. कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ३३ | ६,०००/- | १,९८,०००/- |
| ७ | लिंक वर्कर (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १२६ | ३,०००/- | ३,७८,०००/- |
| ८ | सुवर्ण जयंती योजना विभागातील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | ०२ | ५,५००/- | ११,०००/- |
| ९ | स्व.इंदिरा गांधी रुग्णालयामधील कर्मचारी (ठोक मानधनावरील कर्मचारी) | १७ | ९,५००/- | १,५०,४१७/- |
| १० | स्थानिक संस्था कर विभागातील ठोक मानधनावरील कार्यरत असलेले ऑडीट लिपीक | ०६ | ५,०००/- | २८,७५०/- |
| ११. | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (ठोक मानधनावरील) | १८ | ५,५००/- | ६५,५४७/- |
| १२. | कनिष्ठ अभियंता (ठोक मानधनावरील) | ०७ | ९,५००/- | ४४,३३१/- |
| | एकुण | १७६३ | | १,९०,३५,१२९/- |

*<u>शिक्षण विभागातील कार्यरत शिक्षक वर्ग करीता:-</u>*

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचा तपशिल | शिक्षक वर्गाची संख्या | सन २०१३ मध्ये मंजूर केलेली सानुग्रह अनुदानाची प्रत्येकी रक्कम रुपये | सन २०१४मध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना अनुदानापोटी होणारा खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | मिरा भाईंदर प्राथमिक शाळा शिक्षक वर्ग | १९१ | १२,०००/- | २२,९२,०००/- |

वरीलप्रमाणे महानगरपालिकेतील आस्थापनेवरील स्थायी अधिकारी/कर्मचाऱ्यांना व ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांना यावर्षी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदानाकरीता रु.१,९०,३५,१२९/- इतका खर्च झालेला आहे. आणि यावर्षीच्या अंदाजपत्राकात रक्कम रु.२.०० कोटी इतकी तरतुद आहे.

तसेच शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांसाठी यावर्षी दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदानाकरीता रक्कम रु. २२,९२,०००/- इतका खर्च झालेला आहे. आणि यावर्षीच्या अंदाजपत्राकात रक्कम रु.२५.०० लक्ष इतकी तरतुद आहे.

तरी वरीलप्रमाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना सन २०१४ मध्ये दिवाळी निमित्त प्रदान केलेल्या सानुग्रह अनुदान वाटपाच्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

२८.१०.१४

(सुभाष लाखे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

जाधवार। नोंद क्र. २० दि. २९/१०/२०१४ संध्या. 4:०० वाजता

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५/११/२०१४

## //गोषवारा//

**प्रकरण क्रमांक ( ३३ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणे बाबत....

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या खालील मालमत्ता असुन सदर मालमत्ता विविध कार्यक्रमा निमित्ता भाडयाने देण्यात येतात. सदर मालमत्ताचे भाडे यापुर्वी मा.महासभा दि.३०/१२/२०११ ठराव क्र. ८७ व मा. महासभा दि.२०/०३/२०१३ ठराव क्र. ६८ अन्वये ठरविण्यात आलेले आहे. तथापी सदर ठरविलेले भाडे हे अत्यल्प असुन सदर मालमत्तांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधि उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्ताचे भाडे वाढविण्याची आवश्यकता आहे. तरी खालील प्रमाणे मालमत्ताचे भाडे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र | मालमत्ता प्रकार | सध्याचे दर प्रतिदिन | प्रस्तावित दर प्रतिदिन |
|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर – १६ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन |
| २ | भाईंदर (पूर्व) खारीगांव हॉल- १ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल – ०१ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १५,०००/-प्रति दिन |
| ४अ | नगरभवन मंगल कार्यालय (वातानुकूलीत) | - | रु. २५,०००/-प्रति दिन |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/-प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. १०/- प्रति युनिट | रु. १५/- प्रति युनिट |
| | व्हीडीयो शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनिट | रु. ३००/- प्रति युनिट |
| | खुर्ची भाडे | रु. ५.००/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. १०००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/स्नेह संमेलन) | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क (अन्य संस्था) | रु. १०/-<br>रु.१००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (आरक्षणे व आर.जी जागा) | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा<br><br>ब) खाजगी संस्थाचे कार्यक्रम | रु. १००/- प्रति दिन<br>( २०० मी X २०० मी )<br>रु. १०००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन<br><br>रु. १००००/- प्रति दिन |

| | | | |
|---|---|---|---|
| | (सुट्टीच्या दिवसात) | ( २०० मी X २०० मी ) | |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) | रु. २५०/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खांलील प्रमाणे दर आकारण्यात येतात | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. ५.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न/इतर उत्सव) | रु. ०.५० प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. ५.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शेक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. ७५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. २५००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| ९ | जैसलपार्क चौपाटीवरील मैदान (जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीने) | रु.१०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन |
| १० | शुटींग साठी मालमत्ता / रस्ते भाडयाने देणे | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १५,०००/- प्रति दिन |

वरील दराने भाडे आकारण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-1/DK/2014-15 /MG 2

मा० महासभा गोषवारा प्राप्त
दि. १६/१०/२०१४
वेळ : ११:१५ वा.

मा. महासभा गोषवारा
रजिस्टर नोंद अ.क्र. १५.

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५।११।२०१४

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ३४ ) :-** छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) उन्नत मार्ग (Vehicular subway/Foot over Bridge) बांधणे कामासाठी कर्ज उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देणे.

मिरा-भाईदर महनगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८, काशिमिरा नाका ते वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) पर्यंत छत्रपती शिवाजी महाराज मार्ग हा विकास योजनेतील ४५.०० मीटर रुंदीचा रस्ता आहे. सदर रस्ता हा मिरा-भाईदर शहरात येण्यासाठी प्रमूख रस्ता आहे. सदर रस्त्यावर वाहतूकीची प्रचंड कोंडी होत असल्याने सदर रस्ता सिग्नल विरहीत करण्यासाठी सहा ठिकाणी उन्नत पूल/भुयारी मार्ग व दोन ठिकाणी पादचारी पूल बांधणे कामाच्या खर्चास मा. महासभा दि. १९/०७/२०१४ ठराव क्र. २९ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानूसार पुढील कार्यवाही सुरू आहे. सन २०१४-१५ या वर्षाच्या अर्थसंकल्पात सदर कामासाठी फक्त रु. ५०.०० लक्ष रक्कमेची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावित कामासाठी सुमारे रु. ४०.०० कोटी निधिची आवश्यकता भासणार असून महानगरपालिकेच्या निधितून इतर तातडीची लोकोपयोगी कामे करणे अगत्याचे आहे त्यामुळे महानगरपालिकेचा निधी या प्रस्तावित कामासाठी खर्च केल्यास शहरातील इतर तातडीच्या व महत्वाच्या कामांसाठी निधी उपलब्ध होऊ शकणार नाही. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी या प्रस्तावित कामा करीता कर्जरुपाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्राधिकरण विचार करु शकते व यास्तव स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेले आहे. तरी प्रस्तावित कामांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अथवा खाजगी संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन घेण्यासाठी व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९९४९ चे कलम १०९ अन्वये शासनाची मान्यता घेण्यास प्रस्ताव पाठविण्यास शिफारस आहे.

२०/१०/१४

आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका

PC-4/14-15/DK/MG-2

प्राप्त दि-२०/१०/९८

अ.क्र.९८

२०/१०/९८

# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

## <u>मा. महासभा दि.</u> १५/११/२०१४

**प्रकरण क्र.३५ चौथा महाराष्ट्र वित्त आयोगाची दि. ०८/०७/२०१४ रोजीची कोकण महसुल विभाग, कोकण भवन, बेलापुर, नवी मुंबई येथे आयोजित <u>केलेल्या बैठकीबाबत..</u>**

उपरोक्त विषयासंदर्भात सोबत जोडण्यांत आलेल्या मुद्दा क्र. १ ते १० बाबतची माहिती वित्त आयोगास सादर करण्यांत आलेली होती, यामध्ये महानगरपालिकेस काही सुचना,दुरुस्त्या व अभिप्राय देणे वित्त आयोगास अपेक्षित आहे. सदरच्या १ ते १० मुद्दयांबाबतची वित्त आयोगास पाठविण्यांत आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. तसेच ज्या मुद्दयांबाबत काही दुरुस्त्या, सुचना, अभिप्राय दयावयाचे असल्यास तसे अभिप्राय देऊन अवलोकन व्हावे हि विनंती.

मुख्यलेखाधिकारी
*मिरा-भाईंदर महानगरपालिका*

मा. महासभा गोषवारा प्राप्त
दि. ०३/०९/२०१४
वेळ - ११:२०

मा. महासभा गोषवारा रजिस्टर नोंद क्र. क्र. १६

४८

<u>विवरण पत्र – २</u>

<u>मुद्दा क्र.१ ते १०</u>

| मुद्दा | विषय |
|---|---|
| १ | दि. ३१/०३/२०१६ पर्यंत करांची पातळी जेवढी असेल त्या आधारावर राज्यातील महानगरपालिका संदर्भातील दि. ०१/०४/२०११ पासून पुढील वर्षासाठीची महसुली जमा आणि महसुली खर्च यांच्यामधील प्रस्तावित तफावत. |
| २ | महानगरपालिकांनी महसुल मिळविण्याच्या कोणत्या उपलब्ध व संभाव्य मार्गाचा कितपत वापर केला आहे व अशा उपाययोजनांमुळे त्यांची महसुली तफावत अशा रितीने व कितपत कमी होऊ शकते. |
| ३ | मुद्दा क्र. १ व २ लक्षात घेता, राज्य शासनाकडून महानगरपालिकांना द्यावयाच्या आर्थिक सहाय्याबाबतची तत्वे काय असावीत. |
| ४ | दि. ३१.३.२००९ रोजीची महानगरपालिकांची कर्जाची स्थिती तसेच, महानगरपालिकांची कर्जे घेण्याच्या क्षमतेचे नियमन करण्यासाठी तत्वे आणि कार्यपध्दती ठरविणे. तसेच महानगरपालिकांची उत्पन्नाची स्थिती लक्षात घेऊन त्यांची कर्जे नियंत्रणात ठेवण्यासाठीच्या आवश्यक उपाययोजना. |
| ५ | महानगरपालिकांच्या भांडवली मत्तांचे परिक्षण व निगा आणि महानगरपालिकांच्या उत्पन्नाची स्थिती लक्षात घेऊन सुयोग्य परिरक्षणासाठीची मानके विहीत करणे. तसेच महानगरपालिकांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्थानिक उत्पन्नाचे पर्याय तयार करण्यासाठी उपाय सुचविणे. |
| ६ | पाटबंधारे प्रकल्प, परिवहन उपक्रम, नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याची योजना, विंधन विहीरींचे कार्यक्रम आणि वाणिज्यीक स्वरुपाच्या योजनांमध्ये महानगरपालिकांनी काही गुंतवणूक केली असल्यास त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची सद्यस्थिती. |
| ७ | राज्य शासनाकडून वसूल करण्यात यावयाच्या कर, शुल्क, पथकर व फी यामधून यांच्यापासून मिळणाऱ्या व संविधानाच्या भाग ९ व ९-अ अन्वये महानगरपालिकांना विभागून द्यावयाच्या निव्वळ उत्पन्नाची सद्यस्थिती. अर्थात राज्य शासनाकडून या उत्पन्नाचे महानगरपालिकांना करावयाचे योग्य प्रमाणात वितरण. |
| ८ | महानगरपालिकांकडे अभिहस्तांकित करण्यात येतील किंवा यथास्थिती महानगरपालिकांकडून ज्यांचे विनियोजन करण्यात येईल असे कर, शुल्क, पथकर, फी निर्धारीत करणे व त्याची सद्यस्थिती |
| ९ | राज्य/केंद्र शासनाकडून महानगरपालिकांना विविध प्रयोजनार्थ प्राप्त होणारी सहाय्यक अनुदाने यांची सद्यस्थिती तसेच भविष्यात शासनाकडून द्यावयाच्या अशा अनुदानांच्या संदर्भातील नियंत्रण करणारी तत्वे विहित करणे. |
| १० | स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून कार्य पार पाडण्यासाठी महानगरपालिकांचा सद्यस्थितीतील कायदेविषयक, प्रशासकीय आणि इतर अधिकार व जबाबदाऱ्या, तसेच प्रतिसादात्मक, जबाबदार व उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य संस्थेची उद्दीष्टे प्राप्त करण्यासाठी वरील अधिकारांमध्ये / जबाबदाऱ्यांमध्ये सुधारणा सुचविणे. |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१५/११/२०१४

## // गोषवारा //

प्रकरण क्र.३६ महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग पत्र क्र.याचिका/मिभाम-१४१३/११२६/ प्र.क्र.११७/१३/नवि-२८ दि.२६/०३/२०१४ अन्वये प्राप्त निर्देशानुसार महानगरपालिकेला आवश्यक असलेले सुरक्षा रक्षक हे सुरक्षा रक्षक मंडळाकडुन घ्यावेत कि अभिकर्ता निश्चित करुन घ्यावेत, याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षा रक्षक सेवा उपलब्ध करून देणेकरीता स्पर्धात्मक निविदा मागवून त्यापैकी मे. सैनिक इंटेलिजन्स अँड सिक्युरिटी प्रा. लि. यांची वाजवी व सर्वात कमी दराची निविदा मा. स्थायी समिती सभा दि. १७/०७/२००९ ठराव क्र. २६ नूसार दि. १/८/२००९ ते दि. ३१/७/२०११ पर्यंत २ वर्षाच्या कालावधीकरीता मंजूर करण्यात आली होती. तद्नंतर मा. स्थायी समिती सभा दि. १६/७/२०११ ठराव क्र. ४१ अन्वये सदरच्या ठेक्यास दि. १/८/२०११ ते ३१/७/२०१२ या १ वर्ष कालावधी पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तद्नंतर याकामी नव्याने निविदा मागवून अभिकर्ता नियुक्त करण्याकरीता व अशी नियुक्ती करेपर्यंत विद्यमान निविदाधारकास मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव मा. महासभा दि. १४/१२/२०१२ (१/१२/२०१२ ची तहकुब सभा) मध्ये मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर सभेमध्ये ठराव क्र. ११ नूसार मे. सैनिक इंटेलिजन्स अँड सेक्युरिटी प्रा. लि. यांना पुढील ३ वर्षासाठी किमान वेतन कायदयानूसार मुदतवाढ देवून त्यानूसारचे देयकांच्या प्रदानास मंजूरी देण्यात आली आहे. मा. महासभेच्या सदर मंजूरीनूसार प्रशासनाकडून पुरवठादारास १ वर्षाची व तद्नंतर ३ महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.एसजीए-१५०६/प्र.क्र.९२/काम-५, मंत्रालय, मुंबई-३२, दि.८ नोव्हेंबर, २००६ मधील तरतुदी नुसार सरकारी, निमसरकारी क्षेत्रे/उपक्रम/शासकीय मंडळे महामंडळे/महानगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था/सहकारी संस्था/ शासकीय कार्यालये इत्यादी ठिकाणी, सुरक्षा मंडळाकडुनच सुरक्षा रक्षक घेणे आवश्यक असल्याबाबत श्री. संजय नारायण पांगे यांनी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडे दि. २१/३/२०१३ रोजीच्या निवेदनाद्वारे मा.महासभा दि.१४/१२/२०१२ ठराव क्र.११ विखंडित करणेची व कलम ४५२ अन्वये महानगरपालिका विसर्जित करणेची मागणी केली. सदर निवेदनावर शासनाकडे निर्णय प्रलंबीत असताना, श्री. संजय नारायण पांगे, यांनी, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र. ६६/२०१३ दाखल केली होती. प्रस्तुत प्रकरणी याचिकाकर्त्याचे प्रलंबित निवेदनावर ३ महिन्यांचे आत निर्णय घेण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनास दिले. या अनुषंगाने महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे पत्र क्र. याचिका/मिभाम-१४१३/११२६/प्रक्र-११७/१३/नवि-२८, दि. २६/३/२०१४ अन्वये शासनाने खालीलप्रमाणे निर्णय महानगरपालिकेला कळविलेले आहे.

*"महानगरपालिकेने सुरक्षा रक्षकांसाठी नव्याने मागणी केल्यास आवश्यक संख्येऐवढे सुरक्षा रक्षक पुरविता येतील, असे अभिप्राय सुरक्षा रक्षक मंडळाने दिलेले असल्याचे उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने*

*कळविले आहे. त्या अनुषंगाने श्री.पांगे यांच्या दि.२१/०३/२०१३ च्या कलम ४५१ खालील अर्जाच्या अनुषंगाने संबंधित ठराव विखंडीत करण्याबाबत विचार न करता कामगार विभगाने दिलेल्या अभिप्रायानुसार , सुरक्षा अधिकारी/रक्षक यांच्या उपलब्धतेबाबत सुरक्षा मंडळाकडे विचारणा करुन त्याबाबतचे अभिप्राय दि.१५/०४/२०१४ पुर्वी प्राप्त करुन घ्यावेत व सुरक्षा रक्षक मंडळाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने महानगरपालिकेकरीता आवश्यक सुरक्षा अधिकारी/रक्षक यांच्या नेमणूकीच्या संदर्भात याबाबतचा प्रस्ताव महासभेपुढे सादर करुन महानगरपालिकेने विद्यमान कंत्राटदारास दि.१०/०५/२०१३ च्या आदेशान्वये दिलेले १ वर्षाच्या कालावधी समाप्तीनंतर सुरक्षा अधिकारी/रक्षकांच्या नेमणूकीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना सुचना देण्यात याव्यात."*

शासनाचा उपरोक्त निर्णय प्राप्त झाल्यावर महानगरपालिकेने दि.०९/०४/२०१४ रोजी सुरक्षा मंडळास पत्र पाठवून सुरक्षा अधिकारी/रक्षक यांच्या उपलब्धतेबाबत तसेच त्यांना द्यावयाच्या मासिक वेतन व भत्त्यांच्या दराबाबत लेखी माहिती मागितली होती. त्यांप्रमाणे सुरक्षा रक्षक मंडळाकडुन माहिती प्राप्त झाली आहे. मनपाने मागणी केल्यानुसार ३५० सुरक्षा रक्षकांचा पुरवठा करणे शक्य असल्याचे सुरक्षा रक्षक मंडळाने त्यांच्या दि.१२/०४/२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच मंडळातील सुरक्षा रक्षकांना सध्या लागू असलेले वेतन व लेव्ही दराचा तक्तासुध्दा पाठविला आहे. सुरक्षा रक्षक मंडळ आता सुरक्षा रक्षक पुरविण्यास तयार असल्यामुळे, त्यांचेकडुन सुरक्षा रक्षक घेणेस हरकत नाही. तथापी याबाबतचा अंतीम धोरणात्मक निर्णय मा.महासभेने घ्यावयाचा आहे.

सबब, शासन पत्रास अनुसरुन कृपया खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय मा.महासभेकडुन व्हावा.

अ) महानगरपालिकेला आवश्यक असलेले सुरक्षा रक्षक हे सुरक्षा रक्षक मंडळाकडुन घ्यावेत कि जाहिर निविदेद्वारे अभिकर्ता निश्चित करुन घ्यावेत? कृपया याबाबत धोरणात्मक निर्णय व्हावा.

ब) १) सुरक्षा रक्षक मंडळाकडुन, सुरक्षा रक्षक घ्यावयाचे झाल्यास सुरक्षा रक्षक मंडळाचे दराने देय विद्यमान भत्ते व वेतन आणि भविष्यात वेळोवेळी बदलणारे भत्ते व वेतन देणेस मान्यता व्हावी.

२) जाहिर निविदा प्रसिध्द करुन अभिकर्ता नियुक्तीद्वारे सुरक्षा रक्षक घ्यावयाचे झाल्यास, तात्काळ निविदा मागविणेस मान्यता व्हावी व निविदा अंतीम होईपर्यंत विद्यमान सुरक्षा एजन्सी मार्फत नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षकांच्या सेवा पूढे चालू ठेवण्यास व देय होणारे भत्ते व वेतन देण्यास मान्यता व्हावी.

(सुभाष लाखे) २८/१०/१२

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा
प्राप्त दि. २८/१०/२०१४
वेळ. १०=५५

मा. महासभा गोषवारा
रजिस्टर नोंद अ.क्र.१९

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. महासभा दि. १५ / ११ /२०१४.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र (३७ ) :-** <u>आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>

मा.मंत्री जलसंपदा यांचे दालनात दि. १६/०३/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत मिरा भाईंदर महानगरपालिकेकरिता ३० द.ल.ली. अतिरीक्त पाणी पुरवठा मंजूर केला होता. यापैकी २० द.ल.लि. पाणी पुरवठा तातडीने सुरु करणेबाबत मा. मंत्री उद्योग व बंदरे यांनी दि.१९/०३/२०१२ रोजीच्या झालेल्या बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास निर्देश दिलेले होते.

सदर बैठकीच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि. ०४/१२/२०१२ रोजी जलजोडणी मंजुर आशयाचे पत्र दिले. साकेत ठाणे येथून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जलवाहिनी वरुन २० द.ल.ली. प्रतिदिन पाणी प्रायोगिक तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात १ महिन्याच्या कालावधीकरिता जलजोडणी देण्याचे अंतर्भुत होते. त्यानुसार २० द.ल.ली. पाणी पुरवठा प्रायोगिक तत्वावर घेणेकरीता साकेत (ठाणे) येथे तात्पुरत्या स्वरुपात बुस्टींग पंपगृह बांधण्यात आले असून सदर पंपीग स्टेशन ऑगस्ट -२०१४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आले, तेव्हापासून मिरा भाईंदर शहराच्या पाणी पुरवठयात २० द.ल.ली. वाढ झाली आहे. तसेच सदरची यंत्रणा सुरळीत कार्यान्वीत असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पाणी पुरवठा अखंडीत सुरु ठेवलेला आहे.

मा. आयुक्त व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची संयुक्तीक बैठक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनात दि. २६/०८/२०१४ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीस मिरा भाईंदर महानगरपालिकेस अतिरिक्त पाणी पुरवठा होणेबाबत चर्चा झाली सदर बैठकी दरम्यान मिरा भाईंदर महानगरपालिकेस तत्वत: ५० द.ल.ली. पाणी पुरवठा देण्याचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी मान्य केले व बैठकीचे इतिवृत्तांत मिरा भाईंदर महानगरपालिकेस दि. १२/०९/२०१४ रोजी देण्यात आलेले आहे.

सदरचे अतिरिक्त पाणी घेणेकरिता खालील कामे हाती घेणे आवश्यक आहे.

अ) **<u>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या साकेत पंपगृहात ४० द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेचा Stand by VFD Operated In line Booster पंपाचा पुरवठा करणे, बसविणे, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत..</u>**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने साकेत पंपीग स्टेशनचा पाणी पुरवठा तात्पुरत्या स्वरुपाचा दिला असल्यामुळे तेथे केवळ एकच् पंप बसविण्यांत आला. परंतु सदरची यंत्रणा सुरळीत कार्यान्वीत असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पाणी पुरवठा अखंडीत सुरु ठेवलेला आहे. हा पंप २४ x ७ चालतो. त्यामुळे या पंपात काही बिघाड झाल्यास महानगरपालिकेस दररोज २० द.ल.ली. पाणी पुरवठा कमी होऊन पाणी पुरवठयाचे तास वाढून नागरीकांच्या तक्रारी वाढण्याची शक्यता आहे. करीता साकेत पंप गृहात एक नवीन Stand by पंप बसविणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि. १२/०९/२०१४ रोजीच्या पत्राद्वारे मिरा भाईंदर महनगरपालिकेकरिता अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी पुरवठा करण्याचे मान्य केले आहे वाढीव पाणी पुरवठा लक्षात घेता साकेत येथील Stand by पंप २० द.ल.ली. ऐवजी ४० द.ल.ली. एवढया क्षमतेचा प्रस्तावीत केला आहे, जेणे करुन वाढीव पाणी पुरवठा देखील या पंपाद्वारे केला जाऊ शकेल.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या साकेत पंपगृहात ४० द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेचा Stand by VFD Operated In line Booster पंपाचा पुरवठा करणे, बसविणे, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत | रु. ३,२४,७०,०३३/- |

ब) <u>१३५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी पातलीपाडा ते ओवळा पुरविणे व अंथरणे.</u>

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि. १२/०९/२०१४ रोजीच्या पत्राद्वारे मिरा भाईंदर महनगरपालिकेकरिता अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी पुरवठा करण्याचे मान्य केले आहे. मिरा भाईंदर शहरास सद्यस्थितीत होत असलेल्या पाणी पुरवठा जलवाहिनीची अतिरिक्त पाणी वाहून नेण्याची क्षमता नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून उपलब्ध होणारे १०० द.ल.ली. पाणी मिरा भाईंदर शहरापर्यंत आणणेकरिता पाटलीपाडा ते हटकेश पर्यंत सद्याच्या जलवाहिनीस समांतर १३५० मि.मी. व्यासाची नवीन जलवाहिनी अंथरावी लागणार आहे व या अगोदर टप्पा १ मध्ये २० द.ल.ली. पाणी शहरात आणणेकरिता ओवळे ते काजूपाडा दरम्यान १३५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरण्यात आली असून ऑगस्ट २०१४ मध्ये कार्यान्वीत करण्यात आली. सद्या टप्पा २ मध्ये अतिरिक्त पाणी पुरवठा मिरा भाईंदर शहरात आणण्याकरिता खालीलप्रमाणे जलवाहिनी टाकावी लागणार आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | पाटलीपाडा ते ओवळागावपर्यंत १३५० मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. १८,३८,२६,०६४/- |

वरील वस्तुस्थिती पाहता अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी घेणेकरिता वरील दोन्ही कामे हाती घेणे आवश्यक असून त्याकरिता एकूण रु. २१,६२,९६,०९७/- इतका खर्च अपेक्षीत आहे व **नविन अतिरिक्त पाणी पुरवठा** या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद शिल्लक असून, सदर खर्चास व काम करुन घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेकरिता प्रस्ताव मा. महासभेत ठेवण्यास शिफारस आहे.

३/११/१४

आयुक्त
मिरा-भाईदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १५ / ११ /२०१४

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ३८:- अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर मा.न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा.आयुक्त यांनी दिलेल्या मंजुरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

अ) श्री. सुनिल यादव, प्रभाग अधिकारी, (प्रभाग कार्यालय क्र.१) :- श्री. सुनिल गणपत यादव हे प्रभाग कार्यालय क्र.१ येथे प्रभाग अधिकारी म्हणून कार्यरत असताना अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, मुंबई यांचेकडुन लाचलुचपत प्रकरणी दि. १७/१२/२०१३ रोजी कारवाई केलेली आहे. त्यांचेविरुध्द याप्रकरणी भाईंदर पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु.र.नं.।।२७/२०१३ कलम ७,१२,१३ (१)(ड) सह १३ (२) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, सन १९८८ अन्वये दाखल केलेले आहे. याअनुषंगाने महानगरपालिकेने श्री. सुनिल गणपत यादव, प्रभाग अधिकारी, (प्रभाग कार्यालय क्र.१) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये दि.२३/१२/२०१३ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून निलंबीत करण्यात आलेले आहे. याप्रकरणी महासंचालक अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य,वरळी, मुंबई यांचेकडील पत्र दि.२७/०६/२०१४ नुसार लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, सन १९८८ चे कलम ७,१२,१३ (१)(ड) सह १३ (२) प्रमाणे नमुद केलेल्या कृत्यामुळे प्रस्तावित होणाऱ्या अपराधासाठी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन-१९८८ चे कलम १९(१) अन्वये सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करणेस मंजुरी मागितली होती. त्याअनुषंगे मा.आयुक्त यांनी दि.०१/०८/२०१४ रोजीच्या आदेशान्वये महासंचालक अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य,वरळी मुंबई याकार्यालयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९ अ अन्वये मा.सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करणेस मंजुरी दिलेली आहे.

सदरचे प्रकरण मा.महासभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

ब) श्रीम. अलका मदन पाटील, बालवाडी शिक्षिका/लिपीक :- श्रीम. अलका मदन पाटील, बालवाडी शिक्षिका/लिपीक हया प्रभाग कार्यालय क्र.६ येथे विवाह नोंदणीचे कामकाज करीत असताना त्यांचेवर अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,ठाणे यांच्याकडुन लाचलुचपत प्रकरणी दि.१०/१२/२०१३ रोजी कारवाई केलेली आहे. त्यांचेविरुध्द याप्रकरणी काशिमिरा पोलीस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.।। ८५/२०१३ प्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, सन-१९८८ चे कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) अन्वये दाखल केलेले आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेने श्रीम. अलका मदन पाटील, बालवाडी शिक्षिका/लिपीक, प्रभाग कार्यालय क्र.६ यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ अन्वये दि.२०/१२/२०१३ रोजीच्या आदेशान्वये सेवेतून निलंबीत करण्यात आलेले आहे. याप्रकरणी अॅन्टी करप्शन ब्युरो,ठाणे याकार्यालयाने दि.०८/०५/२०१४ रोजीच्या पत्रान्वये लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, सन १९८८ चे कलम ७,१३ (१)(ड) सह १३ (२) प्रमाणे नमुद केलेल्या कृत्यामुळे प्रस्तावित होणाऱ्या अपराधासाठी लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन-१९८८ चे कलम १९(१) अन्वये सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करणेस मंजुरी मागितली होती. त्याअनुषंगे मा.आयुक्त यांनी दि.०१/०८/२०१४ रोजीच्या आदेशान्वये अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे याकार्यालयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५९ अ अन्वये मा.सक्षम न्यायालयात अभियोग दाखल करणेस मंजुरी दिलेली आहे.

सदरचे प्रकरण मा.महासभेपुढे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

(सुभाष लाखे) २०.१०.१४
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

उपचारा नोंद क्र. २९ दि. २०/१०/२०१४ रोजी संध्या 4:00 वाजता